In rundown, the consequences of this examination found that body mass index,muscle mass and greatest arm strength had no huge impact on present moment (4-week) weight preparing among overweight people. Notwithstanding, there was a critical impact on the maximum repetition of the pushup after the weight preparing mediation. In view of the discoveries of this investigation, this section has talked about in detail the potential reasons why such discoveries are found in examinations dependent on help and importance produced using past examinations. Likewise, the specialists discovered ideas for development in future investigations.

## References

1.Kylasov, A. furthermore, S. Gavrov, Diversity of game: nondestructive assessment. Enc Life Support Syst, 2011. 2: p. 462-91.
2.Núñez, F.J., et al., The impacts of one-sided and two-sided erratic over-burden preparing on hypertrophy, muscle force and COD execution, and its determinants, in group activity players. PloS one, 2018. 13(3): p. e0193841.
3.Shazana, N., et al., Electromyographical investigation and execution during seat press work out: The impact of self-talk.
4.Nadzalan, A.M., et al., Muscle actuation during one-sided and respective biceps twist practices among prepared men. Global Journal of Recent Technology and Engineering, 2019. 8(3): p. 3381-3383.
5. Grindstaff TL, Potach DH (2006) Prevention of Common Wrestling Injuries. Strength and Conditioning Journal 28: 20-28.
6. Global Federation of Associated Wrestling styles (2013) International Wrestling Rules.
7. Rajabi R, Doherty P, Goodarzi M, Hemayattalab R (2008) Comparison of thoracic kyphosis in two gatherings of world class Greco-Roman and free-form grapplers and a gathering of non-athletic members. Br J Sports Med 42: 229-232.
8. McGuigan MR, Winchester JB, Erickson T (2006) The significance of isometric greatest strength in school grapplers. Diary of Sports Science and Medication 108 - 113.

❖❖❖

# अमरावती जिल्ह्यातील कापुस पिकाच्या बाजारभावाचे विश्लेषण : एक भौगोलिक अभ्यास — २०११—२०१५

संशोधक
गजानन अंबादास पाचपुते[१]
मु. पो. लोहगाव ता. जि. हिंगोली महाराष्ट्र ४३१५१३
मो. ८३०८०१०७५०, Email: gajananpachpute035@gmail.com
मार्गदर्शक
डॉ. उमेशचंद्र बापुरावजी मडावी[२]
भूगोल विभाग, श्रीमती. केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती. महाराष्ट्र ४४४६०४
मो. ९४२१८१८९९४, Email: umeshchandramadavi@gmail.com

## सारांश :—

कृषी व्यवसाय हा मानवाचा प्राचिन काळापासुन चालत आलेला व्यवसाय आहे. आपल्या भारत देशाचा विकास संपूर्णत: शेतीवर अवलंबुन आहे. शेती हे केवळ उदरनिर्वाहाचे साधन राहिलेले नसुन व्यापारी तत्वावर तिचा उपयोग होवु लागला आहे. आणि म्हणुन शेतीकडे ''उद्योग'' म्हणुन पाहण्यात येवु लागले पुर्वी शेती पारंपारिक पध्दतीने केली जात होते. त्यावेळी कृषीतुन निघणारे उत्पन्न आणि सुधारित बी—बीयाणाचा वापर करण्यात येत असे.

किटकनाशकांचा, तणनाशकांचा वापर होऊ लागला. सेंद्रीय व रासायनिक खताचा उपयोग कृषी उत्पन्न वाढीसाठी होवु लागला. या सर्व घटकामुळे कृषी उत्पादनात वाढ झाली. अशा या व्यवसायाचा भौगोलिक दृष्टीकोनातून केलेला अभ्यास म्हणजे ''कृषी भूगोल'' होय

खेड्यातील लघु व कुटीर उद्योग हे प्रामुख्याने शेती उत्पादनातील कच्च्या मालावरच अवलंबुन आहे. देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात ४३ टक्के वाटा हा कृषी उत्पन्नाच्या असून अर्थ व्यवस्थेतील प्राथमिक क्षेत्र म्हणुन शेती व्यवसायाचा विचार केला जातो. महात्मा गांधी यांनी म्हटल्या प्रमाणे ''भारतीय शेती ही भारतीय लोकाच्या उपजिवीकेचे प्रमुख साधन असल्यामुळे शेती हा भारताचा आत्मा आहे.

भारतात हरितक्रांतीपासुन शेती उत्पादनात वाढ झालेली दिसुन येते. एकुण क्षेत्रफळाचा विचार केल्यास भारतात एकुण शेतीलागवडी खालील क्षेत्रफळ १४२ दशलक्ष हेक्टर आहे. एकुण लागवडी योग्य क्षेत्रफळापैकी ६८ दशलक्ष हेक्टर जमिन ही वनजमिन आहे. यामध्ये भारतात साखर उद्योग, कापड उद्योग वाढीस लागले आहे.

बिजसंज्ञा :— बाजारभाव, शेती, पाणी, उत्पादन, आर्थिक नियोजन

## प्रस्तावना :—

कापुस पिकांची लागवड संबंध भारतात केली जाते. या भागातील सर्वसाधारण माती परिक्षणाचे निर्ष्कषानुसार या जमिनीत उपलब्ध नत्राचे आणि स्फुरदचे प्रमाण हे कमी ते मध्यम आहे. तर उपलब्ध पालाशचे प्रमाण हे मध्यम ते जास्त आहे. या जमिनीतील सेंद्रीय कबीचे प्रमाण ०.३ ते ०.३० टक्के इतके कमी आहे.

कापुस पिकाच्या मुळया हया जमिनीत खोलवर जात असल्या कारणाने जमिनीच्या खालच्या थरातील अन्नद्रव्ये देखील जास्त प्रमाणात शोषली जातात.

कापसाची लागवड खोल, मध्यम खोल तसेच उथळ जमिनीत केली जाते, जमिनीच्या प्रकारानुसार कापुस पिक किती अन्नद्रव्य शोषुन घेते याचा अभ्यास वर्ल्ड वाईड फंड फॉर नेचर या संस्थेने केला आहे. शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला माल थेट ग्राहकांना मिळावा व त्यातुन शेतकऱ्याच्या मालाला वाजवी भाव मिळुन ग्राहकांनाही रास्त दराने अन्नधान्य उपलब्ध व्हावे याकरीता महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाने शेतकरी व ग्राहक यांच्यातील मध्यास्थाने उच्चाटन करण्यासाठी राज्यातील सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्यांना आर्थिक मदत देवुन बाजार समिती अंतर्गत ''शेतकरी बाजारी'' स्थापन करण्याची योजना सुरू केलेली आहे. शेतकरी बाजार योजनेमुळे हंगामभर शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्यांची व व्यापाऱ्यांऐवजी थेट शेतकऱ्यांकडुन माल खरेदी करणाऱ्या ग्राहकांची ही आर्थिक लुट

थांबली जावुन शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यास मदत मिळणार आहे. तसेच ग्राहकाने शेती मालासाठी अदा केलेल्या प्रत्येक रूपयातील जास्तीत जास्त वाटा शेतकऱ्यांना मिळेल, अशी अपेक्षा आहे.

## माहिती संकलन :—

प्रस्तुत शोध निबंध हा अमरावती जिल्ह्यातील असून कापुस या पीकांच्या बाजारभावाचे विश्लेषण करण्यात आले आहे. शोध निबंधासाठी लागणारी साधनसामुग्री आणि सांख्यिकी आकडेवारी ही www.mahaagri.gov.in व तसेच www.mahadesh.gov.in या संकेतस्थळाच्या आधारे घेण्यात आली आहे. शोध निबंधासाठी ज्या सांख्यिकिय माहितीचा वापर करण्यात आलेला आहे ही सांख्यिकिय माहिती ही अमरावती जिल्ह्यातील कापुस या पीकांच्या २०११ ते २०१५ या वर्षातील असून त्यांचे होणरे किंमतीतील संख्यात्मक विश्लेषण यात करण्यात आले आहे.

## अभ्यासाचा उद्देश :—

प्रस्तुत शोध निबंधात अमरावती जिल्ह्यातील २०११ ते २०१५ या पाच वर्षातील संत्रा पिकाच्या किंमतीतील होणारा बदल या शोध निबंधात अभ्यासाला आहे.

१. अभ्यास क्षेत्रातील कापुस या पिकांच्या कृषी संदर्भातील आढावा घेणे.
२. अमरावती विभागातील २०११ ते २०१५ या वर्षातील कापुस यांच्या किंमतीत होणारा बदल अभ्यासण

## स्थान व विस्तार :—

अमरावती जिल्हा महाराष्ट्राच्या उत्तर सिमेवर असुन भारताच्या मध्यभागी विस्तारला आहे. जिल्ह्याच्या अक्षवृत्तीय विस्तार २०°. ३२′ उत्तर ते २१°. ४६′ उत्तर आहे. रेखावृत्तीय विस्तार हा पुर्व ७६°. ३८′ ते ७८°. २७′ पूर्व रेखांश आहे. जिल्ह्याचे क्षेत्रफळ १४४९२७२ किंवा १२२१२ चौ.कि.मी. असुन महाराष्ट्र राज्याच्या क्षेत्रफळाची शेकडा प्रमाण ३.९६: इतके आहे.

जिल्ह्याच्या उत्तरेला बैतुल जिल्हा, पूर्वेला वर्धा, पश्चिमेस अकोला व दक्षिणेस यवतमाळ व अकोला या जिल्ह्याचा भाग येतो. प्रशासकिय दृष्टीकोणातुन महाराष्ट्राचे जे विभाग पडले आहे. त्यातिल विदर्भ विभागात अमरावती जिल्ह्याची लोकसंख्या २८८८४४५ एवढी असुन त्यात १६८१ खेडे, ११ शहराचा समावेश आहे व ३१५ ओसाड गावे यांचा समावेश आहे. सध्या अमरावती जिल्ह्यात १४ तहसील आहे. मुख्यत्वेकरून विदर्भात कापुस लागवड केली जाते.



Fig 1: Map of India Fig 2: Map of Maharashtra

## विषय विवेचन

### कापुस लागवड पध्दती :—

कापुस पिकाच्या मुळया हया जमिनीत खोलवर जात असल्या कारणाने जमिनीच्या खालच्या थरातील अन्नद्रव्ये देखील जास्त प्रमाणात शोषली जातात.

कापसाची लागवड खोल, मध्यम खोल तसेच उथळ जमिनीत केली जाते, जमिनीच्या प्रकारानुसार कापुस पिक किती अन्नद्रव्य शोषुन घेते याचा अभ्यास वर्ल्ड वाईड फंड फॉर नेचर या संस्थेने केला आहे. त्याचे निष्कर्ष खालील प्रमाणे हे निष्कर्ष भारतीय कापुस लागवडीचे आहेत.

### कापुस पिकात घ्यावयाची काळजी :—

भारतात कापुस पिकाची लागवड ही प्रामुख्याने कोरडवाहू लागवड जी पावसाच्या पाण्यावर अवलंबुन असते. आणि बागायाती लागवड केली जाते. भारतातील कापुस लागवडीचा हंगाम हा फेब्रुवारी ते जुलै असा आहे. या काळातील तापमानात बरीच तफावत राहते. पावसाच्या पाण्यावर होणारी लागवड ही बहुतांशपणे कमी उत्पादन

आणि पिकाची कमी वाढ या दोन समस्यांनी ग्रस्त असते. कोरडवाहू लागवडीच्या कापसाची वाढ ही पुर्णपणे पावसाच्या पाण्यावर अवलंबुन असते. विद्यापिठांनी या भागासाठी अनेक जाती विकसीत केल्या आहेत. कोरडवाहू कापसापासुन जास्तीत जास्त उत्पादन मिळविण्यासाठी खालील बाबींचा विचार करावा. कोरडवाहू भागासाठी कमी पाण्यांत येतील अशाच वाणांची लागवड करावी. वाणांचा कालावधी हा कमी ते मध्यम दिवसांचा असावा. जेणेकरुन चांगला पाऊस राहील त्या काळात कापसांस फुले येवुन जमिनीत असलेल्या ओलाव्यावर बोंडांची पक्वता मिळेल. जास्त कालावधीचे वाण लावल्यास त्यापासून उत्पादन मिळत नाही.

जमिनीच्या प्रकारानुसार अन्नद्रव्याचे प्रमाण

| जमिनीचा प्रकार | नत्र (किलो प्रति एकर) | स्फुरद (किलो प्रति एकर) | पालाश (किलो प्रति एकर) |
|---|---|---|---|
| खोल जमिन | २२ किलो | ८ किलो | २२.८ किलो |
| मध्यम खोल जमिन | १७.६ किलो | ५.२ किलो | १७.२ किलो |
| उथळ जमिन | १७.६ किलो | ४.८ किलो | १८ किलो |

स्त्रोत :— आर्थिक व सामाजिक समालोचन अमरावती जिल्हा २०१२ — १३

## कापुस पिकातील उगवणीपुर्वीचे तणनियंत्रण :—

कोरडवाहू वाण लागवड करण्यांपूर्वी, शेतातील नेहमी येणाऱ्या तणांचा अभ्यास करुन, रोप उगवणीपुर्वी वापरण्यायोग्य तणनाशके वापरुन, सुरवातीच्या काळातील तण नियंत्रण मिळवुन घ्यावे. कोरडवाहू परिसरातील शेतकरी, हे पूर्णत: पावसाच्या लहरीपणावर अवलंबुन असतात. एखाद्या वेळेस पेरणीनंतर पाऊस लागुन राहिल्यास बरेच दिवस शेतात तणनियंत्रण मिळत नाही. आणि कापुस पिकांच्या वाढीवर याचे दुष्परिणाम होतात. उगवणीपुर्वी वापरण्यासाठी पेन्डीमेथिलिन (टाटा पनिडा वै. नावांची उपलब्ध आहे) हे एक चांगले तणनाशक आहे. हे तणनाशक पेरणीच्या १४० दिवस आधी तसेच पेरणीच्या ७ ते १० दिवस आधी देखील वापरता येते. वापरानंतर हे तणनाशक जमिनीत २ ते ३ इंच खोल अंतरावर चांगले एकत्र करुन टाकावे. पेंडोमेथिलिन, सारखेच ट्रायफलुरॉलिन हे तणनाशक देखील पेरणीपुर्वी वापरता येते.

## कोरडवाहू कापुस लागवडीसाठी रासायनिक खतांची मात्रा :— (प्रमाण किलो प्रति एकर)

कोरडवाहू कापुस पिकास रासायनिक खते देतांना, स्फुरद व पालाश खतांची अर्धी मात्रा लागवडीच्या वेळेस द्यावी. रोपे उगवणीनंतर कापुस पिकास नत्र युक्त खतांची अर्धी मात्रा द्यावी. रोप उगवण झाल्यानंतर नत्राची मात्रा दिल्याने रोपास नत्र वापरणे शक्य होते. लागवडीच्या वेळेस नत्रयुक्त खते दिल्याने, रोप उगवुन येईपर्यत त्यातील बरेचसे नत्र वाया जाते, ज्यामुळे त्याचा पिकास फारसा उपयोग होत नाही. स्फुरद व पालाश युक्त खतांची राहिलेली अर्धी मात्रा लागवडीनंतर ३० ते ४० दिवसांत जमिनीत एकत्र करुन टाकावी. खालील तक्तात कोरडवाहू वाणांसाठी देण्याची रासायनिक खतांची मात्रा विभागुन दिलेली आहे.

रासायनिक खतांची मात्रा

| लागवडीनंतर दिवस | नत्र | स्फुरद | पालाश | मॅग्नेशियम सल्फेट | कॅल्शियम नायट्रेट |
|---|---|---|---|---|---|
| ५—१० दिवस | २० | २५ | २० | ०० | ०० |
| ३०—३५ दिवस | ३० | २५ | ५० | १० | १० |
| एकुण | ५० | ५० | ७० | १० | १० |

| सल्फर | झिंक सल्फेट | फेरस सल्फेट | मॅगनिज सल्फेट |
|---|---|---|---|
| ०० | ०० | ०० | ०० |
| १ | १० | १० | २ |
| १ | १० | १० | २ |

स्त्रोत :— आर्थिक व सामाजिक समालोचन अमरावती जिल्हा २०१२ — १३

कापुस पिकांत जैविक खतांचा वापर :—

कापुस पिकांत स्फुरद विरघळणारे जिवाणु, तसेच पालाश प्रवाहित करणारे जिवाणु यांचा वापर करणे फायदेशीर ठरते.

कापुस पिकांत पाण्याचा ताण सहन करणे :—

कापुस पिकांत पावसाचा ताण पडल्यास अक्वालॉक हे उत्पादन पाण्याचा ताण पडल्यास सुरवात झाल्यावर वापरण्यासाठी योग्य आहे. अक्वालॉक हे उत्पादन १ लिटर पाण्यात ३ ते ४ मिली या प्रमाणात एकत्र करुन, कापुस पिकावर फवारणी द्यावी. अक्वालॉक कापुस पिकाच्या पानांद्वारा शोषुन घेतले जाते. अक्वालॉक पानावरील पर्णरंध्रांची उघडझाप नियंत्रित करुन पिकातील पाण्याचा र्हास थांबवते. ज्यामुळे ४० ते ८० टक्के पाणी कमी असुन देखील पिकाची १८ ते २० दिवस योग्य वाढ होत राहते. व पिक पाण्याचा ताण सहन करु शकते.

फवारणीतुन कोणती खते देणार —

कापुस पिकांत फुलपाती लागण्यापासुन तर बोंड पक्व होईपर्यत पालाश अन्नद्रव्याची गरज जास्त असते. हे अन्नद्रव्य कापुस पिकांस फवारणीद्वारे  कापुस पिकांच्या बोंड पक्वतेच्या काळात देणे जास्त फायदेशीर ठरते. पालाशयुक्त खतांचा योग्य प्रमाणात पुरवठा झाल्यास कापुस पिकांच्या बोंडाचे वजन वाढते, धाग्यांची जाडी वाढते. तसेच कापुस पिकाची पाने लाल पडण्याचे प्रमाण कमी होते. खालील प्रमाणे कोरडवाहू तसेच बागायती कापुस वाणांस फवारणीतुन खते द्यावीत.

रासायनिक खतांची मात्रा

| पिकाच्या वाढीची अवस्था | फवारणीच्या खतांचा प्रकार | प्रमाण प्रती लिटर पाणी |
|---|---|---|
| लागवडीनंतर १५—२० दिवस | १९—१९—१९<br>सुक्ष्म अन्नद्रव्ये<br>चिलेटेड झिंक<br>कॅल्शियम नायट्रेट | २.५—३ ग्रॅम<br>२.५—३ ग्रॅम<br>१ ग्रॅम<br>४.५ ग्रॅम |
| वरील फवारणीनंतर ३० दिवसांनी | २० टक्के बोरॉन<br>चिलेटेड झिंक<br>००—५२—३४ | १ ग्रॅम<br>१ ग्रॅम<br>४.५ ग्रॅम |
| फुलोरा अवस्थेत | मायक्रोन्युट्रीएंटस (ग्रेड नं. २)<br>००—५२—३४ | २.५—३ ग्रॅम<br>४.५ ग्रॅम |
| बोंड धारणा | बोरॉन<br>मॅग्नेशियम सल्फेट | १ ग्रॅम<br>२ ग्रॅम |
| बोंड पोसत असतांना | ००—००—५०<br>मॅग्नेशियम सल्फेट | ४.५ ग्रॅम<br>४.५ ग्रॅम |

स्त्रोत :— आर्थिक व सामाजिक समालोचन अमरावती जिल्हा २०१२ — १३

शेतकऱ्याने जीवन साधन मिळविण्यासाठी किंवा धंदा म्हणुन स्वत:च्या शेतावर चालविलेला व्यवसाय अशी ढोबळमानाने शेतीची व्याख्या करता येईल. नैसर्गिक किंवा प्राकृतिक घटक हे वर्षावर्षाला बदलत नाहीत. त्यांच्यातील सर्वात महत्वाचे म्हणजे हवामान, जमीन आणि भुरचना हे होत. पिके आणि शेतीचा प्रकार हे जमिन आणि भुरचना यावर अवलंबुन असतात. पण या घटकांना जर पर्जन्यमानाचीही जोड मिळाली तर त्यांचे परिणाम अधिक उठावदार दिसतात. खोल, सुपीक आणि सपाट जमिन असेल आणि पाऊस भरपुर व चांगला विभागुन पडणारा असेल तर तेथे शेतीची भरभराट झालेली आढळते.

निरनिराळया नैसर्गिक घटकांवरुन कोणत्या भुप्रदेशात काय पिकविता येणे शक्य आहे ते सांगता येईल. परंतु कोणती पिके अगर शेतीचा प्रकार किफायतशीर होईल ते सांगता येणार नाही. ते वेळोवेळी बदलणाऱ्या आर्थिक घटकांवरुन ठरवावे लागेल हे घटक म्हणजे उत्पादन खर्च, विक्री खर्च, दुसऱ्या उद्योगधंद्यांशी स्पर्धा, शेती उत्पादनाच्या

सापेक्ष किंमतीत होणारा बदल, अवास्तव उत्पादन वाढ व घट यांचे दृष्टचक्र, जमिनीच्या किंमती, उपलब्ध भांडवल, मजुर पुरवठा, पिकावरील कीड व रोग आणि वैयक्तीक घटक वगैरे.

२०११ —

कापुस या पिकाचा २०११ या सालातील किंमतीतील बदलाचा आढावा घेतला तर असे लक्षात येते की, नोव्हेंबर या महिन्यांत सर्वात जास्त किंमतीमध्ये वाढ झाली असुन ती ४१५३ रुपये एवढी झाली होती तर सर्वात कमी किंमत ही डिसेंबर या महिन्यात ३६८२ एवढी झाली असुन ती संपुर्ण वर्षातील कमी किंमत आहे.

सामान्यत: ही वारंवार होणारे किंमतीमधील बदल हे अचानक एखाद्या पिकाची वाढलेली मागणी किंवा अचानक कमी झालेली मागणी यावर अवलंबुन असते. तसेच राज्यामध्ये, देशामध्ये आणि इतर देशामधील त्या पिकांची उत्पादकता यावरही ते अवलंबुन असते.

२०१२ —

कापुस या पिकातील २०१२ या वर्षातील किंमतीतील बदलाचा आढावा घेतला तर असे लक्षात येते की, जानेवारी या महिन्यांत किंमतीत वाढ आहे. परंतु फेब्रुवारी पासुन किंमतीमध्ये घट झालेली दिसुन येते. तर डिसेंबर या महिन्यांत सर्वात जास्त किंमत ही कापुस या पिकाला मिळाली असुन ती किंमत ४०५१ रुपये एवढी मिळाली होती. तर सर्वात कमी किंमत ही कापसाला जनु या महिन्यात ३१०० रुपये एवढी मिळाली होती ही किंमत २०१२ या सालातील कापसाला मिळालेली सर्वात कमी किंमत आहे.

२०१३ —

२०१३ या सालातील कापुस या पिकाला मिळणाऱ्या किंमतीचा आढावा घेतला तर असे लक्षात येते की, जानेवारी या महिन्यांपासुन किंमतीत वाढ होतांना दिसते तर एप्रील या महिन्यात किंमतीची वाढ ही सर्वात जास्त झालेली असुन ती ४९०० रुपये एवढी झाली आणि सर्वात कमी किंमत ही कापसाला २०१३ या वर्षात जानेवारी या महिन्यांत मिळाली असुन ती किंमत ३८६६ रुपये एवढी आहे.

२०१५ —

२०१५ या सालातील कापुस या पिकाच्या किंमतीत होणाऱ्या बदलाचा आढावा घेतला तर असे लक्षात येते की, सर्व महिन्यात किंमत ही कमी असुन डिसेंबर या महिन्यात ४५३० ही सर्वात जास्त किंमत कापुस या पिकाला मिळाली आहे. तर सर्वात कमी किंमत ही नोंव्हेंबर या महिन्यातमिळाली असुन ती किंमत ४१५० रुपये एवढी आहे.

वार्षीक सरासरी २०११—२०१५




वार्षीक सरासरी २०११—२०१५

| वर्ष | वाढ | घट |
|---|---|---|
| २०११ | ४१५३ | ३६८२ |
| २०१२ | ४०५१ | ३१०० |
| २०१३ | ४९०० | ३८६६ |
| २०१५ | ४५३० | ४१५० |

कापुस पिकांचा संपुर्ण वर्षाचा विचार केला तर म्हणजे २०११, २०१२, २०१३ व २०१५ या वर्षाचा आढावा घेतला तर असे लक्षात येते की,

२०१३ या वर्षात वार्षिक सरासरी ही सर्वात जास्त असुन ती ४५०८ रुपये एवढी आहे. तर २०१२ या सालामध्ये वार्षिक सरासरी ही सर्वात कमी झालेली आहे बाकी वर्षाच्या तुलनेत ती ३५९२ रुपये एवढी झाली होती. बाकी वर्षामध्ये किंमत ही सर्वसाधारण आढळनु येते. प्रस्तुत आलेखाचा अभ्यास केला तर असे लक्षात येते की, कापसाच्या किंमतीत जास्त फरक पडला नसुन किंमतीत थोडाफार चढउतार जाणवतो.

## निष्कर्ष :—

प्रस्तुत शोध निबंधाकरिता अमरावती विभागातील कापुस या पिकाची २०११ ते २०१५ या ५ वर्षामधील होणाऱ्या बाजार भावाच्या किंमतीत होणारा बदल याचा अभ्यास केला याचा अभ्यास करीत असतांना पिकांच्या किंमतीत होणरी वाढ व घट यांचे सखोलपणे अध्ययन करीत असतांना पुढील निष्कर्ष येतात.

१. कापुस या पिकांच्या किंमतीच्या तुलनेत असे आढळले की कापसाला सर्वात जास्त किंमत ही २०१३ या वर्षात मिळाली आहे.
२. कापुस पिकांच्या किंमतीत घट ही २०१२ या वर्षात झालेली आहे.
३. कापुस पिकाच्या बाजारभावाचा अभ्यास करतांना असे आढळले की साधारणत: नोव्हेंबर डिसेंबर या महिन्यात कापसाचे भाव हे वाढले आहे.
४. कापुस या पिकाचे बाजारभाव किंमत सुरवातीला कमी होती नंतर किंमत वाढली व पुन्हा त्यात घट झाली.

## संदर्भ ग्रंथ सूची :—

१) जयकुमार मगर (१९९०) — भारताचा भूगोल, विद्या प्रकाशन नागपुर
२) डॉ. सुरेश फुले (२०१२) — कृषी भूगोल, विद्याभारती प्रकाशन, लातुर
३) माजिद हुसेन (२०००) — कृषी भूगोल, रावत प्रकाशन, जयपुर
४) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन (२०१२) — अमरावती जिल्हा, महाराष्ट्र शासन, अर्थ व सांखीकी संचनालय,विभाग कार्यालय, अमरावती
५) आपला अमरावती जिल्हा — महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक मंडळ इयत्ता ३ री
६) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी (२०१३ — २०१४) — अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन
७) www.amravati district location map
८) www.mahaagri.gov.in
९) www.mahadesh.gov.in

❖❖❖

# श्री संत अच्युत महाराज यांच्या साहित्यातील वाड्.मयीन सौंदर्य

***डॉ. साजिद के. शाह***

***सहायक प्राध्यापक तथा मराठी विभाग प्रमुख,***

***श्री डॉ. आर. जी. राठोड कला व विज्ञान महाविद्यालय,***

***मूर्तिजापूर, जिल्हा- अकोला.***

***मो.न.९८५०३९४५७१, ८७८८६००८५६*** Email: shahsajid7047@gmail.com

## *सारांश :-*

*साहित्य हा मानवी* संस्कृतीचा अविभाज्य आणि महत्त्वपूर्ण घटक आहे. भाषेच्या उत्पत्ती नंतर मानवी जीवनामध्ये जी उत्क्रांती घडून आली त्यात साहित्याने मोलाचा वाटा उचलला आहे. महाराष्ट्रातील साधुसंतांनी धार्मिक, सामाजिक आधी स्वरूपाचे साहित्य रचून मराठी वाङ्मय प्रांतात भर घालण्याचे काम केले. त्यात *अलीकडच्या* काळातील *वैदर्भीय* असलेल्या *श्री* संत अच्युत महाराज यांचे *नाव प्रामुख्याने* घ्यावे लागेल. संत अच्युत महाराजांना मराठी भाषेची सखोल जाण असल्याचे त्यांच्या साहित्यातून दिसून येते. *भाषेचे* सौंदर्य वाढविणारे जे वा*ड्.मयीन* अंग असतात त्याचा अभ्यास महाराजांनी केलेला होता. त्यांच्या गद्य-पद्य या साहित्यातून त्याचा प्रत्यय येतो. त्यांच्या साहित्यातील वाड्.मयीन सौंदर्य लक्ष वेधून घेते.

***बीज शब्द:-*** *साहित्य,* वाड्.मयीन *सौंदर्य,* भाषाशैली, *अलंकार,* वृत्त, छंद *इ.*

***उद्दिष्टे:-*** *संत अच्युत* महाराज यांच्या साहित्यातील वाड.*म*यीन सौंदर्य व त्याचे *अंतरंग समजून घेणे.*

***गृहितके:-*** *संत अच्युत महाराज यांच्या* एकूण साहित्यामधून त्यांची मराठी भाषेची जाण *दिसून येते.* त्यांच्या साहित्यातून भाषिक व *वाड्.मयीन* सौंदर्य व्यक्त झाले आहे.

***संशोधन आराखडा:-*** *प्रस्तुत शोधनिबंधासाठी द्वितीय तथ्य संकलन पद्धतीचा अवलंब करण्यात आला. त्यासाठी वर्णनात्मक विश्लेषण पद्धती वापरण्यात आली.*

***साहित्याचे पुनर्विलोकन:-*** *प्रस्तुत शोधनिबंधासाठी ग्रंथ, पुस्तके, दैनिक वृत्तपत्रे, मासिके, इंटरनेट इत्यादींचे पुनर्विलोकन करण्यात आले.*

## *प्रस्तावना :-*

'*विदर्भ माऊली* ' *या यथार्थ नामाभिधानाने ज्यांचा उल्लेख* भाविकभक्त *व अभ्यासकांमध्ये* केला जातो, असे विदर्भातील थोर आध्यात्मिक पुरुष, कृतिशील समाजसुधारक, ' *संतत्व* ' *या* उपाधीला सार्थ

ठरविणारे, संत अच्युत महाराज हे होत. महाराजांचे साहित्य सर्वांगीण स्वरूपाचे असून ते प्रत्यक्ष ानुभव ाच्या *ज्ञोतभ*ट्टीत *तावुन-सलाखून* निघाले आहे. *सामान्य* जनतेच्या उद्धाराची तळमळ त्यांच्या लेखणी व वाणीतून अभिव्यक्त होत असायची. *महाराजांनी संस्कृत* मधील प्राचीन धर्मग्रंथांना सर्वसामान्य जनतेच्या आध्यात्मिक सोयीकरिता मराठी भाषेत भाषांतरित करण्याचे मोलाचे काम केले. त्या व्यतिरिक्त त्यांनी स्वरचित अनेक ग्रंथांची प्रासादिक भाषेत निर्मिती केली. साहित्याचे विविध प्रकार त्यांनी सहजगत्या हाताळले. *मराठी* व्याकरणाची त्यांना पर्याप्त जाण होती. *मराठी* काव्याची परंपरा त्यांनी जतन करण्याचे काम केले आहे. महाराजांच्या साहित्यात वा*ङ्.म*यीन सौंदर्य आढळून येते.

## *संत अच्युत* महाराजांचे साहित्य प्रेम :-

*संत अच्युत महाराजांनी रचलेले वाङ्.मय इतर संत साहित्याहून वेगळे असल्याचे दिसून येते. त्यांनी आपल्या लेखनाची सुरूवात धार्मिक ग्रंथांपासून केली होती. अनेक प्राचीन धर्मग्रंथ संस्कृत भाषेतून मराठीत भाषांतरित केले. ज्यात श्रीमद्भागवत, वेद वाङ्.मय, महाभारत ( महाभारताच्या* एक ते पाच खंडांची रचना केली.) *तसेच वेगवेगळ्या दैवतांची स्त्रोते, आराधना पुष्पे यांचा समावेश तर आहेच, त्याशिवाय आधुनिक मराठी वाङ्.मयात लोकप्रिय असलेल्या नाट्य लेखनाचा समावेश त्यांनी करून ठेवला आहे. स्वतःची* रोजनिशी त्यांच्या काव्यातून व्यक्त झाली आहे.

*शके १२१२ मध्ये ज्ञानदेवांनी ब्रह्मविद्येचा सुकाळ करण्यासाठी गीतेचे तत्वज्ञान ज्ञानेश्वरीच्या रूपाने मराठीत आणले होते. तेच खऱ्या अर्थाने संत साहित्य लेखनाची सुरुवात म्हटली जाते. त्यानंतर अनेक संतांनी धार्मिक ग्रंथांवर लेखन केले आहे. एकनाथांनी भारूड यांसारखे नवे साहित्य निर्माण केले होते. नाट्य लेखनाचा प्रयोग आधुनिक काळात श्री संत अच्युत महाराजांनी केलेला दिसतो. त्यांनी जे सामाजिक, धार्मिक व तत्सम प्रकारचे कार्य केले, त्याला रोजनिशी प्रमाणे नोंदवून ठेवले आहे. महाराजांची गावोगावीची प्रवचने, त्यांचे दैनिक कार्य या सर्वांच्या नोंदी त्यांच्या ग्रंथांमध्ये आढळतात. महाराजांनी घेतलेल्या शिबिरांचे वृत्तांत त्यांनी ग्रंथरूपाने प्रकाशित केले आहेत. त्यांनी घेतलेल्या धार्मिक कार्यक्रमांचा वृत्तांतही लिखित स्वरूपात करून ठेवला आहे. त्या अर्थाने त्यांचे संपूर्ण कार्य रोजनिशीचा एक भाग बनला आहे. ज्याची सत्यता स्पष्ट होण्यात मदत मिळते. महाराजांनी मराठीबरोबरच संस्कृत आणि हिंदी भाषेतही लेखन केले आहे. यापूर्वी मराठी आणि हिंदीत संत नामदेवांनी लेखन केले होते. एकनाथांनी मराठी बरोबरच संस्कृत मध्ये लेखन केले आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी मराठी व हिंदीत विपुल लेखन केले आहे. परंतु श्री संत अच्युत महाराजांनी तिन्ही भाषेत वाङ्.मय निर्मिती केली आहे. ज्यात राष्ट्रभाषा हिंदीचा प्रामुख्याने समावेश करता येईल.*

*महाराजांनी मराठीबरोबरच हिंदीत रचलेली भजने राष्ट्रसंतांच्या हिंदी प्रेमाची आठवण करून देणारी आहेत. महाराजांच्या साहित्याचे आणखी वेगळेपण म्हणजे त्यांनी सुविचारांची निर्मिती केली आहे. त्यांच्या विचारांना ग्रंथरूपाने प्रकाशित करण्यात आले आहे. संतांचे विचार, त्यांचे आचार हे खरेतर सुविचारच असतात. परंतु त्याला संकलित स्वरूप क्वचितच प्राप्त झालेले असते. महाराजांच्या विचारांना संग्रहित करण्यात आलेले आहे.*

*नाटकांच्या संदर्भात त्यांच्या वेगळेपणाचा आणखी एक पैलू म्हणजे त्यांनी लिहिलेली नाटके ते स्वतः प्रायोगिक पद्धतीने सादर करायचे. अमरावती परिसरातील यात्रांच्या दरम्यान तथा विविध धार्मिक*

*कार्यक्रमांच्या वेळी महाराजांची नाटके सादर व्हायची. अर्थात कोणत्याही संताने आपली नाटके प्रायोगिक स्वरूपात सादर केलेली आढळून येणे कठीण आहे.*

*महाराजांनी विदर्भातील विविध संतांचे चरित्र लिहून ठेवले आहे. हे देखील त्यांच्या वाङ्.मयीन वेगळेपणाचे महत्त्वाचे अंग आहे. राष्ट्रसंतांच्या ग्रामगीतेवर त्यांनी लिहिलेला ' तत्वसार ' हा सुद्धा वेगळेपणाचा भाग मानावा लागेल. महाराजांनी रचलेले आध्यात्मिक शिकवण देणारे वाङ्.मय अतिशय सोप्या भाषेत रचलेले आहे. त्यांचे धार्मिक प्रबोधन भाविकांसाठी उपयोगी आहे.*

*समाजासाठी अनेकदा वाङ्.मयीन भाषा हा अडथळा ठरत आलेला आहे. परंतु भाषेची जाणीव असणाऱ्या महाराजांच्या वाङ्.मयाकडे पाहून हे सहज स्पष्ट होते, की त्यांनी समाजाला समजेल अशीच सर्वसामान्य लोकांची भाषा निवडली. मराठी भाषेतील प्रचलित शब्दांचाच त्यांनी उपयोग केलेला आहे. महाराजांचे वाङ्.मय विविधांगी आहे. त्यात रंजनापासून तर प्रबोधनापर्यंतच्या सर्वच बाबींचा समावेश आहे.*

## ***लेखनाचा* व्यासंग :-**

"*दिसा* माझी काहीतरी ते लिहावे | प्रसंगी अखंड वाचीत *जावे* " हा समर्थांचा उपदेश श्री संत *अच्युत* महाराजांनी जणू आयुष्यभर पालन केला होता.

*श्री संत अच्युत महाराज हे साहित्योपासक संत होते. त्यांनी अहोरात्र साहित्य लेखनाचा ध्यास घेतलेला होता. इतक्या प्रचंड संख्येने मोठमोठे ग्रंथ रचणे यासाठी अथक परिश्रमांची गरज होती. महाराजांनी हे कार्य लीलया पेलले. आपल्या आयुष्याचा प्रत्येक क्षण लोकोद्धरासाठी उपयोगात आणला. कधी वाणीतून तर कधी लेखणीतून आपले कार्य सातत्याने सुरू ठेवले. ते सतत लेखन करीत राहायचे, अखंडित लेखन कार्यात मग्न असायचे. त्यांच्या साहित्यात जाणवणारी चतुरस्त्रता त्यांच्या साहित्य साधनेचे फलित आहे. त्यांचे ग्रंथ अध्ययन केल्यानंतर त्यांच्या शब्दसामर्थ्याची जाणीव होते. मराठी भाषेचे व्याकरण त्यांना सहजगत्या ज्ञात झाले होते. त्यांनी वेगवेगळ्या अलंकारांचा, वृत्तांचा वापर केलेला आहे. त्यांच्या साहित्यात रस, भाव आधी दिसून येतात. काव्यात असणारे माधुर्य, ओज, प्रासादिकता या गुणांचा वापर त्यांच्या लेखणीतून स्वाभाविकपणे झालेला आहे.*

*महाराजांचे ग्रंथप्रेम वाखाणण्याजोगे आहे. त्यांना लेखनाचे-वाचनाचे वेड होते. ते ग्रंथप्रेमी होते. त्यांनी आपली पुस्तके काळजीपूर्वक सांभाळून ठेवलेली आहेत. त्यांच्या कित्येक पुस्तकांना वेस्टने चढवलेली होती. महाराजांची हस्तलिखिते ही त्यांच्या व्याकरण ज्ञानाची व भाषा प्रेमाची ग्वाही देतात. त्यांचे सर्वच विषयावर वाचन असल्याचे त्यांच्या साहित्यातून स्पष्ट होते. अभ्यासातूनच महाराजांचे व्यक्तिमत्त्व अधिक प्रभावी होत गेले असावे. शास्त्राचे चिंतन करून बुद्धीच्या कसोटीवर तपासून त्यांनी समाजासाठी शब्दरचना केली होती. वाङ्.मयाचे चिंतन, मनन यामुळे त्यांच्या लेखनाला अधिकाधिक वाव मिळत गेली. त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिकाधिक तेजपुंज होत गेले. म्हणूनच त्यांच्या कर कमलातून शब्द पुष्पांचा वर्षा होत गेला!*

*ग्रंथ वाचनाचे महत्त्व पटवून देताना महाराज म्हणायचे, "पुस्तक माणसाला समृद्ध करतात, आयुष्य समजण्यास ग्रंथांची मदत होते. ग्रंथ हेच जगण्याचे बळ देऊन जगण्याचा अर्थ समजावून सांगतात. वाचनामुळे मनाला समाधान मिळते. मन पिसाप्रमाणे हलके हलके होते. जगण्याकडे, आयुष्याकडे पाहण्याची नजर मिळते. आयुष्यामध्ये जीवन जगत असताना प्रिय माणसांचा कदाचित विरह सहन करावा लागतो. परंतु पुस्तके मैत्री तोडत नाहीत. ती सदैव आपल्या समोर आपल्यासाठी असतात आणि आपले*

*व्यक्तिमत्त्व अधिक समृद्ध होते. जगात कोठे काय चालले याची जाणीव वाचनामुळे होते. वाचनातून अभ्यासू व्यक्तीला भूतकाळ, वर्तमानकाळ दोन्ही नजरेसमोर उभे करता येतात. ग्रंथ वाचून अडचणींवर मात करण्याची कला शिकायला मिळते. त्याचप्रमाणे कोवळ्या मनाला सुसंस्कारित करून मनातले दुःख, निराशा त्यांना पळवून लावता येत असते. ग्रंथ वाचनामुळे आपल्या अज्ञानाचा अंधःकार नष्ट होत असतो. ग्रंथा इतका प्रांजळ आणि निष्कपटी गुरु दुसरा कोणीही नाही...."* [१]

## ***छंदाची निवड*** : -

*संतांनी* मराठी व*ाङ्.मयात* खूप मोठी भर घालण्याचे कार्य केले आहे. *ओवी आणि अभंग हे मराठी संतांचे अत्यंत आवडते छंद प्रकार राहिले आहेत. ज्ञानेश्वरांनी तर ओवी छंद प्रकाराचा एका अर्थाने सुकाळ केला. ' विदर्भ* माऊली ' *म्हणून* सर्वश्रुत असणाऱ्या श्री संत अच्युत *महाराजांनीही ' ओवि' या छंद प्रकाराला आपली पहिली* पसंती *दर्शविली.*

*महाराजांनी भागवतगीतेचा मराठी भावार्थ आपल्या* सिद्ध हस्त लेखणीतून आकारास आणला. *त्या प्राचीन ग्रंथापासून तर इतर असलेल्या धार्मिक, सामाजिक स्वरूपाच्या ग्रंथांमध्ये त्यांनी* 'ओवी' *या छंदाची निवड केलेली आहे. त्या अर्थाने ओवी हा छंद त्यांचा आवडता असावा हे स्पष्ट होते.*

*महाराजांनी रचलेली भजने ही वेगवेगळ्या वृत्तामध्ये बद्ध झालेली आहे. त्यातून त्यांचे मराठी भाषिक व* व्याकरणाचे *ज्ञान स्पष्ट होते.*

## ***भाषात्रयींची वाङ्.मयीन* सेवा :-**

'*त्रिभाषा सूत्र' हा* महाराष्ट्रातील विचारवंतांनी *व इतर* संतांनी जोपासलेला महत्त्वपूर्ण वारसा आहे. त्यालाच पुढे नेण्याचे काम महाराजांनी केले आहे. *महाराजांनी* संस्कृत, मराठी, *हिंदी* या भाषात्र*यीं*चा सुरेख संगम आपल्या साहित्यसेवेत उत्तम प्रकारे केला आहे. *संस्कृत* मधील प्राचीन धर्मग्रंथ त्यांनी मराठी भाषेत भाषांतरित करण्याबरोबरच राष्ट्रीय भाषा हिंदीतही ग्रंथरचना केली आहे. *हिंदी* भाषेतून आपल्या विचारांना महाराष्ट्र सीमेच्या पलीकडे पोहोचविणे हा त्यांचा हेतू त्यामागचा असावा. मराठी भाषेत महाराजांनी सर्वाधिक ग्रंथरचना करून मराठी भाषा जाणणाऱ्यांसाठी आपले विचार लिहून ठेवले.

## ***वृत्तांची निवड*** :-

*काव्य* लेखनासाठी वृत्त हा महत्त्वपूर्ण प्रकार मानला जातो. वृत्तांचे अक्षर गणवृत्त व मात्रावृत्त अशा दोन उपप्रकारांमध्ये विभाजन केलेले आहे. त्यांचा सांगोपांग अभ्यास करून महाराजांनी आपल्या काव्यलेखनात वृत्तांना चपखल बसविले. *महाराजांनी आपल्या काव्यरचनेमध्ये वेगवेगळ्या वृत्तांची निवड केलेली आहे. महाराजांचे मराठी* भाषेविषयीचे ज्ञान व व्याकरणाची जाण *व्यासंगी* असल्या*ची* आढळून येते.

"*नमो मातृभूमी जिथे जन्मलो मी*
*नमो मातृभूमी जिथे वाढलो मी*
*नमो धर्मभूमी तुझीयाच कामी*
*पडो देह माझा सदा ती नमी मी.*" [२]

*महाराजांनी* 'भूमीवंदन' *या शीर्षकाखाली उपरोक्त काव्य रचले आहे. त्यासाठी त्यांनी* 'भुजंगप्रयात' *या वृत्ताची निवड केली होती.*

*" नमन गुरु पदाला भाव ठेवून पायी*
*विमन मन असुदे मागणे अन्य नाही*
*जगत रूप तुझे हे काही सेवा घडू दे*
*हरी हरी मुखी गाता देह कार्यी घडू दे. "* [३]

*यामध्ये महाराजांनी 'मालिनी' या वृत्तामध्ये हा प्रार्थना श्लोक रचलेला आहे.*

*"ध्याता भागवतास हो सह्रदयता विद्रोह जावो लया*
*गाता भगवंतास सर्व जनता लाभो स्वधर्मा दया*
*मागे भागवतास अच्युत चारित्र्य दे उज्वल*
*माथा भागवतास तुकविता होऊन सदा मंगल "* [४]

*या मंगलध्यान प्रार्थनेमध्ये महाराजांनी 'शार्दूलविक्रीडित' या वृत्ताचा उपयोग केलेला आहे.*

*महाराजांनी ' श्रुतीफल ' या शीर्षकाखाली 'वसंततिलका' या वृत्तामध्ये रचना केलेली आहे*

*" श्रीकृष्ण नाम सुरभी भरपूर प्याला*
*तो ब्रह्म सिंधुरस असा सागरी पूर्ण नहाला*
*भक्ती तया मिळत असे सतज्ञानदृष्टी*
*तो रक्षी धर्म करी शांत अखिल सृष्टी."* [५]

*महाराजांनी ' मालिनी ' वृत्तामध्ये असलेले भजन अत्यंत प्रासादिक आहे.*

*"कटि कर धरूनी हा पाय विटेस लावी*
*तटी निकट भीमेच्या पुंडलिकास भावी*
*सदैव हृदय यांचे सावळे ध्यान लागो*
*त्रिभुवनी प्रिय वाटू पंढरीनाथ जागो"* [६]

*महाराजांनी रचलेल्या काव्यात अनेक वृत्तांचा समावेश केलेला आहे.*

*महाराजांची वृत्ती आध्यात्मिक स्वरूपाची आहे. त्यांना बालवयापासूनच आध्यात्माचा नाद लागलेला होता. आपल्या सर्वस्वाचा त्याग करून सत्याच्या शोधात निघालेले महाराज खरे त्यागी होते. त्यांचा मराठीबरोबरच संस्कृत व हिंदी भाषेचा दांडगा व्यासंग होता. म्हणूनच त्यांनी संस्कृत मधील अनेक धर्मग्रंथ प्राकृत मराठी भाषेत ओवीबद्ध केलेली आहेत. त्यासाठी त्यांनी निवडलेली भाषा अतिशय साधी, सोपी व अल्पाक्षरी स्वरूपाची आहे. छोटी-छोटी वाक्य समजण्यास सोयीची आहेत. महाराजांनी* आपल्या सामाजिक नाटकांमध्ये विदर्भातील बोलीभाषेचा उत्तम उपयोग करून घेतला आहे. पात्रांच्या तोंडचे संवाद प्रेक्षकांना समजण्यासाठी अनुकूल होते. *महाराजांची शब्दसंपदा विपुल आहे. तरीसुद्धा त्यांनी सर्वसामान्य वाचकांना, भाविक भक्तांना समजेल अशा शब्दांची निवड आपल्या सबंध साहित्यात केलेली आढळून येते. समाजातील बोलीभाषेत प्रचलित असणाऱ्या अनेक शब्दांचा वापर त्यांनी केलेला आहे. त्यांना व्याकरणाची पुरेशी जाण होती; हे सुद्धा त्यांच्या रचनेवरून लक्षात येते. महाराजांनी प्रमाण भाषेबरोबरच वऱ्हाडी बोलीभाषेचा ही आपल्या नाटकांमध्ये यशस्वी प्रयोग केलेला दिसून येतो.*

## *समारोप* :-

*बहुआयामी* व्यक्तित्वाचे धनी असणाऱ्या श्री संत अच्युत महाराजांनी सामाजिक, धार्मिक, साहित्यिक अशा विविध *स्वरूपाचे* कार्य केले आहे. धार्मिक सेवा करण्याबरोबरच महाराजांनी लोकोपयोगी अनेक उपक्रम हाती घेतले होते. त्याचबरोबर त्यांची लेखणी अहोरात्र झिजत असायची. *मराठी* भाषे*ची* त्यांनी केलेली साहित्य सेवा मराठी साहित्य क्षेत्रात मोलाची आहे. महाराजांचे व्यक्तिमत्व केवळ आध्यात्मिक क्षेत्रापुरते मर्यादित नव्हते; तर ते एक प्रतिभा संपन्न साहित्यिकही होते. त्यांच्या साहित्य सेवेवरून अभ्यासकांना त्यांची दखल एक दर्जेदार लेखक, कवी म्हणून घेणे अपरिहार्य ठरेल !

## *निष्कर्ष* :-

१) *संत अच्युत* महाराजांना साहित्य लेखनाचा दांडगा व्यासंग होता.

२) *त्यांनी* साहित्याचे विविध प्रकार सहज हाताळले.

३) *संस्कृत*, मराठी, हिंदी या भाषेत महाराजांचे साहित्य आहे.

४) *महाराजांना मराठी* व्याकरणाची उत्तम जाण होती.

५) *महाराजांनी काव्यपरंपरेतील* विविध वृत्तांचा चपखल उपयोग साहित्यात करून घेतला आहे.

६) *महाराजांचे* विविधांगी साहित्य नवीन पिढी पुढे आदर्श आहे.

## *संदर्भ* ग्रंथ सूची :-

*१) प्रा. डॉ. निमकर अनिल, ग्रामविकासाचे प्रणेते- श्री संत अच्युत महाराज अच्युत धर्मग्रंथ प्रकाशन तपोवन, अमरावती. प्रथमावृत्ती ,डिसेंबर २०१३ पृ. क्र.५९*

*२) संपा. रा. म. देशपांडे,अच्युत दर्शन-श्री सहस्त्रचंद्र दर्शन महोत्सव, श्री संत अच्युत महाराज सत्संग मंडळ, नागपूर. प्रथमावृत्ती २००३. प्रातध्यान*

*३) तत्रैव ,प्रार्थना श्लोक.*

*४) संपा. गौरव ग्रंथ समिती, गौरव ग्रंथ- श्री संत अच्युत महाराज, सुभाष मुद्रणालय, तपोवन, अमरावती, प्रथमावृत्ती १९८५.पृ. क्र.५७*

*५) तत्रैव ,पृ. क्र.५९*

*६) श्री संत अच्युत महाराज, स्वानुभव भजन माला, अच्युत धर्मग्रंथ प्रकाशन, तपोवन,अमरावती. प्रथमावृत्ती २०१६.पृ. क्र. ११७*

❖❖❖

# नव्वदोत्तरी कवितेतला शेतकरी

डॉ. विजय जाधव
राजस्थान महाविद्यालय, वाशीम.
भ्रमणध्वनी – ९८८१५२७६६०

सामाजिक प्राणी म्हणून प्रत्येकाला आपापले अधिकार मिळायला हवेत. ज्याला त्याला आपापल्या अधिकाराचा निर्धोकपणे वापर करता यायला हवा. यानुसार, मानवी हक्क अधिकारातून शेतकऱ्यांना वजा करता येत नाही. आजवर व्यापारी, शासनांन शेतकऱ्यांची उपेक्षाच केलेली आहे. त्यांनाही शोषकांनी आपलं भक्ष्यच बनवलेल आहे. म्हणजे, त्यांच्या अज्ञानाचा पुरेपूर गैरफायदा घेण्यात आलेला आहे. तो संकटांत पडला की मृत्यूला कवटाळत राहिला. जर सांगण्यात येते त्याप्राणे भारत हा कृषिप्रधान देश असेल, तर शेतकरी हा अग्रक्रमांकाचा मानकरी ठरतो. पण प्रत्यक्षात असं कुठं आहे का? चालत्या बोलत्या शेतकऱ्यांचचं प्रत्यही प्रेतांमध्ये का रुपांतर होत आहे? मृत्यूनंतर वारसदारांना शासकीय मदतीचे पर्याय उपलब्ध असल्यामुळं शेतकऱ्यांची मरणमालिका थांबल का?

शेतकरी हा शब्द भरगच्च अशा प्रश्नांच्या गुंत्यात अडकलेला आहे. ही गोष्ट नव्वदोत्तरीतल्या काही निवडक कवींनी हेरली. ह्या प्रश्नांची त्यांना जाण आली. त्यातूनच शेतकऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून त्यांनी शब्दांनी वाचा फोडली. त्यातलंच एक नांव म्हणजे इंद्रजित भालेराव. ते आपल्या कवितेला असं बोलतं करतांत –

‘इथं डब्यात तुला साखर लागते गोड
तिथं शेतात माझ्या बापाच्या हाताला फोडं
पण त्याच्या घामाचा भाव लय सस्ता
माझ्या गावाकडं चल माझ्या दोस्ता.’

प्रयत्न करुनही जाग येत नसल्याचं इंद्रजित भालेराव यांनी बघितलं. शेतकऱ्यांची अवस्था अधिकाधिक बिकट होत चाललेली, अशा वेळी काय करावं? सरळ सरळ विद्रोहाला स्थान दिलं जाते,

‘शीक बाबा शीक आता लढायला शीक
कुणब्याच्या पोरा आता लढायला शीक
आत्महत्या करु नको हत्या करायला शीक.’

कवी विठ्ठल वाघ यांचंही ध्यान शेतकरी प्रश्नानं आकर्षिलेलं आहे. खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाशी संबंधित अर्थव्यवस्था आली. अनेक संकटं झेपावत राहिली. ओले आणि कोरडे दुष्काळही खच्चीकरणासाठी टपून बसलेले. यावर कवी तोंड उघडतो,

‘या मेरीहून त्या मेरीलाके
मया काय काय नव्हतं पेरलं
बांड बोवाऱ्या वाऱ्याचा पाणीच कसं फिरलं.’

पुढं आणखी एका कवितेतून वाघांनी विदारक चित्रणं केलेल आहे –

‘आमी जलमलो मातीत किती होनार गा माती
खापराच्या दिव्यात या कधी पेटनार वाती
पास लावून जल्लद चाले कोनाचा वखर
खाली ढेकलाच्या वानी आम्ही होतो चुरचूर
फुलवल्या कापसाले चद्र चोरु चोरु पाहे
तरी माय मावलीची मांडी उघळीच राहे
उभं अभाय फाटलं कसी झाकनार छाती.’

नोकरदाराला दर माहा पगार मिळतो, व्यापारीवर्ग हा प्रत्यही पैसे मोजतो. आणि शेतकऱ्याचा संबंध ठराविक हंगामांशी येतो. निसर्गानं मैत्री केली तर चेहऱ्यावर हास्य, अन्यथा ओसाड माळरानात आणि शेतकऱ्यांच्या चेहऱ्यात फारसा फरक उरत नाही. बहुतांश शेतकऱ्यांना सांवकारांवर अवलंबून राहावं लागते. कापूस पिकविणाऱ्यांच्या घरातल्या स्त्रियांना आपल्या अब्रूरक्षणार्थही पुरेसं कापड मिळत नाही. म्हणून कवी क्रांतीलाच प्राधान्य देतो,

‘ताहा पोटातली आग पेट घेते आंगभर
मंग सोंगले फनाची अनी होते धारदार

कोनं सांगावं रगत तिले लागणार किती
खापराच्या दिवयातून मंग पेटतील वाती.'

कवीनी शेतकऱ्यांच्या नानाविध दुःखांना अबोल अवस्थेत ठेवलं नाही हे नव्वदोत्तरी कवितेचं विशेष. हया कवितेत विद्रोहाबरोबरच सार्थ आशावादही पेरला —

'कोरडे ते शेत माझे ओलित झाले पाहिजे
मुक्या जीवनाचे शब्द या बोलीत आले पाहिजे.'

तरीही, आपलीच झोळी भरण्यात मश्गुल असलेल्या शासनाच्या त्वचेला थरकाप सुटत नाही. शेतकऱ्यांच्या जगण्या—मरण्याची आहे कुणाला पर्वा? विठ्ठल वाघ यांनी 'साहेबराव पाटील' हया कवितेत मांडलं, की साहेबराव पाटलानं आत्महत्या केल्यानंतर बाकीच्या शेतकऱ्यांनी शेतात काय पेरावं? कवितेतला हा त्वेष पाहण्यासारखा आहे,

'आता कापूस ज्वारी पेरसाल तं लेक हो हराममौतीत मरसान
आता पेरा तासातासानं लोखंडी दगडी गोटे
चारी मेरीनं बभुईचे खम्मन काटे...'

संघटित होउुन शेतकरी हा पेटून उठला पाहिजे, असं कवीला वाटत आहे. सरकारला धारेवर धरण्याची परिस्थिती निर्माण झालेली आहे. अशाच विचारातून अजय कांडर यांनी असं हे शब्दचित्र रेखाटलं,

'ताठ कण्यानं उभं राहण्याचा अंदाज घेतला
शेवटी आपण उभं राहूच शकणार नाही
हे लक्षात आल्यावर
त्यांनी मातीचाच सौदा केला.'

प्रचंड उद्विग्नता मांडल्यावर कवी पुढं म्हणतो,

'गुडघाभर गाडून घेतल्याशिवाय चिखलात
मतीतून उगवून येणाऱ्या दाण्याची
रक्ताचं केलं पाणी तरी
रास कधीच राहिली नाही उभी.'

शेतात राबताना नफ्यापेक्षा तोट्यासह आपोआपच शेताचा वारसा हा मागच्या पिढीकडून पुढच्या पिढीकड चालत असल्याचं विदारक वास्तव कवीच्या नजरेतून सुटत नाही. शेतकरी तोटयात आणि शेटजी फायद्यात याचा तीव्र संताप कवीमनात आहे.

शेतकरी हा तसा निराधारच. कर्मचाऱ्यांना टप्प्याटप्प्यानं वेतन आयोनाचे वाढीव फायदे मिळतच राहतात. शेतकऱ्यांना काय मिळते? ढगांतून पाऊस नाही पडला तर तो शेतकऱ्यांच्या डोळयांतून पडतो. त्याची आर्थिक अवस्था कोलमडली की मग त्याची मानसिक अवस्थाही शाबूत राहत नाही. अन्नपाण्यासाठी त्याला भटकंती स्वीकारावी लागते, यावर 'पाणी' हया कवितेतून सुधाकर पवार व्यक्त होतात,

'कोरड्याच वाटेनं
गाव घरी परतलं
उरला चिमणचारा घेऊन
गाव चालून पडलं नंतर
दहा दिशांना
काही मातीत
तर काही गेले आकाशात
पाणी....पाणी म्हणत..'

देशातल्या सर्वसामान्यांचचं अतोनात शोषन करणारे हे शत्रू भांडवलशाही आणि शेठ—सावकार. यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहे शासन. राजाराम राठोड यांनी नागवल्या गेलेल्याविषयी लिहिलं आहे —

'सुगी सरली की
साठा करुन खुशाल वाढवता भाव
भांडवल नाही म्हणून
आम्ही अपंग....

सुगीत कमी दरांत माल खरेदी करता
भांडवलशाहीच्या जोरावर...'

ह्य व्यवस्थेत एकाच नाण्याच्या दोन बाजू म्हणजे, सावकार आणि खरीददार. हया दोघांचंही आतून चांगलंच साटंलोटं असते. त्यामुळे अगदी पध्दतशीरपणे शेतकऱ्यांला ओरवाडणं चालू असते. त्याविषयी,

'हाड राबतात किती
बापू चिप्पाड झालेला
घामातून जगण्याचा
त्यानं इसार दिलेला
टसं कसं रे गणित
मोजलेलं कांड्यावर
राशी ऐतखाऊ नेती
तुम्ही भरता गोंडर.'

पिढ्यानपिढ्या देशाच्या पोशिंद्याला अनेक प्रकारे नांगवलं जात आहे. घरात पीक आलं की त्यावर नजर खिळते सावकाराची. राबराब राहूनही ताटात शेतकऱ्यांच्या 'गोंडर' तेवढं राहते. यामुळं कवीमन चिडणं स्वाभाविक आहे. अशाच चिडलेल्या मनाचा कवी जगदीश कदम आपल्या लेखणीला ह्याप्रकारे धार लावतो –

'बाजाराच्या
लुटीच्या डोळयांत
मुरु लागली त्याना नागवण्याची रचना
अशावेळी
आधीच सोलून निघालेल्या शेतकऱ्यांच दु:ख
देहभर जाते पसरत.'

डॉ.दामोदर काळे यांचाही शेतकरी हाच प्रमुख विषय आहे. शेतकऱ्यांमध्ये जागृती यावी असं त्यांना वाटत आलेलं आहे. त्यातूनच त्यांचा 'बा शेतकऱ्या ऊठ' हा कवितासंग्रह आकारबद्ध झाला. ते अगदी मनातून म्हणतात,

'बा शेतकऱ्या ऊठ पेटुनी आता
किती खाशील आणखी लाता.'

एकुणच नव्वदोत्तरी कवितेनं शेतकऱ्यांची बाजू उचललेली आहे. त्यांच्या व्यथा, वेदना प्रभावीपणे चित्रीत केल्या आहेत. त्यांच्या उद्ध्वस्तपणाला जगापुढं आणलं आहे. ज्यांच्या बाजूला आपलं म्हणून कुणीच नव्हत, तिथ कविता येऊन पोहोचली. त्यामुळ शेतकऱ्यांचचं जीवन हे जगभर पोहोचायला मदत झाली. न्याचाच्या बाबतीतलं श्रेय हे कवींना द्यायला हवं.

## निष्कर्ष :–

- खेडे आणि खेड्यातला माणूस ग्रामीण कवितेच्या केंद्रस्थानी आहे.
- लोकसंस्कृतीचा वसा आणि वारसा ग्रामीण कवितेने जपला आहे.
- मानवी नात्यांची घट्ट वीण ग्रामीण कवितेत आली आहे.
- निसर्ग, प्राणीजीवन यांचे व्यापकत्व आले आहे.
- कृषीकेंद्रिकता हा ग्रामीण कवितेचा आत्मा आहे.
- शेतकऱ्याची गळचेपी आणि जगण्यातली अस्वस्थता या कवितेत आली आहे.
- नव्वद नंतरच्या कवितेत केवळ शेतकऱ्यांच्या दु:खाचेच वर्णन नाही तर त्यांना वाचा फोडण्याचे काम कविने केले आहे.
- मराठी ग्रामीण कविता समृध्दते बरोबर वास्तवरुप भांडणारी अशी आहे.

आधुनिकतेबरोबर समकाळातील लेखन कवींनी याचे भान ठेवून लेखन केले आहे.

## समारोप :–

कविता ही एक भाषिक कृती आहे. अहंकार, प्रतीक, प्रतिमा, आदिबंध या सगळयातून एक कवितेचा दीर्घ पट तयार होतो, तो एकूण कवितेला व्यक्त करत असतो. मानवी संवेदनांचे जग कवितेत व्यापकतेने आलेले असते. त्यामुळेच इतर कलाप्रकारांपेक्षा कविता वेगळी तर असतेच, प्रत्येक कवितेचा आंतरिक चेहरा वेगळा असतो. या सगळया कवितेच्या प्रवासात नव्वदोत्तरी मराठी कविता लोकसंस्कृतीचा ठेवा जपते आणि ग्रामीण जीवनाचा वास्तव चेहराही व्यक्त करते.

## संदर्भ :–

१) काया मातीत मातीत–डॉ. विठ्ठल वाघ.
२) पेरा– इंदजित भालेराव.
३) पोतदार चंद्रकांत, आस्वादाची काही पाने, निर्मोही, पुणे, २०११.
४) तायडे मनोज, आस्वादनामा, स्वरुप, औरंगाबाद, २००२.
५) पत्की हेमकिरण, कवितेला शोधीत जावे, सुविधा, सोलापुर, २०००.
६) डहाके वसंत आबाजी, कवितेविषयी, स्वरुप, औरंगाबाद, १९९१.

❖❖❖

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे जीवन – शिक्षण विषयक विचार

प्रा. विलास शालिग्रामजी गांजरे
मातोश्री सुभद्राबाई पाटील कला, विज्ञान व कै. पां. ठा. वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय
मानोरा जि. वाशिम
भ्रमणध्वनी –९४२३६१०४८ Email Id- vilasganjare@gmail.com

## प्रस्तावना :–

महाराष्ट्राच्या भूमीत अनेक संत, महात्मे, समाजसुधारक ह्या सारख्या महान विभूतींनी आपल्या क्रियाशिलतेने समाजसुधारणेचे, समाजाला दिशा देण्याचे आणि राष्ट्र निर्मितीचे महान कार्य केले. मानव जातीचा ध्यास, मानव जातीचे कल्याण, समाजोध्दार हाच विचार व संकल्प पुढे नेण्याचे कार्य हया महाराष्ट्रात अनेक संत महात्म्यांनी केले. महाराष्ट्राच्या भूमीमध्ये संतांची एक विशाल दीर्घ परंपरा आपल्याला दिसून येते. जनकल्याणासाठी खऱ्या अर्थाने संतांनी महान कार्य केले. जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती । देह कष्टविती परउपकारे ।। संतांच्या परंपरेतील पुरोगामी विचाराचे संस्कार पेरणारे एक महत्वाचे संत म्हणजे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज होत. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे अनमोल कार्य व त्यांचे अमृततुल्य विचार समाजाला, मानवजातीला दिशादर्शक व प्रेरक असे आहे. राष्ट्रसंतांनी आपल्या भजनातून, भाषणातुन किंवा आपल्या वाङ:मयातून समाजसुधारणा व मानवजातीचे कल्याण हयासाठी मांडलेले विचार अतिशय मोलाचे आहेत. राष्ट्रसंतांचा ग्रामगीता हा ग्रंथ तर अखिल मानव जातीला कल्याणकारी, सुंदर समाज निर्मितीमध्ये अद्‌भूत असा चमत्कार आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी समाजाच्या कल्याणासाठी मानवहितासाठी जे विविध विषयावर आपले अनमोल असे विचार मांडले त्यातील जीवन–शिक्षण विषयक विचार हे समाजाला प्रकाश देणारे असे आहे.

## विषय विवेचन :–

जीवनातील शिक्षणाचे महत्व असेल किंवा जीवन विषयक शिक्षण असेल ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी अतिशय प्रभावीपणे मांडले आहेत. अनेक संत महात्म्यांनी, समाजसुधारकांनी शिक्षणाचा पुरस्कार केला, शिक्षणाचे समर्थन केले, कारण सर्वांना माहिती होते की, शिक्षणाशिवाय माणसाचा विकास होणार नाही, समाजाची प्रगती होणार नाही. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी शिक्षणाचे महत्व जाणले होते म्हणून ते म्हणतात –

हे सर्व मागील विसरोन । मुला–मुलींना द्यावे शिक्षण ।
जेणे गावाचे वाढेल भूषण । सर्वतोपरी ।।

मागे काय झाले? कसे होते? हयाचा विचार न करता मुलांसोबत मुलींनाही शिक्षण दिले गेले पाहिजे हा राष्ट्रसंतांचा विचार होता. स्त्री–पुरुष दोन्ही समान असून शिक्षणामध्ये भेदभाव नको असा विचार राष्ट्रसंताच्या अनेक ओवींमधून दिसून येतो. जेव्हा स्त्री–पुरुष दोघेही शिक्षीत, ज्ञानी होतील तेव्हा खऱ्या अर्थाने गावाचे, समाजाचे भुषण वाढेल, असे राष्ट्रसंत आपला विचार मांडतात.

शिक्षणाचे महत्व विशद करतांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे शिक्षणाचे ध्येयच जणू व्यक्त करतात. शिक्षण कशाला म्हणावे? शिक्षणाने काय साध्य व्हायला पाहीजे हयासंबंधी विचार व्यक्त करतांना तुकडोजी महाराज म्हणतात –

जीवनाच्या गरजा संपूर्ण । निर्वाहाचे एकेक साधन ।
संबंधित विषयाचे समग्र ज्ञान । यांचा अंतर्भाव शिक्षणी ।।

खरे शिक्षण कोणते म्हणता येईल किंवा शिक्षणामध्ये कोणत्या गोष्टींचा अंतर्भाव असला पाहीजे. हयासंबंधी राष्ट्रसंताचे विचार अधिक स्पष्ट आहे.

शिक्षणामुळे आपल्या जीवनातील गरजापूर्ण होतात, जीवन जगण्याचे निर्वाह करण्याचे माध्यम म्हणजे शिक्षण आहे. त्यासाठी शिक्षणातून समग्र असे ज्ञान दिले पाहिजे व त्याप्रकारचा अभ्यासक्रम समावेश शिक्षणात असावा असा विचार राष्ट्रसंत व्यक्त करतात. शिक्षण हे माणसाला निर्भय व स्वतंत्र बनवते त्याचप्रमाणे विविध

सत्गुण हे शिक्षणानेच येतात, शिक्षणामुळेच व्यक्तींचा व्यक्तमत्व विकास होतो. त्यामुळेच माणूस आपल्या जीवनात यशाने पुढे जाऊन आपलेच जीवन सुंदर बनवतो म्हणून तुकडोजी महाराजांचे त्यासंबंधीचे विचार फार मोलाचे आहेत.

विद्येअंगी व्हावा विनय । दिद्या करी स्वतंत्र, निर्भय ।
शिक्षणाने वाढवा निश्चय । जीवन –जय करावया ।।

विद्येचे, शिक्षणाचे महत्व हे अनन्यसाधारण असे आहे. जीवनातील यशस्वीताच जणू शिक्षणामुळे आहे हेच राष्ट्रसंताच्या विचारातून प्रतिबिंबीत झालेली दिसते.शिक्षण का घेतले पाहीजे, शिक्षणाचा उद्देश कोणता असावा हे त्यांच्या विचारातून स्पष्ट जाणवते. जीवन सुंदर रितीने जगता यावे, आपले जीवनच सुंदरतेने नटावे हयासाठी शिक्षणाची आवश्यकता राष्ट्रसंतांना वाटते. शिक्षणामुळेच मनुष्य बलवान, सक्षम, शक्तीशाली होईल असे राष्ट्रसंत प्रतिपादन करतात. जेव्हा मुलांना शिक्षण दिले जाते तेव्हा अनेक प्रकारच्या विद्या व नाना प्रकारच्या कला सुध्दा त्यांना शिकविल्या पाहीजे, ज्यामुळे त्या मुलामुलींचे ध्येय, स्वप्न पूर्ण होतील असे राष्ट्रसंत म्हणतात. शिक्षण हे विशिष्ट वयातच घेतले पाहिजे नाहीतर पुढे शिक्षण घेण्यास त्रास होतो आणि जर शिक्षण घेतलेच नाही, तो निरक्षर राहिला तर साधा भोळा राहिल त्याची कोणीही फसवणुक करेल. व्यवहारात त्याला फसवले जाईल. जणु काही तो डोळे असून आंधळा होईल. वडिलांचे आपल्या पाल्याप्रती, कर्तव्य व्यक्त करतांना तुकडोजी महाराज म्हणतात – आपण जर मुलांना शिक्षण दिले नाही, त्याला विद्या दिली नाही तर आपण पापाचे भागीदार होऊ. म्हणून आपल्या अपत्यांना शिक्षण देणे हे प्रत्येकाचे कर्तव्य असल्याचे राष्ट्रसंत सांगतात. शिक्षण देण्यासाठी आपल्या गावामध्येच विद्याभूवन, बालोद्यान, शिशुसंगोपन हया गोष्टी असल्या पाहीजे असे राष्ट्रसंतांना वाटते. ज्या ठिकाणी मुले–मुली प्रत्यक्ष शिकुन साक्षर होतील अशा पाठशाला उभारल्या जाव्यात. त्याचप्रकारे जीवन विकासाचे शिक्षण प्रत्येक गावातून असावे असा राष्ट्रसंतांचा मनोदय होता. विद्येबरोबरच समाजाचा एक घटक म्हणून अनेक गोष्टी व्यक्तीला यायला हव्यात म्हणून राष्ट्रसंत म्हणतात –

सुंदर गाणे, बोलणे, वागणे । टापटिपीने घरी राहणे ।
आपले काम आपण करणे । शिकवावे तया ।।

खरोखर जीवनाला वळण देणाऱ्या गोष्टींची गरज राष्ट्रसंतांनी अतिशय सुक्ष्म निरिक्षणातून नोंदवल्याचे दिसून येते. जीवन आणि शिक्षण यांचे गंठबंधन साधावे म्हणजे शिक्षणाने जीवन सुंदर होईल. विद्यार्थ्याला आपले शिक्षण घेत असतांना अनेक प्रकारचे महत्वपूर्ण उद्योग सुध्दा शिकवले पाहिजेत. जेव्हा कुठल्याही प्रकारचे काम करतांना विद्यार्थ्यांनी लाज बाळगता कामा नये, असे राष्ट्रसंत सांगतात. जर मुले मुली शिकलेत तर हजारो पिढयाचे पांग फिटेल, अनेक पिढयांचा उद्धार होईल. हयाच शिक्षणाने संस्काराने अनेकांचा उद्धार होतो म्हणून राष्ट्रसंत आपलं मत व्यक्त करतात –

या कोवळया कळयांमाजी । लपले ज्ञानेश्वर, रवींद्र, शिवाजी ।
विकसता प्रकटतील समाजी । शेकडो महापुरुष ।।

तसेच हयातून शिक्षणाने अनेक जण अनेक प्रकारचा व्यवसाय, उद्योगधंदा करु लागतील. यंत्रगार, तत्वाज्ञानी, व्यापारी, सेवक असे अनेक क्षेत्रामध्ये स्त्री–पुरुष आपले नाव कमावतील. गावोगाव शाळा उघडुन मुलामुलींना शिक्षणासाठी शाळा उघडून त्यांना शिक्षण दिले पाहिजे, असे झाले तर सगळे जणसुखी होतील, प्रत्येकाचा विकास होईल आणि हयामुळे नक्कीच समाजाचा उद्धार होईल. असा आशावाद राष्ट्रसंतांना होता. जेव्हा आपल्या अवती भवती बुध्दीवान लोक असतील. चांगल्या लोकांचा सहवास असेल, सात्विक आहार असेल तर नक्कीच आपली उन्नती होईल असे राष्ट्रसंत सांगतात. उत्तम सहवासानेच मानाची योग्य प्रगती होते. त्याला चांगली दिशा प्राप्त होते असे राष्ट्रसंत सांगतात. ते म्हणतात संगती चांगली असेल, सहवास चांगला असेल तर आपल्या जीवनाचा दर्जा उंचावेल आणि हयातुन ज्ञानवंताचा नवा समाज निर्माण होईल. हयाठिकाणी प्रत्येक घटकापर्यंत शिक्षण पोहचले पाहिजे आणि प्रत्येकाचा शिक्षणाने विकास झाला पाहिजे असे राष्ट्रसंताचे विचार होते. गोरगरिब असो वा श्रीमंत प्रत्येकासाठी शिक्षण उपलब्ध असले पाहिजे हयासाठी राष्ट्रसंत आग्रही होते.

असोत गरीब किंवा धनिक । मुलांस विद्या शिकवाव्या अनेक ।
गावाने संपत्ती पुरवावी अधिक । याच मार्गी ।।

जो पर्यंत विद्येची द्वारे खुली होणार नाहीत तो पर्यंत खऱ्या अर्थाने मानवाचा, समाजाचा विकास होणार नाही हे समजून घेऊन गावातील सुज्ञ लोकांनी शाळा वा शिक्षणाकरिता खर्च केला पाहिजे जेणे करुन उच्च विद्या घेऊन ज्ञानी निपजतील असा उदात्त विचार राष्ट्रसंतांनी मांडला. आदर्श विद्यार्थीच गावाचे परिवर्तन घडवू शकतात.

विद्येची सतत वाढ झाली तर गावाचा भाग्योदय झाल्याशिवाय राहणार नाही असा मौलिक विचार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज देतात.

## निष्कर्ष :—

युगप्रवर्तक राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे साहित्य विश्वव्यापक असून त्यांचे विचार समाजोन्नती, राष्ट्रोन्नती व मानवाचे कल्याण हयासाठी अमृतमय आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे जीवन शिक्षण संबंधीचे विचार म्हणजे जीवनाला दाखविलेली एक प्रकाशवाट आहे. जीवनातील शिक्षणाचे महत्व किंवा शिक्षणामुळे निर्माण होणारे जीवन हयासंबंधी राष्ट्रसंताचे विचार अनमोल असे आहे. ग्रामगीतेतून राष्ट्रसंतांनी जीवन शिक्षण विषयक जे विचार मांडले ते अखिल मानव जातीला प्रेरक दिशादर्शक व संजीवनी आहे. मनुष्याने जीवन व शिक्षण यांचा योग्य समन्वय साधला पाहीजे असे राष्ट्रसंत सांगतात. विविध प्रकारच्या विद्या व नाना प्रकारच्या कला प्रत्येक विद्यार्थ्यांपर्यंत पोहचल्या पाहिजे जेणे करुन त्या विद्यार्थ्यांचा सर्वांगीन विकास होईल. विद्येशिवाय मनुष्य पशू समानच म्हणून समाजातील प्रत्येक घटकापर्यंत शिक्षण पोहचले पाहिजे हा राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा आग्रह होता. राष्ट्रसंताचे जीवन शिक्षण विषयक विचार निश्चितच समाजासाठी अनमोल असे आहे.

## संदर्भ :—

१. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज — 'ग्रामगीता'
२. डॉ. भारती खापेकर, डॉ. रत्नाकर भेलकर, डॉ. रविंद्र शोभणे — 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे साहित्य : समकालीन वास्तव, नाथे पब्लिकेशन लिमिटेड, नागपूर.
३. 'रिसर्च जर्नल ऑफ इंडिया, वॉल्युम, ८ ऑक्टो. २०२१ प्रकाशन — डी. बी. एम. आर.सी. इदिरा महाविद्यालय, कळंब जि. यवतमाळ.

❖❖❖

# प्रज्ञा दया पवार यांच्या साहित्याचे विवेचन

प्रा. डॉ. संजय एस. पोहरे
मराठी विभाग
श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला
मो. ९८२२२९६१२७ मेल : sspohare@gmail.com

## प्रस्तावना :

प्रज्ञा दया पवार यांचे साहित्य स्त्रीवादी साहित्याची समीक्षा करणारे आणि त्यांच्याशी संवाद साधणारे साहित्य आहे. अनेक स्त्री लेखिकांनी स्त्रीवादी साहित्य लिहिले, स्त्रीयांवर होणाऱ्या रूढी–परंपरागत अन्याय–अत्याचार, हीनतेची जाणिव होऊन प्रत्येक स्त्री लेखिकेने आपले साहित्य समृद्ध केले आहे. परंतु प्रज्ञा दया पवार यांचे साहित्य भारतीय नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्त्रीयांच्या चरित्राचे वाचन, चिंतन–मनन करून आलेले आहे. त्यामध्ये इसाडोरा डंकन, इनग्रिड बर्गमन, मरियम मकेबा, माय ॲंजेलो, तहमिना दुराणी, अशा स्त्रीया भेटतात. त्यामुळे प्रज्ञा दया पवारांचे साहित्य व्यापक मानसिक सजग बनवणारे साहित्य आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. स्त्रीला तिच्या हक्क आणि कर्तव्याची योग्य जाणिव करून देते. स्त्रीवादी असणे म्हणजे पुरुषाच्या विरोधी असणे असे नव्हे तर पितृसत्ताक समाज व्यवस्थेचे मानसिक गुलामी नकारणे होय. आणि त्या ठिकाणी स्वातंत्र, समता, न्याय व बंधुता या मूल्यावर आधारित सामाजिक समता निर्माण करणारे विचार प्रस्तापित करणे होय.

प्रज्ञा दया पवार साहित्य निर्मितीमध्ये परंपरागत सांस्कृतिक मळवाटेने जाताना दिसत नाहीत तर थेट साहित्याला बहुधा वर्ज्य असलेल्या समकाळातील राजकीय प्रश्नांना जाऊन भिडतात. हे सर्व मांडत असताना मराठी भाषेचे तथाकथित नियम मोडून प्रचलित इंग्रजी शब्द–संज्ञेचा सऱ्हास वापर करताना दिसतात. त्यातूनही त्यांची भाषेविषयीची भूमिका ते स्पष्ट करतात– लोकभाषा ज्ञानभाषेत परावर्तीत करणं, विज्ञान आणि माहिती तंत्रज्ञानाने निर्माण होणाऱ्या स्थित्यंतरांना अचूक पकडता येण्याइतकं भाषेला सक्षम करणं आपल्याला जमलं आहे का? आनी–पानी करणाऱ्यामध्ये न्यूनगंड निर्माण करणारी मराठी आपण निर्माण करणार आहोत काय? असे प्रश्नही त्या उपस्थित करतात. एकूनच समाजाला मूलतत्ववादाची गुंगी देऊन अश्मिभूत करणाऱ्या राजकीय व्यूहनीतीला नव्वदोत्तरी लेखकाने सांस्कृतिक व्यूहनीतीच्या व्यापक भाषिक कृतीतून सशक्त पर्याय उभा करणं आता निकडीचं ठरणार आहे. आधुनिकवादासाठी नव्हे, तर संपूर्ण मानवी अस्तित्वासाठी. अशी साहित्य विषयक भूमिका आपल्या साहित्य लेखनाची घेऊन मराठी साहित्य विश्वात त्या आलेल्या दिसतात.

प्रज्ञा दया पवार ज्या दाटीवाटीत उभ्या आहेत तिथली धसमुसळी रेटारेटी अटळ आहे. ती रेटारेटी कधी पुरुषी आहे, कधी ब्राहमणी आहे, कधी वर्गीय आहे, कधी वर्चस्ववादी आहे, कधी भांडवलदारी व्यवस्थेची आहे. एकूणच कवी–लेखक म्हणून किंवा वैचारिक लेखन म्हणून त्यांच्या मनात एक व्दंव्द सळसळत असतं ते स्वकीयांबाबत असतं, पुरोगामी, डावे किंवा फुले–आंबेडकरी विचारांचीसुद्धा पताका खांद्यावर घेतलेल्या लोकांची फसगत कुठे होते यावर त्या भाष्य करतात. प्रज्ञा दया पवार या अनुभवातून गेल्यात अन् त्यावर बोलक्या देखील झाल्यात. याच ठिकाणी त्यांच्या लिहिण्यामागच्या प्रेरणाही त्या स्पष्ट करतात. कुठल्याही गटात, पंथात, मठात, कळपात राहायचे त्या नाकारतात आणि त्यांच्यावर येणारे बंधने त्या झुकारून लावतात. 'मला समजलेल्या फुले–आंबेडकरवादाच्या सम्यक भानाने लिहीत राहिल' अशी ठाम भूमिका घेतात. त्यांची कविता फक्त तात्विक नाही, केवळ वैचारिकही नाही, तर त्या वैचारिकतेला, तात्विकतेला मानवतावादाचा आणि जीवनानुभवाचा एक खोल, उत्कट, अस्सल, जीवंत स्पर्श आहे. माणसाच्या दु:खाला निकटतेने जाणणारी एक ओली सह्यता आहे. प्रज्ञा दया पवारांच्या कवितेचे केंद्रवर्ती आशयसूत्र केवळ दलित जाणिवेची कविता नाही तर या कवितेचा पैस त्याहीपलीकडे माणुसपणापर्यंत पसरलेला आहे. पुरुषप्रधान व्यवस्था आणि जातीव्यवस्था या व्यवस्था म्हणून एकच आहेत, याचे भान ही कविता देते. स्त्री–पुरुष संबंधावर निर्भीडपणे भाष्य करते. इथल्या कुटुंबव्यवस्थेने, लग्नसंस्थेने बाईला कसे पद्धतशीरपणे शोषण करून अन्यायग्रस्त ठेवले आहे. दुय्यमत्वाची एकही संधी या व्यवस्थेने सोडलेली नाही.

प्रज्ञा दया पवार यांनी सुरुवातीचे लेखन प्रज्ञा लोखंडे नावाने केले आहे. या मराठीतील कवयित्री आणि लेखिका आहेत. पाक्षिक 'परिवर्तनाचा वाटसरू' च्या त्या संपादक आहेत. शिवाय महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र व साधने प्रकाशन समिती आणि मराठी संशोधन मंडळ या संस्थांच्या त्या

सदस्या आहेत. ख्यातनाम मराठी साहित्यिक दया पवार यांच्या त्या ज्येष्ठ कन्या आहेत. अलिकडेच प्रज्ञा दया पवार यांनी देशातील असहिष्णुता आणि तिरस्काराच्या वाढत्या वातावरणाचा निषेध म्हणून त्यांचे साहित्य पुरस्कार राज्य सरकारला परत केले.

प्रज्ञा दया पवार या ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे येथे मराठी विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या प्रकाशित साहित्य कृतीमध्ये 'अंतस्थ' हा पहिला कविता संग्रह १९९३ ला मानसन्मान प्रकाशन पुणे यांनी प्रकाशित केला. त्या काव्यसंग्रहाची दुसरी आवृत्ती २००४ साली डिम्पल प्रकाशन, मुंबई यांनी काढली. त्यांचा दुसरा कविता संग्रह ' उत्कट जीवघेण्या धगीवर' हा २००२ साली लोकवाड्.मय गृह, मुंबई यांनी प्रकाशित केला. 'मी भिडवू पाहते समग्राशी डोळा' हा कविता संग्रह २००७ साली ग्रंथाली प्रकाशन, मुंबई यांनी काढला. 'आरपार लयीत प्राणांतिक' हा कविता संग्रह २००९ साली लोकवाड्.मयगृह, मुंबई यांनी काढला आणि दुसऱ्या वर्षी म्हणजे २०१० ला याच संग्रहाची दुसरी आवृत्ती प्रकाशित करावी लागली. 'दृश्यांचा ढोबळ समुद्र' हा कविता संग्रह २०१३ साली पॉप्युलर प्रकाशन, मुंबई यांनी प्रकाशित केला आहे. या पाच कविता संग्रहासह 'धदांत खैरलांजी' हे नाटक २००७ साली आणि 'केंद्र आणि परिघ' हा ललित लेख संग्रह २००४ साली डिम्पल प्रकाशन, मुंबई यांनी प्रकाशित केला आहे. 'टेहलटिकोरी' हा लेखसंग्रह २०१६ साली अक्षर प्रकाश्न मुंबईने प्रकाशित केला आहे. 'अर्वाचीन आरण' गद्यलेखन २०२० साली शब्द प्रकाशन, मुंबई यांनी प्रकाशित केला आहे.

वरील सर्व साहित्य कृतीसाठी त्यांना मातोश्री भीमाबाई आंबेडकर पुरस्कार, बिरसा मुंडा राष्ट्रीय साहित्य पुरस्कार, महाराष्ट्र फाऊंडेशन पुरस्कार, शांता शेळके पुरस्कार, महाराष्ट्र राज्याचे केशवसुत पुरस्कार, बालकवी पुरस्कार, इंदिरा संत विशेष पुरस्कार, ग.ल.ठोकळ विशेष पुरस्कार, बोधिवर्धन पुरस्कार, वनिता समाज गौरव पुरस्कार इत्यादी पुरस्कारांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्याचप्रमाणे औरंगाबाद येथे आयोजित गुणिजन संमेलनाच्या अध्यक्षा (२०१२) पाटण (सातारा जिल्हा) येथे आयोजित विभागीय साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद (२०१५), लातूर येथे आयोजित अस्मितादर्श साहित्य सूमेलनाचे अध्यक्षपद (२०१७), विरार , पालघर जिल्हा येथे आयोजित शिक्षक साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद (२०२०), मॉस्को रशिया येथे झालेल्या वर्ल्ड बुक फेअरमध्ये निमंत्रितांच्या कविसंमेलनात सहभाग (२००९). या सर्व मानसन्मानातून व पुरस्कारातून त्यांच्या कार्याचा वा लेखनाचा अदमास घेतल्यास तो निश्चितच मराठी साहित्य विश्वासाठी गौरवाची व मोलाची भर टाकणरा ठरतो आहे. वंचित, कष्टकरी, सर्वहारा, बहुजन, दलित, भटकी, आदिवासी खऱ्या अर्थाने जीवतोड श्रमातून, घामातून संस्कृती निर्माण करतो आणि तोच चेहरा हा अस्सल भारतीय चेहरा असतो अशी परखड भूमिका प्रज्ञा दया पवार सातत्याने आपल्या साहित्यातून मांडत आलेल्या दिसतात. यासर्व घटकांचे साहित्यातील प्रतिबिंब अभ्यासणे पुढील साहित्य अभ्यासासाठी मोलाचा व मैलाचा दगड ठरू शकते.

प्रज्ञा दया पवार यांचे साहित्य हे स्त्रीवादी, दलित साहित्य क्षेत्रापुरते मर्यादित नसून एकूणच माणुसपणाच्या मूल्यांची जोपासना करणारे आहे. त्यांच्या साहित्यातून जातिअंताची चळवळ, स्त्री मुक्तीची चळवळ आणि सर्व परिवर्तनवादी चळवळीसाठी लागू असणारे रसायण आहे. त्यामुळे त्यांच्या समग्र साहित्याच्या अभ्यासाला महत्व प्राप्त होते. 'प्रज्ञा दया पवार यांच्या साहित्याचा विवेचक अभ्यास' करीत असताना हे संशोधन क्षेत्र एक विद्याशाखीय न राहता आंतरविद्याशाखीय होत असल्याचे दिसते.

दलित साहित्याच्या निर्मितीचा पुढील विकास टप्पा म्हणजे आंबेडकवादी साहित्य होय. शोषणाचा, गुलामीचा संदर्भ ज्या साहित्याला असेल आणि त्यातून मुक्तीची जाणीव आंबेडकरवादी प्रेरणेने झाली असेल असे जगातील कोणतेही साहित्य आंबेडकरवादी साहित्य होय. मिलिंद साहित्य सभा, अस्मितादर्श, सिंहगर्जना, समुचित या विचारपीठांतून आंबेडकरवादी साहित्य साकारत गेले. दलित समाजातील स्त्री लेखिकांना आणि कार्यकर्त्यांना एका बाजुला उच्चवर्णीय समाजातून येणाऱ्या काहीशा व्यक्तिवादी—स्त्रीमुक्तिवादी भूमिकेच्या सहकाऱ्यांना दलित—शोषित समाजातील स्त्रियांच्या जातीय दमन आणि शोषणाची दाहकता नव्याने सांगावी लागते. त्याचवेळी दलि समाजातील फुले—आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरित कार्यकर्त्यांच्या पुरुषसत्तावादी भूमिका आणि जाणिवा बदण्यासाठी सतत संघर्ष करावा लागतो. अशा गुंतागुंतीच्या वास्तवाचे विश्लेषण प्रज्ञा दया पवार यांच्या समग्र साहित्याच्या अभ्यासातून करता येईल.

प्रज्ञा दया पवार स्त्रीवादी दलित लेखिका म्हणून वावरत असताना ज्या वास्तवाला, अनुभवांना सामोरे जातात त्याचेच मर्मभेदक विश्लेषण त्या आपल्या साहित्यातून करतात. व्यक्तिगत जगण हे सुद्धा राजकीयच असते ही भूमिका स्त्रीमुक्तीवादी चळवळीने जगभरात प्रस्थपित केली. या भूमिकेतून भारतात स्त्रीमुक्ती, जाति अंताच्या चळवळी, आदिवासी अस्मितेच्या चळवळी आणि एकूणच डाव्या विचार प्रवाहाला मोठे बळ मिळाले. विविध

सामाजिक आणि राजकीय विश्लेषण पद्धतीचे आयाम बदलले या बदललेल्या वेचारिक प्रवाहाचे प्रतिनिधित्व आणि प्रवक्ततेपण प्रज्ञा दया पवार करतात. तात्विक मांडणी म्हणजे तटस्थ, काहीसे भावना विरहित विश्लेषण हा संकेत ही धारणा स्त्रीमुक्तीवादी ततवचिंतनाने बदलली त्याचा प्रभावी साक्षात्कार प्रज्ञा दया पवार यांच्या लेखणीतून प्रतीत होतो. नव्वदोत्तर काळात त्यांनी घेतलेली स्त्रीवादी भूमिका ही निश्चितच एक विधायक विचार मांडणारी आहे. म्हणूनच मराठी साहित्य क्षेत्रामध्ये प्रज्ञा दया पवार यांच्या साहित्याचा समग्र अभ्यास महत्वाचा ठरतो.

प्रज्ञा दया पवार यांच्या समग्र साहित्याचा अभ्यास करताना त्यांच्या साहित्यातील महत्वाचा पैलू म्हणजे त्यांनी स्त्रीवादाच्या दृष्टिकोनातून केलेले लेखन हा होय. इंग्रजीतील ैड या संज्ञेला पर्यायी संज्ञा म्हणून मराठीत 'वाद' संकल्पनेचा उदय झालेला आहे. स्त्रीवादी साहित्याचा उगम हा अचानक झालेला नाही. मूलतः एकूणच जागतिक पातळीवर स्त्रियांच्या दमनस्थितीमुळे विचार करणाऱ्या अनेक स्त्रिया चिंतन करायला लागल्या स्त्री म्हणून स्त्रीला आलेले अनुभव आणि पुरुषप्रधान सांस्कृतिक परिप्रेक्ष्यामुळे स्त्रीच्या वाटयाला आलेले अनुभव, त्यामागील पुरुषसत्ताक समाज व्यवस्थेची मानसिकता नाकारण्याचे काम करणरा विचार म्हणजे स्त्रीवाद होय असे म्हणता येईल.

प्रज्ञा दया पवार यांची भारतीय साहित्यात आज स्वतंत्र स्त्रीवादी विचारधारा स्पष्टतेने जाणवू लागलेली आहे. वेदना, विद्रोह आणि नकार यातून फुले—आंबेडकर यांच्या प्रेरणेतून दलित साहित्याचा प्रवाह निर्माण झाला. त्यातही मराठी कवितेत दलित—स्त्रीवादी साहित्याने विचारांची व्यापकता वाढवली आहे. दलित स्त्रीची स्त्रीवादी भूमिका मराठी साहित्यात येणाऱ्या सवर्ण स्त्रीयांच्या स्त्रीवादापेक्षा भिन्न असलेली दिसून येते. हे महत्वाचे अनुभव विश्व प्रज्ञा दया पवार यांच्या साहित्यातून अभ्यासता येतील. दलित —वंचित स्त्रीची व्यथा, वेदना, तगमग त्यातून जन्माला आलेली व्यापक विद्रोहाची भावना प्रज्ञा दया पवार यांच्या साहित्यातून प्रखरशाने दिसून येते.

प्रस्तुत संशोधनामध्ये प्रज्ञा दया पवार यांच्या समग्र साहित्याचा विवेचक अभ्यास करण्यात येणार आहे. संपादक संजय पवार यांनी संपादित केलेल्या 'आभाळ पेलताना' आंबेडकरी कवयित्रींचा महत्वाचा दस्तावेज या ग्रंथामध्ये प्रज्ञा दया पवार यांच्या कविता व त्यांच्यावर भाष्य केलेले आहे. 'नव्वदोत्तर आंबेडकरी कवितेची मीमांसा' या वाङ्.यीन समीक्षा ग्रंथामध्ये डॉ. अशोक रा. इंगळे यांनी प्रज्ञा दया पवार यांच्या नव्वदोतर कवितेचे समीक्षण केलेले दिसते. त्याचप्रमाणे 'मराठी वंचित साहित्य' या डॉ. सुनीलकूमार लवटे, अक्षर दालन प्रकाशन, कोल्हापूर यामध्ये प्रज्ञा दया पवार यांच्या कवितेचा समावेश आहे. 'पुरुष मला समजलेला' या अविनाश दुधे यांच्या संपादनाला प्रज्ञा दया पवार यांची प्रस्तावना लाभलेली आहे. दै. लोकसत्ता, दै. दिव्य मराठी, महाराष्ट्र टाइम्स्, परिवर्तनाचा वाटसरू आदि नियतकालिकातून त्यांच्यावर समीक्षण लिहिलेली आहेत. अनेक विद्यापीठाच्या अभ्यासक्रमामध्ये प्रज्ञा दया पवार यांच्या कविता अभ्यासक्रमामध्ये समाविष्ठ करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने एस.एन.डी.टी. विद्यापीठ, मुंबई , शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आदी विद्यापीठामध्य त्यांच्या साहित्यावर अभ्यास होताना दिसतो.

प्रज्ञा दया पवार यांना स्त्रीवादी लेखन करताना लिंगभेदजन्य विषमतेबरोबरच जात वर्गवास्तव, त्याचबरोबर जागतिकीकरणातून येणारे कंगालीकरण, बाजार शरणता आणि व्याप्ती शिवायची बाकीची सर्व मानवी एकक दुय्यम ठरवत जाणेया बाबी महत्वाची भूमिका बजावत असतात. या भूमिकांचा श्धोा घेणे, अर्थनिर्णयन करणे आणि त्यांच्या विरोधात हस्तक्षेप करणे हे कवी—लेखक म्हणून प्रज्ञा दया पवार चोख बजावतात.

नव्वदोत्तरी स्त्रीवादी साहित्याचे पुनरावलोकन करताना संशोधनक्षेत्रामध्ये प्रज्ञा दया पवार यांच्या समग्र साहित्याचा विवेचक अभ्यास हा विषय अद्यापपर्यंत संशोधनाचा विषय झालेला नाही त्यामुळे एक दलित कवी—लेखिका म्हणून प्रज्ञा दया पवार यांच्या बऱ्याचशा वैचारिक भूमिका प्रस्तुत प्रबंधाच्यया माध्यमातून स्पष्ट होतील.

मराठी साहित्यातील भाषांतरीत साहित्यात प्रज्ञा दया पवार यांच्या सद्यःकालीन परिस्थितीतील महत्व लक्षात घेऊन त्यांच्या मल्याळम, तमिळ, तेलगू, कन्नड, गुजराती, हिंदी, उर्दू, बंगाली रशियन आणि इंग्रजी या भाषांमधून अनुवाद करण्यात आला आहे. प्रज्ञा दया पवार यांच्या लेखनावर अभिप्राय नोंदविताना डॉ.माया पंडित म्हणतात— ''प्रज्ञा दया पवार यांच्या कवितेने प्रतिकाराचे असे निखळ, नवे आणि लखलखीत आविष्कार आपल्याला दिले आहे. आपल्या कथा, कविता, नाटकांमधून एका नव्या आत्मभानाने मांडणारी दमदार लेखिका म्हणून प्रज्ञा पवार यांचा परिचय आहे.''

प्रज्ञा दया पवार यांच्या लेखनामधून प्रकट होणाऱ्या आत्मभानाला नवे म्हणण्याचे कारण असे की, हे आत्मभान आधीच्या पिढयांमधल्या लेखिकांच्या आत्मभानापेक्षा निराळे आहे. हे अनेक भाष्यकारांच्या लेखनावरून प्रस्तुत संशोधनात मांडता येईल.

## निष्कर्ष :

१. प्रज्ञा दया पवार आपल्या साहित्यातून समाजातील विषमतेवर निर्भिडपणे प्रहार करताना दिसतात.
२. प्रज्ञा दया पवार यांनी स्त्री—पुरुषांच्या जाणिवा परंपरागत असल्याचे मांडले आहे.
३. प्रज्ञा दया पवार साहित्यातून समकालीन राजकीय घडामोडीवर परखड भाष्य करतात.
४. प्रज्ञा दया पवार साहित्यातून समकालीन आर्थिक, सामाजिक परिस्थितीवर भाष्य केलेले आहे.
५. प्रज्ञा दया पवार यांनी समकालीन स्त्रीयांच्या व्यथा, वेदना प्रखरशाने मांडलेल्या आहेत.
६. प्रज्ञा दया पवार यांनी स्त्री—दु:खाला वैश्विक केले आहे.
७. प्रज्ञा दया पवार यांच्या साहित्यातून सामाजिक लोकशाहीचे मूल्य भान दिसून येते.
८. प्रज्ञा दया पवार यांची साहित्य लेखनाची भूमिका एका कार्यकर्त्याची दिसून येते.
९. प्रज्ञा दया पवार कोणत्याही एका साहित्य प्रकारात स्वत:ला गुंतून घेताना दिसत नाहीत.
१०. प्रज्ञा दया पवार यांच्या साहित्यातून समकालीन साहित्यिकांपेक्षा त्यांचे वेगळेपण दिसून येते.

## नवे आकलन :

प्रज्ञा दया पवार यांच्या साहित्यावर विविधांगी प्रकारे लेखन झालेले आढळून येते. परंतु त्यांच्या समग्र साहित्याचा विवेचक अभ्यास संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठा अंतर्गत अद्यापपर्यंत अभ्यास झालेला आढळून येत नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रस्तावित संशोधनामध्ये प्रज्ञा दया पवार यांच्या समग्र साहित्याचा विवेचक अभ्यास सविस्तरपणे केला जाईल.

प्रज्ञा दया पवार यांच्या साहित्याचे वेगळेपण म्हणजे आत्ता पर्यंत मोजक्या दलित/आंबेडकरी साहित्यिकांनी मांडलेला प्रखर नकार आणि विद्रोह त्यांच्या साहित्यात लेखिका निर्भिडपणे मांडताना दिसतात.

प्रज्ञा दया पवार पिळल्या गेलेल्या समूहातील स्त्रीयांची भूमिका वैचारिक पातळीवर उचलून धरतातच त्यासाठी फुले—आंबेडकरांचा विचार घेऊन अभ्यासात वा लेखनात समाधान मानत नाहीत तर चळवळीतल्या सर्व संघर्षात आपल्या साऱ्या लिफ्तारांसह सामील झालेल्या बहुजन—दलित—आदिवासी स्त्रियांच्याप्रती कृतज्ञता व्य करतात. स्त्रीवादाची मांडणी करताना परंपरागत स्त्रीवादाचा फोलपणा नकारतात आणि नव स्त्रीवादाची पायाभरणी करताना दिसतात.

मराठी विषयाच्या संशोधनामध्ये प्रामुख्याने महत्वाचा विषय येतो आणि तो म्हणजे भाषा. प्रज्ञा दया पवार यांच्या साहित्यातील भाषा विशेष व शैली यांचा उपरोक्त निर्देशित आराखडयानुसार त्यांच्या भाषेच्या व प्रस्तुत संशोधनासाठी लाभलेले मार्गदर्शक मूळात एक दलित—आंबेडकरी साहित्याचे अभ्यासक आहेत. त्यांच्या आचार्य पदवीचा विषय ''वामन निंबाळकर यांच्या समग्र साहित्याचा चिकित्सक अभ्यास'' यातून त्यांनी समग्र दलित साहित्याचा चिकित्सक अभ्यास केलेला आहे. त्याचप्रमाणे त्यांनी अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये व चर्चासत्रांमध्ये सहभाग नोंदवून दलित—आंबेडकरी साहित्यावर संशोधन निबंध लेखन केलेले आहे. त्यामध्ये प्रस्तुत संशोधनाच्या अनुषंगाने काही प्रातिनिधिक संदर्भ प्रामुख्याने 'स्त्रीवादी स्त्री प्रतिमा', 'नव्वदोत्तरी मराठी कविता', '१९९० नंतरची मराठी कविता एक आकलन', 'मराठी कवितेतील सामाजिक भान', 'स्त्रीविश्व : स्त्रीभ्रूण हत्या कारण व परिणती', आदी विषयांच्या अनुषंगाने संशोधन केलेले आहे. त्यामुळे प्रस्तुत संशोधन विषयाचे मार्गदर्शक या विषयामध्ये कुशल तज्ज्ञ आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाचा फायदा हे संशोधन करताना निश्चित होईल.

## संदर्भग्रंथ सूची :


१. चंदनशिवे सुनील, 'मराठी दलित कविता : एक चिकित्सक अभ्यास', डिम्पल पब्लिकेशन, वसईरोड, ठाणे, प्र.आ.२००५
२. जाधव राजा, 'चिंतन दलित साहित्य समीक्षा', प्रिया प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९८४
३. जाधव रा.ग., 'आधुनिक मराठी कवयित्रींची कविता', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९९६
४. डांगळे अर्जुन, 'दलित साहित्य : एक अभ्यास', महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, प्र.आ.१९७८
५. परुळेकर आशा, 'स्त्रीमनाचे अंतरंग', विमल प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९९१
६. पवार उर्मिला, 'दलित लेखिका आणि त्यांचे साहित्य', क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले

स्त्री अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे, प्र. आ. २०१०

७. पारसे बि.रा., 'दलित कवयित्रींची कविता', निर्मिती विचार मंच, कोल्हापूर, प्र.आ. २००८

८. बाळ विद्या, ' श्धोा स्वत:चा', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९८४

९. मनोहर यशवंत, ' दलित साहित्य : सिद्धांत आणि स्वरूप', प्रबोधन प्रकाशन, नागपूर, प्र.आ. १९७८

१०. भवरे महेंद्र, 'दलित कवितेतील नवे प्रवाह', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्र.आ. २००१

११. मांडे प्रभाकर, 'दलित साहित्याचे निराळेपण', धारा प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. १९७९

१२. साळुंखे आ.ह., 'हिंदू संस्कृती आणि स्त्री', स्त्रीउवाच प्रकाशन, मुंबई, प्र.आ. दृ

❖❖❖

# ध्येयनिष्ठ शिक्षकाचे चित्रण करणारी कादंबरी : माझी काटेमुंढरीची शाळा

**प्रा. पुरुषोत्तम एस. निर्मळ**
श्री संत गजानन महाराज कला महाविद्यालय
बोरगाव मंजू, जि. अकोला
मो. : 9921132764 इमेल : psnirmal2608@gmail.com

## सारांश

'शिक्षण' हे मनुष्याच्या प्रगतीचे साधन आहे. शिक्षण प्रक्रियेत अध्यापन आणि अध्ययन या दोन प्रमुख गोष्टी घडत असतात. अध्यापन करणारा शिक्षक आणि अध्ययन करणारा विद्यार्थी हे दोन्ही घटक शिक्षण प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका पार पाडत असतात. मानवी जीवनात शिक्षकाला अतिशय महत्त्व आहे "गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरा | गुरुर साक्षात परब्रम्ह तस्मै श्री गुरवे नमः|| अशा शब्दात गुरूंचा महिमा वर्णन केला जातो.

'माझी काटेमुंढरीची शाळा' या कादंबरीतून मुनघाटे गुरुजींना असलेली शिक्षणाविषयीची तळमळ स्पष्ट होते. गडचिरोली जिल्ह्यातील काटेमुंढरीसारख्या अत्यंत दुर्गम भागात शिक्षक पदाचा आदेश घेतल्यानंतर अतिशय आनंदाने मुनघाटे गुरुजी गावात येतात. काटेमुंढरीमध्ये रस्ते नाहीत, लाईट नाही, पाणी नाही अशा विपरीत परिस्थितीतही गुरुजी प्रामाणिकपणे काम करून आपल्या शाळेचा नावलौकिक संपूर्ण पंचक्रोशीत निर्माण करतात.

ज्या गावात शिक्षक म्हणून कोणीही जायला तयार होत नाही त्या सोबतच ज्या काटेमुंढरी गावात आधीच्या शिक्षकाचा खून झालेला असतो हे माहीत असतानाही मुनघाटे गुरुजी निष्ठापूर्वक अध्यापनाचे काम करतात. त्यांच्या या कार्यामध्ये काटेमुंढरी गावचा मुखिया म्हणजे मडगू पाटील यांचे सहकार्य लाभते. मुनघाटे गुरुजी काटेमुंढरीच्या माडिया गोंड या आदिवासी समाजामध्ये एकरूप होतात. गावकऱ्यांचा बाजाराने आणणे, गावात काही समस्या निर्माण झाल्यास ती सोडवणे, गावकऱ्यांना वेळोवेळी सल्ला देणे इत्यादी महत्त्वाची कामेही अध्यापणासोबत गुरुजींना करावी लागतात.

'शिदू' हा आवडता विद्यार्थी शाळेत न आल्यामुळे गुरुजींच्या मनाची झालेली अवस्था ही आदर्श शिक्षकाचेच वैशिष्ट्य आहे. प्राण्यांवर, पक्षांवर प्रेम करा, त्यांची शिकार करू नका असा उपदेश आपल्या विद्यार्थ्यांना देऊन त्यांच्यामध्ये जागृती निर्माण करतात. मुनघाटे गुरुजींमुळे काटेमुंढरी गावात निरक्षर महिलांकरिता रात्रीची शाळा सुरू होते. त्या शाळेतून निरक्षर महिलांना अक्षर ओळख होते.

काटेमुंढरीच्या शाळेचे नाव संपूर्ण परिसरात नावलौकिकास येते. एवढेच नव्हे तर पंचायत समिती क्रीडा स्पर्धेत गुरुजींच्या शाळेचे विद्यार्थी अव्वल येतात. काटेमुंढरीत नोकरीची पंचवीस वर्षे कशी निघून जातात ते गुरुजींना कळतही नाही. त्याच काटेमुंढरीच्या शाळेत शिदू हा गुरुजींचा आवडता विद्यार्थी मुख्याध्यापक होतो आणि त्याला राष्ट्रपती पदक मिळते. याचे श्रेय तो आपल्या गुरूंना म्हणजे मुनघाटे गुरुजींना देतो हे वाचल्यानंतर गुरुजींना जीवन सार्थक झाल्यासारखे वाटते.

## प्रस्तावना

'माझी काटेमुंढरीची शाळा' ही गो.ना. मुनघाटे यांची गडचिरोली जिल्ह्यातील अतिशय दुर्गम अशा काटेमुंढरी गावात शिक्षणाचे पवित्र कार्य करणाऱ्या ध्येयनिष्ठ, प्रामाणिक अशा शिक्षकाचे चित्रण करणारी कादंबरी म्हणून प्रसिद्ध असून तनुजा प्रकाशन, नागपूर यांनी 2003 मध्ये कादंबरीची पहिली आवृत्ती प्रकाशित केली. काटेमुंढरी गावात अनेक वर्षांपासून शाळा होती ती फक्त कागदोपत्रीच. परंतु मुनघाटे गुरुजी काटेमुंढरीच्या शाळेत रुजू होताच काही दिवसातच शाळेचा कसा कायापालट होतो, शाळेतील मुलांचा पूर्वीचा निरुत्साह मुनघाटे गुरुजी जाताच आनंदात परावर्तित होतो, विद्यार्थी संख्या वाढते, गावातील लोकांमध्ये शिक्षणाविषयी अभिरुची निर्माण होते या सर्व सकारात्मक गोष्टीचे श्रेय मुनघाटे गुरुजींनाच जाते.

काटेमुंढरी या गावात एस.टी. जात नाही. तालुक्यापासून जवळजवळ पन्नास मैल लांब असलेल्या गावात दरवर्षी नरबळीसारख्या घटना घडतात, गावात एस.टी. जात नसल्यामुळे लोक ट्रकवर बसून प्रवास करतात.

नक्षलवाद्यांचे माहेरघर असलेले हे गाव पोलिसांच्या काळ्या यादीत असूनही मुनघाटे गुरुजी अध्यापन आपला धर्म मानुन काटेमुंढरीसारख्या आडवळणाच्या दुर्गम भागात शैक्षणिक क्रांती घडवितात.

## बीजशब्द

काटेमुंढरीची शाळा, शिक्षण, शिक्षक, मुनघाटे गुरुजी, मडगू पाटील, शिदू, आदिवासी

## विषय विवेचन

शिक्षण मनुष्याचा तिसरा डोळा आहे. शिक्षणाची गंगा ही घरोघरी पोहचली पाहिजे हे सर्वोच्च ध्येय डोळ्यासमोर ठेवून काम करणाऱ्या मुनघाटे गुरुजींचे ध्येयनिष्ठ व्यक्तिचित्रण 'माझी काटेमुंढरीची शाळा' या कादंबरीतून अधोरेखित होते. गडचिरोली जिल्ह्यातील काटेमुंढरी या अतिशय आडवळणाच्या गावात मुनघाटे गुरुजींची नियुक्ती झाल्यानंतर मुनघाटे गुरुजी नियुक्ती आदेश घेऊन काटेमुंढरीला शिक्षक पदावर रुजू होण्याकरिता निघतात त्या वेळेस तेथील ट्रक ड्रायव्हर त्यांना म्हणतो, "बाबूजी काटेमुंढरी को काय को मरणे जाते"[1] असे बोलून काटेमुंढरी किती धोक्याचे गाव आहे याची ट्रक ड्रायव्हर गुरुजींना जाणीव करून देतो आणि म्हणतो, "देखो बाबूजी आपको आना ही है तो यहा से एक मिल आगे पेट्रोल पंप के पास जा के खडे रहो| केबिन मे जगह नही मिलेगी| मोहरील साहब और उनका जनाना वहा बैठ रहा है| आपको ट्रक मे पीछे बैठना पडेगा| वहां साले पोलीसवाले तंग करते, करके आपको आनाही है तो आगे हो के रहो| आपको मै सांजगड छोड दुंगा|[2] ट्रकमध्ये बसून मुनघाटे गुरुजी सांजगडला पोहचतात. काटेमुंढरीचे मडगू पाटील गुरुजींना घेण्याकरिता बैलगाडी घेऊन सांजगडला आलेले असतात. बैलगाडीत बसल्यानंतर गुरुजी निश्चिंत होतात. काटेमुंढरीला पूर्वीच्या एका शिक्षकाचा खून झाल्याचे मडगू पाटील सांगतो. अंधार पडायला लागल्यानंतर काटेमुंढरी गाव येते. डोंगराच्या पायथ्याशी असलेले, अंधारी रात्र, झुडपांची गर्दी असलेल्या गावात गेल्यानंतर शालेय जीवनातील निरोप समारंभातील पाहुण्यांनी विचारलेला प्रश्न आठवला. तुम्हाला जंगलात सोडले तर तुम्ही काय घ्याल? आणि मी उत्तर दिले, काटे !

"माझ्या वाट्याला खरोखरच काटे आले होते. पण या काट्याची फुले करून मुंढरीची पंढरी साजरी करायला मी सिद्ध झालो होतो."[3]

काटेमुंढरीची बंद पडलेली शाळा मडगू पाटलाच्या सहकार्याने सुरू होते. गुरुजी विद्यार्थ्यांना आणि पालकांना विश्वासात घेऊन शाळेतील मुलांची उपस्थिती वाढवितात. 'माझी काटेमुंढरीची शाळा' या कादंबरीविषयी डॉ.रमेश वरखेडे म्हणतात, 'माझी काटेमुंढरीची शाळा' ह्या कादंबरीमागे मुनघाटे गुरुजींच्या प्रदीर्घ अनुभवाची मुस असली तरी ती त्यांची आत्मकथा नाही. गडचिरोली जिल्ह्यातल्या कुठल्याही आदिवासी गावातील शाळेची, तेथील शिक्षकांची आणि ग्रामीण जीवनाची ही प्रातिनिधिक कथा आहे. प्रत्येक शिक्षकाने आणि सर्व संस्थाचालकांनी वाचून चिंतन करावे इतकी मोलाची कादंबरी आहे"[4] अशा शब्दात गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी शाळेची भीषणता तसेच कादंबरीचे महत्त्व विषद केले आहे.

आदिवासी परिसरातील शाळांची अवस्था अतिशय वाईट झालेली असते. अमावस्ये- पौर्णिमेला शाळा भरलीच तर चार - सहा मुलांची उपस्थिती असते. महिन्याकाठी पगार मात्र उचलला जातो अशा परिस्थितीत शाळा कशी सुरू करावी असा प्रश्न मुनघाटे गुरुजींपुढे निर्माण होतो. त्याकरिता मडगू पाटलाच्या मदतीने गावकऱ्यांना एकत्र करून गुरूजी सांगतात, "मी तुमच्यातलाच एक आहे, असे समजा. मी तुमचं लेकरू आहे तुम्ही माझे आई-वडील आहात आणि तुमची मुलं -मुली ही माझी बहिण भावंड आहेत मी शिकून जसा शहाणा झालो, तसे माझे भाऊ शिकून शहाणे व्हावे म्हणतो, म्हणून त्यांना नियमित शाळेत पाठवा, अशी माझी विनंती आहे!"[5]

गुरुजींचे म्हणणे भावपूर्ण गोंडी भाषेत मडगू पाटलांनी गावकऱ्यांना सांगितल्यानंतर गावकऱ्यांनी "इगो इगो" असा सामूहिक आवाज केल्यानंतर गुरुजींना समाधान वाटले यावरून गुरुजी आदिवासी बांधवांशी किती एकरुप झाले होते. त्यांच्या मनात आदिवासी मुलांच्या शिक्षणाविषयी किती तळमळ होती हे दिसून येते.

शिदू हा मुनघाटे गुरुजींचा आवडता विद्यार्थी. तीन -चार दिवसांपासून अनुपस्थित असतो. गुरुजी शिदूची चौकशी करतात परंतु शिदूविषयी एकही विद्यार्थी तो कुठे आहे याविषयी सांगत नाही. त्यामुळे मुनघाटे गुरुजी थेट त्याच्या घरी जातात आणि त्याला शाळेत न येण्याचे कारण विचारतात, तेव्हा लहान भावाला वातुला वागवायचे असल्यामुळे शिदू शाळेत येऊ शकला नाही, असे कळते. त्या वेळेस मुनघाटे गुरुजी शिदूला म्हणतात, "तू काळजी करू नकोस, तू जरी शाळेत आला नाहीस तरी शाळेच्या वेळेशिवाय तुला एकट्याला शिकवायला मीच तुझे घरी येईन. पण माझा एक हुशार विद्यार्थी मी कधीच गमावणार नाही."[6]

शिदूचे आई वडील काम करण्याकरिता जात असल्यामुळे लहान भावाला सांभाळण्याचे काम शिदूला करावे लागते. त्यामुळे शिक्षण घेण्याची तीव्र इच्छा असूनही वडिलांच्या विरोधामुळे शिदू शाळेत येऊ शकत नाही म्हणून गुरुजींनी शिदूच्या लहान भावाला सांभाळण्याकरिता एका म्हातारीची व्यवस्था केली आणि शिदूची शाळा पुन्हा सुरू झाली. पुन्हा एका आठवड्याने शिदू शाळेत येऊ शकला नाही तेव्हा कळले की, शिदूच्या आत्याच्या कुटुंबात लग्न समारंभ असल्यामुळे किमान एक आठवडा तरी शिदू शाळेत येऊ शकणार नाही आणि एका आठवड्यानंतर मुनघाटे गुरुजींचा आवडता आणि हुशार विद्यार्थी पुन्हा शाळेत हजर झाला. मुनघाटे गुरुजींविषयी आणि कादंबरीविषयी हेरंब कुळकर्णी लिहितात, "माझी काटेमुंढरीची शाळा' या शाळेतील शिक्षक हा वाचकाला भिडतो त्याचे कारण तो मना मनात दडलेला आहे. या जुन्या काळच्या पिढीच्या गुरुजींचा प्रतिनिधी आहे. वाचकांना बालपणीचा गुरुजी या गुरुजीमध्ये भेटतो हे या पुस्तकाचे सर्वात मोठे सामर्थ्य आहे."[7]

मुनघाटे गुरुजींच्या व्यक्तिमत्त्वाचे निरीक्षण केल्यानंतर जुन्या पिढीतील गुरुजीची आठवण झाल्याशिवाय राहत नाही.

जेव्हा गुरुजी आपल्या सायकलने बाजाराला सांजगडला जाण्याकरिता निघतात तेव्हा मडगू पाटलांपासून पाच-पंचवीस बाया माणसांचे कुणाचे मातीचे तेल, कुणाची तंबाखू, कुणाच्या बांगड्या, कुणाची प्लास्टिकची फुलं असा संपूर्ण गावाचा बाजार गुरुजींच्या सायकलवर असे. गुरुजींना काटेमुंढरीचे आदिवासी बांधव आपल्यातला एक समजत. गुरुजींशी संपूर्ण गाव एकरूप झाले होते. कुणाचे लग्न करायचे तर सल्ला गुरुजींचा, कुणी आजारी पडले तर कोण्या डॉक्टरकडे न्यायचे तेव्हा सल्ला गुरुजींचा, एवढेच नव्हे तर एखादी पाच रुपयाची वस्तू गुरुजींनी शंभर रुपयाची जरी सांगितली तरी गावकरी त्यांच्यावर विश्वास ठेवत एवढा प्रचंड विश्वास गुरुजींनी संपादन केला होता. प्रा. सागर लटके मुनघाटे गुरुजींविषयी म्हणतात, "गो.ना. मुनघाटे यांनी एक प्रामाणिक शिक्षक म्हणून काम केलेच, पण त्याचबरोबर नोकरीपुरते मर्यादित न राहता आदिवासी जीवनाचे सुक्ष्म निरक्षण केले आहे. आदिवासींच्या भावना, सुख-दुःखे, जीवनमान व राहणीमान यांचे अवलोकन करून ते कादंबरीच्या स्वरूपात व्यक्त केलेले आहे."[8]

काटेमुंढरीच्या आदिवासी बांधवांच्या अडचणी मुनघाटे गुरुजी अतिशय आनंदाने सोडवत असत. काटेमुंढरीत मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था झाली पण गावात निरक्षर स्त्रियासुद्धा आहेत. त्यामुळे मडगू पाटलाची बायको रीपा पाटलीनच्या आग्रहामुळे गावात निरक्षर स्त्रियांकरिता मुनघाटे गुरुजी रात्रीची शाळा सुरू करतात. रीपा पाटलीनबरोबर गावातील स्त्रिया रात्रीच्या शाळेत येऊन अक्षर ओळख करून घेतात. गावात कोणीही निरक्षर राहू नये हा यामागचा गुरुजींचा उद्देश असतो. एवढेच नव्हे तर, मडगू पाटील आणि गुरुजी शाळा बांधण्याचा विचार करतात त्यावेळेस रीपा पाटलीन माहेरचा सोन्याचा दागिना शाळेच्या बांधकामाकरिता देण्यास तयार होते हे सर्व गुरुजींच्या कर्तृत्वामुळेच शक्य होते. गो.ना. मुनघाटे गुरुजींविषयी प्रा. डॉ. तुळशिराम उकिरडे लिहितात, "काटेमुंढरीतील गुरुजींचे कार्य समग्र समाजासाठी, आदिवासींच्या शिक्षणासाठी प्रेरणादायी आहे. याचा समग्र् समाजाने बोध घेऊन प्रेरणादायी वाटचाल करावी हा संदेश 'माझे काटेमुंढरीची शाळा' वाचत असताना पानोपानी समोर येतो."[9]

काटेमुंढरीच्या शाळेतील मुले ही सर्वगुण संपन्न व्हावी असा ध्यास गुरुजींनी घेतला होता. त्याकरिता त्यांनी दिवस-रात्र कष्टही केले. त्यांच्या कष्टाचे फळ म्हणजे काटेमुंढरीच्या शाळेची चमू पंचायत समिती पातळीवरच्या क्रीडा संमेलनात अव्वल ठरली. त्यामुळे मडगू पाटील आणि गावकऱ्यांना प्रचंड आनंद झाला होता. मडगू पाटलांनी तालुक्याच्या गावी क्रीडा स्पर्धेत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांची जेवणाची व्यवस्था केली होती. याचा सर्व खर्च मडगू पाटलाने केला होता. तसेच खेळताना विद्यार्थ्यांचा उत्साह वाढावा म्हणून पाच- सहा गावकऱ्यांना तालुक्याच्या गावी पाठविले. मुनघाटे गुरुजींना अध्यापनाविषयी जेवढी आवड होती तेवढीच आवड निसर्गाविषयी आणि पशुपक्षांविषयी होती. काटेमुंढरीतील मुले मोराची शिकार करतात ही गोष्ट गुरुजींना माहित पडल्यानंतर मोराची शिकार करणे कसे चुकीचे आणि अयोग्य आहे हे सांगताना गुरुजी म्हणतात, "मोर हा आपला राष्ट्रीय पक्षी आहे. हे तुम्हास माहित नाही काय? मुलांनो त्या निष्पाप जीवाची तुम्ही शिकार करू नका. इतर शिकार करणाऱ्यांनाही मनाई करून निसर्गाचा हा ठेवा आपणच राखला पाहिजे असे आपल्या सर्व बांधवांना पटवून द्या. द्याल की नाही? सर्वांनी एकच आवाजात उत्तर दिले "होय गुरुजी"[10]

मोराची शिकार न करण्याचे आश्वासन मुलांकडून घेऊन त्यांना मोराची एक गोष्टही सांगितली आणि मोराची, सशाची किंवा कोणत्याही पशुपक्ष्यांची शिकार करणे गुन्हा आहे हे विद्यार्थ्यांना सांगतात. जेव्हा रूपगडचे रूपचंद महाराज काटेमुंढरीच्या डोंगरावर येतात त्यावेळेस काटेमुंढरीच्या शाळेतील विद्यार्थी महाराजांचे जंगी स्वागत करतात. गुरुजींच्या कार्याची माहिती महाराजांपर्यंत पोहचलेली असते. महाराज गुरुजींना म्हणतात, "तुमच्यासारखे त्यागी व कष्टी गुरुजी आमच्या संस्थानला लाभले असते तर आम्हीही धन्य झालो असतो. गुरुजी तुमच्या मुलांचे व तुमचे कौतुक

करावे तेवढे कमीच. आम्ही लोकांचे राजे, तुम्ही आमची मुले घडविली यासाठी तुमच्या शाळेला आमच्या संस्थांनतर्फे ही एक भेट"[11]

महाराजांनी दिलेल्या भेटीमध्ये, बक्षीसामध्ये शंभरेक चांदीची कलदार नाणी होती ती सर्व चांदीची नाणी गुरुजींनी शाळेच्या बांधकामासाठी मडगू पाटलाच्या स्वाधीन केली. आपल्या शैक्षणिक पेशाशी प्रामाणिक राहून विद्यार्थ्यांवर अतिशय उत्तम संस्कार करीत काटेमुंढरीच्या शाळेत पंचवीस वर्षे कशी निघून गेली हे कळले नाही असे मुनघाटे गुरूजी सांगतात. त्यातूनच त्यांच्यातील आदर्श शिक्षकाची जाणीव होते

'माझी काटेमुंढरीची शाळा' कादंबरीचा शेवट हा मनाला अतिशय भावणारा आहे. मनुघाटे गुरुजींचा आवडता विद्यार्थी शिदू हा काटेमुंढरीच्या शाळेत मुख्याध्यापक होतो त्याने त्या गावात केलेल्या शैक्षणिक, सामाजिक कार्याबद्दल आणि आदिवासी गावात उत्तम सेवा केल्याबद्दल त्याला गणराज्यदिनाचे औचित्य साधून राष्ट्रपतींच्या हस्ते राष्ट्रपती पदक घोषित झाले ही बातमी गुरुजींना कळली आणि शिदूने आपल्या यशाचे श्रेय काटेमुंढरीच्या गुरुजीला म्हणजे मुनघाटे गुरुजींना जाते हे वाक्य वाचल्यानंतर पंचवीस वर्षे काटेमुंढरीसारख्या आदिवासी खेड्यात काम केल्याचे सार्थक झाल्याचे समाधान वाटले.

## समारोप

'माझी काटेमुंढरीची शाळा' या गो. ना. मुनघाटे त्यांच्या कादंबरीतून आजच्या खाउजा संस्कृतीचा विज्ञान युगात मुनघाटे गुरुजीसारख्या कर्तुत्ववान शिक्षकाची, मडगू पाटलासारख्या दानशूर आणि गावच्या हिताकरिता झटणाऱ्या व्यक्तीची तसेच शिदूसारख्या कठीण परिस्थितीतही मातीचे सोने करणाऱ्या विद्यार्थ्यांची समाजाला आवश्यकता आहे. हे 'माझी काटेमुंढरीची शाळा' कादंबरीतून अधोरेखित होते.

## निष्कर्ष

1. आदर्श शिक्षकाची गुणवैशिष्ट्ये कादंबरीतून स्पष्ट होतात.
2. शिक्षण हेच मनुष्याच्या सर्वांगीण विकासाचे साधन आहे हे स्पष्ट होते.
3. समाजाच्या प्रगतीकरिता मुनघाटे गुरुजीसारखे ध्येयनिष्ट आणि प्रामाणिक शिक्षकांची आवश्यकता आहे.
4. प्रामाणिकपणे कष्ट केल्यास असाध्य गोष्ट साध्य होते.
5. गरिबीतही जिद्दीने शिक्षण घेऊन राष्ट्रपती पदक मिळविणाऱ्या शिदूसारख्या विद्यार्थ्यांची आजच्या समाजाला गरज आहे.
6. आदिवासींचा संघर्षमय जीवन प्रवास कादंबरीतून स्पष्ट होतो.
7. आदिवासींच्या जीवन, संस्कृतीचे दर्शन घडते.

## संदर्भ ग्रंथ सूची

1. मुनघाटे गो.ना., 'माझी काटेमुंढरीची शाळा', साधना प्रकाशन, पुणे, दहावी आवृत्ती, 20 नोव्हेंबर, 2018,पृष्ठ 20
2. तत्रैव, पृष्ठ 20
3. तत्रैव, पृष्ठ 23
4. वरखेडे रमेश, शिफारस, मुनघाटे गो.ना., "माझी काटेमुंढरीची शाळा", साधना प्रकाशन, पुणे, आवृत्ती दहावी, 20 नोव्हेंबर, 2018, पृष्ठ 8
5. मुनघाटे गो.ना.,उ.नि.1 पृष्ठ 39
6. तत्रैव, पृष्ठ 49
7. कुळकर्णी हेरंब, प्रस्तावना, मुनघाटे गो.ना., "माझी काटेमुंढरीची शाळा", साधना प्रकाशन, पुणे, आवृत्ती दहावी, 20 नोव्हेंबर, 2018, पृष्ठ14
8. लटके प्रा.सागर अशोक, "माझी काटेमुंढरीची शाळा" : एक जिवंत कलाकृती, अक्षर अक्षरवैदर्भी संपा. सावरकर डॉ. सुभाष, फेब्रुवारी 2013, पृष्ठ 59
9. उकिरडे , तुळशिराम चंद्रसेन, "आदिवासींच्या शिक्षणाची गाथा : "माझी काटेमुंढरीची शाळा", मराठी कादंबरी आकलन आणि विश्लेषण, संपा. गाडेकर डॉ. गायत्री सोपानराव, प्रथमावृत्ती 5 सप्टेंबर 2017, पृष्ठ 121-122
10. मुनघाटे गो.ना.,उ.नि.1, पृष्ठ 108-109
11. तत्रैव, पृष्ठ 119

❖❖❖

# संत तुकारामांच्या कवितेची वाङ्मयीन वैशिष्ट्ये

**डॉ. गजानन घोंगटे**
विभाग प्रमुख, मराठी विभाग,
श्रीमती सांळुकाबाई राऊत कला व वाणिज्य महाविद्यालय,
वनोजा. जि. वाशिम. 444402.
मो.नं.: 9822406115 ई-मेल: ghongategajananb@gmail.com

## गोषवारा:

संत तुकारामांच्या कवितेला आत्मनिष्ठा व अनुभवाचे अधिष्ठान आहे. त्यांच्या प्रत्येक अभंगातून त्यांचे व्यक्तिमत्त्व डोकावते. त्यांना जे अनुभवाला आले ते त्यांनी धाडसाने मांडले. आपला अनुभवही ते सत्य-असत्याच्या कसोटीवर पारखून घेतात. आपले अनुभव ते आपल्या कवितेतून अत्यंत कुशलतेने मांडतात. त्यामुळेच त्यांच्या अभंगात गोडवा निर्माण झाला आहे. विविध वाङ्मयीन गुणांनी नटलेली त्यांची कविता चांद्यापासून बांद्यापर्यंत खेड्यापाड्यांतील लोकांना मुखोद्गत आहे. सर्वसामान्यांच्या हृदयाचा ठाव घेणाऱ्या या कवितेने मराठी भाषिकांना अक्षरश: वेड लावले आहे.

## प्रस्तावना:

तुकारामांचे वाङ्मय हे अक्षर वाङ्मय आहे. त्यात कालसापेक्षता आहे म्हणूनच आजही तुकारामांचे अभंग कालबाह्य वाटत नाही, तुकाराम हे महाराष्ट्रातील भागवतधर्माचे प्रभावी प्रवक्ते होते. त्यांनी त्या काळात वैज्ञानिक दृष्टीकोन जोपासला व बहुजन समाजातील धर्मवेडेपणावर प्रहार केले. वारकरी संप्रदायात विज्ञानवादी दृष्टीकोन जोपासून त्यांनी दंभावर प्रहार केले. त्यांच्या अभंगात साधा, सोपा, सरळ भक्तीमार्ग, आध्यात्मिकता, सामाजिकता, तात्विक अधिष्ठान असल्यामुळे त्या अभंगांनी मराठी वाङ्मयात मोलाची भर घातली आहे.

## विषय विवेचन:

संत तुकारामांच्या कवितेची वाङ्मयीन वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे नमुद करता येतील.

**भाषा:**

भाषा हा तुकारामांच्या अभंगाचा आत्मा आहे. साधी, सोपी, सरळ व सुगम अशी ही भाषा आहे. त्यात प्रासंगिकता, ओज, माधूर्य, गेयता व आत्मनिष्ठा यांचा प्रत्यय येतो. या भाषेवर संस्कृतचा प्रभाव नाही. फारशी भाषेचाही परिणाम जाणवत नाही. सफाईदारपणा, कणखरपणा आहे. त्यांची भाषा दुधारी आहे. तुकारामांच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब त्यांच्या अभंगात जाणवते. करूणात्मक व आत्मस्थिती व्यक्त करणारे अभंग यातून अत:करणातील तळमळ दिसते.

उपदेशपर अभंगात भाषेचा जहालपणा व तिखटपणाही जाणवतो. त्यांच्या अभंगातून अंतरीचा कळमळा जाणवतो.

'चुकलिया माये

बाळ हुरू हुरू पाहे
जीवना वेगळी मासोळी
तैसा तुका तळमळी'

(तुकाराम गाथा-266)

"तुकोबांच्या कोणत्याही अभंगात ते स्वत: आहेत. त्यांच्या भावना, त्यांचे विचार, त्यांच्या आशाआकांशा हे सारे त्यांच्या अभंगातून व्यक्त होते. म्हणूनच इथे तुकारामांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा आपण परिचय करून घेणार आहोत. त्यांचे कवित्व, भाष्य, तत्वचिंतन, परखडपणा, बंडखोरी यांचा उहापोह इथे आपल्याला करायचा आहे. त्यांच्या कवित्व आणि व्यक्तिमत्त्वाची एकरूपता पाहून त्यांची वाङ्मयीन महत्ता आपल्याला पाहायची आहे."[1]

तुकारामांच्या अभंगाची भाषा परखड आहे ती तिखटही आहे याचा प्रत्यय त्यांच्या पुढील अभंगावरून येतो.

'मुखे सांगे ब्रम्हज्ञान। जन लोकाची कापितो मान॥धृ.॥
ज्ञान सांगतो जनासी। नाही अनुभव आपणासी॥1॥
कथा करितो देवाची। अंतरी आशा बहु लोभाची॥2॥
तुका म्हणे तोचि वेडा। त्याचे हाणूनि थोबाड फोडा॥3॥'

(तुकाराम गाथा-4021)

तुकारामांच्या अभंगात लोकभाषा व लोकबोली यांचा अधिकाधिक वापर झालेला दिसतो. त्यांच्या भाषेबद्दल निर्मलकुमार फडकुले म्हणतात-

"जिला आपण कवितेची भाषा म्हणतो, ती भाषा मुद्दाम श्रृतिसलग बनवलेली, रूजविलेली, ठोकून ठोकून नीट केलेली, वक्रोक्तीयुक्त भाषा असते. तुकारामांना नेमका त्याच भाषेचा कंटाळा आहे. तुकोबा जी भाषा बोलतात तीच अभंगवाणीची भाषा आहे. ती बोलीला जवळची असते. खेड्यापाड्यातील लोकांना तुकारामांची अभंगवाणी फार जवळची वाटते. ती त्यांना चटकन कळते. ह्याचे कारण हेच असावे. ह्या लोकांना बोलणे समजते."[2]

## आकृतिबंध:

तुकारामाच्या अभंगात आकृतिबंधाला विशेष महत्त्व आहे. त्यांनी मोठा अभंग, लहान अभंग असे अभंगाचे दोन प्रकार वापरलेत.

"तुकारामांनी आपल्या गाथेत अभंग हा काव्य प्रकार वापरला आहे. कारण नामदेवांची आज्ञा व अभंगाला कीर्तनातून सादर केल्यामुळे त्याला मिळणारी लोकप्रियता. त्यामुळे तुकारामांनी आपल्या रचनेसाठी अभंग हा छंद स्वीकारला. यात लहान व मोठा अभंग असे प्रकार आहेत. लहान अभंग यात दोन चरण असून अक्षरे सात-आठ अशी. याला 'समचरणी' अभंग असेही म्हणतात."[3]

**छोटा अभंग:**

'अणुरेणीया थोकडा - अक्षरे 8
तुका आकाशा एवढा' - अक्षरे 8
यमक शेवटी 'डा', 'ढा'

**मोठा अभंग:**

हा छंद नामदेवांच्या कवितेत वापरलेला दिसतो. यात चार चरण आहेत. त्यापैकी पहिल्या तीन चरणांत सहा अक्षरे चौथ्या चरणात चार. यमक दुसर्‍या व तिसर्‍या चरणात शेवटी.

| | |
|---|---|
| 'जेथे जातो तेथे | - अक्षरे 6 |
| तू माझा सांगाती | - अक्षरे 6 - यमक |
| चालविसी हाती | - अक्षरे 6 - यमक |
| धरूनिया' | - अक्षरे 4 |

## प्रतिमा:

तुकारामांच्या अभंगात प्रतिमांचा भरपूर वापर केलेला दिसतो. त्यांच्या अभंगातील प्रतिमांबाबत प्रा. रा. ग. जाधव म्हणतात. "तुकारामांची काव्यसृष्टी ही एक प्रकारची प्रतिमासृष्टीच आहे. या दोन्ही सृष्टी एकरूप आहेत. त्या एकाच गर्भातून अवतरतात व सारख्याच रीतीने त्यांचा विकास होतो. कवितेचे कवितापण तिच्या प्रतिमारूपात पडलेले असते."[4]

तुकारामांच्या अभंगात विविध प्रतिमांचा वापर केलेला दिसतो. त्यांचा अभंग म्हणजे एक प्रतिमाच असते. प्रतिमांशिवाय काव्य शक्य नाही. त्या प्रतिमात अनुरूपता, एकरूपता, औचित्य असावे लागते. साधारणत: प्रतिमांच्या गुणधर्मात पूर्वस्मृती जागृती, ताजेपणा, नावीन्य, तीव्रता, अर्थसंपन्नता यांचा समावेश होतो.

तुकारामांच्या अभंगात प्रतिमांचा चढता क्रम दिसतो. तो क्रम प्रतिमांची उंची वाढवत नेतो. त्यांच्या प्रतिमा अति सूक्ष्म व सखोल असतात. त्याचा प्रत्यय पुढील अभंगावरून येतो-

'कमोदिनी काय जाणे तो परिमळ/भ्रमर सकळ भोगीतसे॥
तैसे तुज ठावे नाही तुझे नाम/आम्हीच ते प्रेम सुख जाणो॥
माते तृण बाळा दुधाची ते गोडी। ज्याची नये जोडी त्यासी कामा।
तुका म्हणे मुक्ताफळ शिंपी पोटी। नाही त्याची भेटी भोग तिथे॥2॥'

(तुकाराम गाथा 533)

## अलंकार:

तुकारामांच्या काव्यात अलंकारांचा वापरही केलेला दिसतो. अलंकारामुळे त्यांच्या अभंगात परिणामकारकता व सौंदर्यही आले. वाङ्मयीन सौंदर्य रसिकांना आनंद देते. तुकारामांनी आपल्या कवितेचे सौंदर्य अलंकारांनी वाढविले आहे. अलंकार आणि काव्यात एकरूपता आहे. काव्यातील अलंकार काढले तर सौंदर्याला छेद जाईल.

'कन्या सासुर्‍यासि जाये
मागे परतोनि पाहे
तैसे जाले माझ्या जिवा
केव्हा भेटसी केशवा'

(तुकाराम गाथा 266)

या अभंगातील प्रथम दोन चरण काढल्यास काव्य सौंदर्यात बाधा येते. अलंकारामुळे भाषेची शोभा वाढते. संतांच्या सहवासात वाणी अलंकृत होऊन त्यातून शुद्ध बिजाची पेरणी होते. तुकारामांना अलंकार हे बाह्यसौंदर्य वाढविणारे वाटतात. कारण भक्तिशिवाय वाणी अलंकृत होऊ शकत नाही, असे त्यांना वाटते.

तुकारामांच्या अभंगगाथेत उपमा व दृष्टांत या दोन अलंकारांच्या उल्लेख दिसतो.

'नाही उपमा द्यावया
सम तुल्य आणिका ठाया'

(तुकाराम गाथा 332)

'सात्विक प्रेमळ दृष्टांताच्या मते
बोलिलो बहुत कळावया'

(तुकाराम गाथा-1890)

या दोन्ही अभंगातून तुकारामांचे अलंकारज्ञान व्यक्त होते. तुकारामांनी उपमा अलंकाराचा वापर गाथेत अनेक ठिकाणी केला आहे.

**रूपक:**

तुकारामांच्या अभंगात अभंगाची परिणामकारकता व परिणाम वाढविण्यासाठी रूपकाची योजना केलेली आहे. रूपक आशयाला सौंदर्य निर्माण करून देते. तुकारामांच्या अभंगात अनेक ठिकाणी रूपकाचा वापर केलेला दिसून येतो. उदा.

'मृदू सबाह्य नवनीत
तैसे सज्जताचे चित्त'

(तुकाराम गाथा-347)

सज्जनाचे चित्त व नवनीत याचा सांगड यात घातलेली आहे. तुकारामांच्या अभंगगाथेत बरीच रूपके आलेली आहेत. काही रूपके आध्यात्मिक आशयाच्या अभिव्यक्तीसाठी वापरली आहेत. कारण"पारमार्थिक विचार स्पष्टपणे रूपकातून मांडता येतात. ही रूपके लोकव्यवहारातही असतात. वरवरती व्यवहार दाखवितात. लक्षणेने तत्व विशद करतात."[5]

'आनंदाचे डोही आनंद तरंग'

(तुकाराम गाथा 3251)

**रस:**

तुकारामांच्या अभंगात विविध रसांची अनुभूती येते. त्यांच्या अभंगात रसपरिपोष प्रभावीपणे जाणवतो, या रसात शृंगार, वीर, करूण, हास्य, भयानक, बीभत्स, अद्भूत, शांत व वात्सल्य आणि ज्ञानदेवांनी सांगितलेला भक्तिरस यापैकी शांत, वीर, करूण, हास्य व भक्तिरस तुकारामांच्या कवितेत दिसतात. वीररस पाईकांच्या अभंगात आहे.

'रात्री दिवस आम्हा युद्धाचा प्रसंग'

(तुकाराम गाथा-4091)

**हास्यरस**

'कानडीने केला मर्‍हाठा भ्रतार
एकाचे उत्तर एका नये'

(तुकाराम गाथा-87)

'आवा चालली पंढरपूरा
वेसी पासुनी आली घरा'

(तुकाराम गाथा-4218)

## शांतरस

'सुंदरते ध्यान उभे विटेवरी
कर कटावरी ठेवूनिया'

(तुकाराम गाथा - 2)

## कथात्मकता:

तुकारामांच्या अभंगात कथात्मकता आहे. आपल्या कवितेतून मनोरंजन व लोकप्रबोधन करण्यासाठी कथात्मक प्रसंगाचा वापर तुकारामांनी केलेला दिसतो. तुकारामांच्या आत्मचरित्रपर अभंगातही कथात्मकता दिसते. उदा.

'आता काय खावे कुणीकडे जावे
गावात राहावे कोण्या बळे'

(तुकाराम गाथा 3881)

तुकारामांच्या कथात्मक अभंगात पुढील अभंग दिसतो.

'परिसे गे सुनबाई। नको वेचू दुध दही
आवा चालली पंढरपूरा। वेसीपासुनि आली घरा'

(तुकाराम गाथा-4219)

या कथात्मक अभंगात सासू सुनेकडे आपल्या घराचा कारभार सोपवून पंढरपूरला जाण्यास निघते. जाताना सुनबाईला सगळ्या सूचना देते. ती पंढरपूरला जायला निघते अन् वेशीपासून परत येऊन सुनबाईला बजावून सांगते.

## गेचता:

तुकारामाच्या कवितेत गेयता व नादमाधुर्य दोन्ही गुण दिसतात. सुरेश भटांच्या रंग माझा वेगळाच्या प्रस्तावनेत लता मंगेशकर म्हणतात "गीत कोणते आणि काव्य कोणते, गीतकाराला कधी कवी मानावे किंवा नाही, या वादात माझ्यासारखीने पडू नये पण उत्तम गीत हे मुळात उत्तम काव्य असावे लागते. याबद्दल सध्या कुणाचा मतभेद होईल असे वाटत नाही."[6]

आपण गेयता असणारे ते गीत हा उगीचाच समज करतो. शब्दांना एक विशिष्ट प्रकारचा स्वत:चाच नाद असतो. त्यामुळे काव्यात नादमयता येऊन जाते. डॉ. दिवाकर इंगोले तुकारामांच्या अंभगातील गेयते विषयी लिहितात- "तुकारामांच्या कवितेत गेयता आहे. कारण तुकाराम कीर्तन करीत व त्या कीर्तनात अभंग गायचे. साधी व सहज शब्दयोजना पण शब्दानुक्रमाने त्यात आलेली गेयता व नामदाधुर्य यामुळे लोकांना तुकारामांचे अभंग पाठ व्हायचे तुकारामांचे अभंग लोकगंगेने तारले आहे. तुकारामांचे कित्येक अभंग गायकांनी गायीले आहेत."[7] गेयता असणारे त्यांचे काही गाजलेले अभंग-

| | | |
|---|---|---|
| 1) | 'कन्या सासुऱ्यासी जाये मागे परतोनि पाहे.' | तुकाराम गाथा- 266 |
| 2) | 'जेथे जातो तेथे तू माझा सांगाती' | तुकाराम गाथा- 2000 |
| 3) | 'सदा माझे डोळे जसे तुझी मूर्ती' | तुकाराम गाथा- 03 |
| 4) | 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' | तुकाराम गाथा- 2481 |
| 5) | 'जाऊ देवाचिया गावा' | तुकाराम गाथा- 1871 |

तुकाराम कीर्तन करताना अभंग गायन करीत असल्याने अभंगात गेयता येण्यास मदत झाली असावी.

**काव्यगुण:**

तुकारामांच्या अभंगात काव्यगुण परिपूर्ण दिसतात. तुकारामांची कविता समृद्ध आहे. त्यात लय, ताल, नाद, गेयता, रस, माधुर्य, अलंकार, भाव, प्रासाद, आत्मनिष्ठा इत्यादी गुणांनी ती नटलेली आहे. त्यापैकी काही गुण खालीलप्रमाणे

**प्रासाद:**

तुकारामांच्या कवितेत प्रासाद हा गुण सर्वत्र विखुरलेला दिसतो.

'सत्य असत्याशी मन केले ग्वाही
मानियले नाही बहूमता'

(तुकाराम गाथा 1333)

'लोकांच्या घरी गाई म्हैसी
आम्हा घरी उंदिर घुसी'

(तुकाराम गाथा-2955)

**ओज:**

तुकारामांच्या कवितेत अनेक ठिकाणी ओज हा गुण आढळतो. उदा.

'मऊ मेणाहुणी आम्ही विष्णुदास
कठीण वज्रास भेदू ऐसे'

(तुकाराम गाथा-987)

**माधुर्य:**

तुकोबांचे अभंग गाताना व मनात वाचताना देखील माधुर्य या काव्य गुणाची प्रचिती येते.

**उदा.** 'जाऊ देवाचिया गावा
देव देईल विसावा
देवा सांगो सुखदु:ख
देव निवारील भूक'

(तुकाराम गाथा-1871)

तुकारामांची कविता काव्यगुणांनी उजळून निघाली आहे. तिने जनसामान्यांचे भावविश्व व्यापले आहे.

**भावसौंदर्य:**

तुकारामांची कविता ही भावकविता आहे. ती मानवी जीवनातील विविध भावछटा अभिव्यक्त करताना दिसते. तिच्यातील भाव शतकानुशतके माणसाचे भावजीवन व्यापून आहे.

उदा. 'शूद्रवंशी जन्मलो। म्हणोनि दंभे मोकालिलो
अरे तूचि माझा आता। मायबाप पंढरीनाथा।'

(तुकाराम गाथा-2766)

तुकारामांनी आपल्या वाट्याला आलेले हे वास्तव सांगताना 'दंभ' नसल्याबद्दलचे समाधान आहे. अन् शुद्र असूनही पाठीशी मायबाप म्हणून पंढरीनाथ उभा आहे. असा भाव व्यक्त केलेला दिसतो.

## सारांश:

तुकोबांचे संबंध वाङ्मय म्हणजे त्यांच्या आत्मानुभवाचा आत्मविष्कारच आहे. अंतरंगातून आलेला आशय ते जिव्हाळ्याने व्यक्त करतात. त्यांची भाषा बोलीच्या जवळची असल्यामुळे ही कविता लोकवाणीतून अवतरल्यासारखी वाटते. ही कविता प्रासाद, ओज, माधुर्य, गेयता अशा अनेक काव्यगुणांनी नटलेली आहे. संत तुकारामांच्या अभंगवाणीत चित्रमयता आहे, वस्तुस्थिती आहे आणि आत्मकथनही आहे.

## निष्कर्ष:

1) तुकारामांच्या अभंगाची भाषा ही लोकभाषा आहे. ही भाषा साधी, सोपी, सरळ व सुगम आहे.
2) तुकारामांनी आपल्या कवितेसाठी अभंग छंदाचा वापर केला.
3) तुकारामांची कविता ही प्रतिभा व प्रतिमा संपन्न आहे.
4) तुकारामांची कविता विविध अलंकारांचे रूप लेवून आपणास भेटते.
5) तुकारामांच्या कवितेत रूपकांची रेलचेल आहे.
6) तुकारामांची कविता ही भावकविता आहे.
7) तुकारामांच्या अभंगात गेयता व नादमाधुर्य आहे.
8) तुकारामांच्या कवितेत काव्यगुणांचा आढळ होतो.
9) तुकारामांच्या अभंगात आत्मनिष्ठा व आत्मविष्कार जाणवतो.
10) तुकारामांच्या अभंगात रसपरिपोष जाणवतो.

## संदर्भ:

* तुकाराम: 'अभंगगाथा', शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई-1873.
1) एका लेखकाचा अभ्यास: मध्ययुगीन-तुकाराम, य.च.म. मुक्त विद्यापीठ, नाशिक, प्रथमावृत्ती:2010, पृ.क्र. 198.
2) फडकुले, डॉ. निर्मलकुमार: 'संतकवी तुकाराम एक चिंतन' मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे द्वितीय आवृत्ती-1993.
3) इंगोले, डॉ. दिवाकर: 'संत एकनाथ व संत तुकाराम : तौलनिक अध्ययन', सुविधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती: 16 जुलै 2007. पृ. 247-248.
4) जाधव, प्रा. रा. ग.: 'आनंदाचा डोह', प्रज्ञा पाठशाळा मंडळ, वाई, प्रथमावृत्ती: 1976, पृ.60.
5) पाठक, डॉ. यशवंत: 'तुकारामांचे अभंग, साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती-1995, पृ.क्र. 38.
6) भट, सुरेश : 'रंग माझा वेगळा', बहुमत प्रकाशन, मुंबई-1981.
7) इंगोले, डॉ. दिवाकर: 'संत एकनाथ व संत तुकाराम : तौलनिक अध्ययन', सुविधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती: 16 जुलै 2007. पृ. 258.

❖❖❖

# प्रतिमेचे स्वरूप आणि प्रतिमा–अलंकार तुलना

**प्रा.डॉ.सौ. वीरा पवन मांडवकर**
सहायक प्राध्यापक
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि.यवतमाळ
संचालक, डॉ. भाऊ मांडवकर रिसर्च सेंटर
भ्रमणध्वनी 9403014885, इ मेल veeranmandavkar18@gmail.com

## सारांश :

प्रतिमा ही संकल्पना जरी मुळात पाश्चिमात्य साहित्य–समीक्षेतून आली आहे, तरी आज आधुनिक मराठी समीक्षेत ती स्थिरावलेली दिसते. इ.स. 1992 पासून मराठी साहित्यात प्रतिमा विचार प्राधान्याने करण्यात येवू लागला. प्रतिमा विचाराला केंद्रस्थानी ठेऊन मराठी काव्याचा वेगवेगळ्या दृष्टिकोनातून अभ्यास केला गेला. प्रतिमेचे अनेक गुणधर्म आणि प्रकार आहेत. प्रतिमा आणि अलंकार यांचाही संबंध सांगितला गेला आहे. कविता ही कोणत्याही प्रकारची असो, ती प्रतिमांचीच सेंद्रिय रचना असते. या प्रतिमांमध्ये वाचकांच्या अनेक स्मृती, अनेक भाववृत्ती स्वतःमध्ये समाविष्ट करून घेण्याची एक क्षमता असते. कवितेला समजून घेताना त्यातील प्रतिमासृष्टी उलगडल्या गेली तर कवितेचा आस्वाद घेणे सहज शक्य होते.

**बीजशब्द :** प्रतिमा, कविता, व्याप्ती, स्वरूप, गुणधर्म, संवेदना, समीक्षा, मन, संकल्पना, अलंकार

## प्रस्तावना :

प्रतिमा कशा असतात? तर प्रतिमा या शब्दांनी घडविलेल्या असतात आणि शब्दातील अनेकविध साधर्म्य–वैधर्म्ययुक्त अर्थच्छटांनी त्या गुंतागुंतीच्या अनेक पदरांनी बनलेल्या असतात. वाचकाच्या वैयक्तिक अनुभवसमृद्धीवर व अभिरुचीवर हया प्रतिमांना अर्थदृष्ट्या समृद्ध करून घेणे अवलंबून असते. स्पंज ज्याप्रमाणे आपल्यात पाणी समाविष्ट करून घेतो, त्याप्रमाणे प्रतिमाही वाचकांच्या स्मृती, भाववृत्ती, त्यांचे अनुभव आपल्यात सामावून घेतात. साहित्याचा आस्वाद घेताना या प्रतिमांना समजून घेणे महत्त्वाचे ठरते. प्रतिमासृष्टीचे सौंदर्य ज्याला उलगडून पाहता आले तो खरा रसिक, असे म्हणण्यास हरकत नाही. आजच्या कवितेतील भाषा ही प्रतिमांची भाषा असली त्याची पायवाट आधुनिक मराठी कवितेचे जनक कवी केशवसुत यांनी आखली. त्यावर पुढील पिढीने आपला ठसा उमटवत त्याचा राजमार्ग केला. आजच्या घडीला त्याला आणखी वाटांचे आणि आडवाटांचे फाटे फुटून मराठी कवितेचा प्रवाह त्यातून वेगवेगळ्या वळणांनी वाहतो आहे.

## प्रतिमेचे स्वरूप आणि व्याख्या :

प्रतिमा या संकल्पनेचा यथार्थ जर समजून घ्यायचा असेल तर image आणि imagery या शब्दांचे अर्थ पाहणे आवश्यक आहे, कारण प्रतिमा आणि प्रतिमासृष्टी या संकल्पना मूळच्या पाश्चिमात्य आहेत. इंग्रजीतील चेंबर्स आणि ऑक्सफर्ड या शब्दकोशांमधील व्यवहारात प्रचलित असणारे अर्थ पाहता त्यातून पुढील अर्थबोध होतो.

1. image – n. likeness : a statue: an idol : a representation in the mind, an idea : a picture or representation (not necessarily visual) in the imagination or memory : an appearance that which very closely resembles anything.

Imagery – the work of the imagination mental pictures figures of speech images in general or collectively.[1]

2. image – n. statue; optical appearance of a thing produced in a mirror or a lens; likeness; mental picture; general reputation of picture.

imagery – n. images, metaphorical language evoking mental pictures.[2]

काही अभ्यासकांनी 'प्रतिमा' या शब्दाचे आरशातील प्रतिबिंब, मूर्ती, व्यक्तिसदृश, प्रतिकृती, पुतळा, देवतांची मूर्ती, कल्पनेतील चित्राचे मूर्त स्वरूप हे विविध अर्थ सांगितलेले आहेत. ते वरील इंग्रजी शब्दकोशांतर्गत अर्थाशी मिळतेजुळते आहेत. त्याचप्रमाणे प्रतिमा म्हणजे संवेदना किंवा त्यांचे ठसे असा मानसशास्त्रीय अर्थही त्यांनी स्पष्ट केला असून कवीच्या मनातील मूळ काव्यानुभूतीचे भाषिक साधनांच्या साहाय्याने घडविलेले प्रतिदर्शन असा अर्थ काही ठिकाणी विशद केलेला दिसतो. काही अभ्यासकांनी image या संकल्पनेसाठी 'प्रतिमान' ही संज्ञा योजलेली आहे. 'प्रतिमान' या शब्दाचा अर्थच मुळी 'प्रति' म्हणजे कोणत्याही वस्तूला व 'मान' म्हणजे मोजणे असा आहे. संत ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी' मध्ये प्रतिमेची सौंदर्यपूर्ण व सुटसुटीत व्याख्या केली आहे. ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायाच्या प्रारंभी ज्ञानेश्वर म्हणतात,

*'सहजे शब्दु तरी विषो श्रवणाचा । परि रसना म्हणे हा रसू आमचा ।*
*घ्राणासि भावो जाय परिमळाचा । हा तोचि होईल ।। 6.17 ।।*

प्रतिमा हा विषय श्रवणाचा आहे की रसनेचा आहे की घ्राणेंद्रियाचा आहे. प्रतिमेला अशी पंचेंद्रियांची मर्यादा नाही, हेच ज्ञानेश्वरांना येथे सुचवायचे आहे.

## प्रतिमेचे गुणधर्म :

प्रतिमेच्या सुमारे 12 गुणधर्मांची विस्ताराने चर्चा केली गेली आहे. 1. उत्कटता 2. ताजेपणा 3. आवाहकत्व 4. चित्रमयता 5. पुनर्निर्मीती 6. परखडपणा 7. साक्षात्कार 8. साक्षेप 9. कलात्मक मितव्यय 10. इंद्रियसंवेदना 11. गुंतागुंत 12. मेळ यांचा समावेश आहे. क्लेमेन या शास्त्रज्ञाने म्हटले आहे, एखादी पृथक प्रतिमा, संदर्भापासून बाजूला काढलेली प्रतिमा ही अर्धवट प्रतिमा असते. प्रत्येक प्रतिमा, प्रत्येक रूपक आपल्या संदर्भापासूनच प्राण आणि महत्त्व मिळवते. प्रतिमांच्या वर्गीकरणाची प्रक्रिया ढोबळ व स्थूल स्वरूपाची असते, हे मान्य करुनही त्यांनी हे वर्गीकरण निर्दोष व्हावे यासाठी 'आत्मनिष्ठ आणि वस्तुनिष्ठ' अशा दोन्ही प्रकारांची आवश्यकता प्रतिपादिलेली आहे. अभ्यासकांनी इंद्रिय संवेदनात्मक प्रतिमा, मानसिक प्रतिमा, आणि बौद्धिक प्रतिमा या प्रतिमा प्रकारांवर भर दिलेला आहे. दृष्टी, श्रवण, स्पर्श, गंध आणि स्वाद या पाच मार्गांनी जीवनात अनुभूतीची प्रचिती येते. या सर्व अंगांनी अनुभवल्या जाणाऱ्या प्रतिमा म्हणजे इंद्रिय संवेदनात्मक प्रतिमा होय. त्याचे सखोलतेने विवेचन करण्यासाठी पुढीलप्रमाणे भाग पाडले गेले आहेत.

1. दृश्यात्मक प्रतिमा – आपण अनुभवलेले दृश्य जसेच्या तसे, त्याच मूळ स्वरूपात, तितक्याच तीव्रतेने पुन्हा रंगविण्याचा कवीचा प्रयत्न असतो. प्रत्येक प्रतिमेत थोडातरी दृश्यात्मकतेचा अंश असतोच. प्रतिमेचा सर्वसाधारण प्रकार म्हणजे दृश्यात्मक प्रतिमा होय.
2. श्रवणात्मक प्रतिमा – शब्दोच्चाराबरोबर अर्थ साहचर्य निर्माण करून प्रतिमाने श्रवण संवेदना जागृत करतात. क्वचित इतर भावनांची उदा. प्रेमभावना, विफलता, इत्यादिंची अनुभूतीही ध्वनिसंवेदनेतून व्यक्त होते
3. गंधात्मक प्रतिमा – कुठलीही अनुभूती जेव्हा संवेदनशील कविमनाला गंधसंवेदनेच्या भाषेत जाणवते आणि तो ती तशीच व्यक्त करू पाहतो, तेव्हा खरी गंधात्मक प्रतिमा तयार होते.
4. स्वादात्मक प्रतिमा – ज्या पदार्थांचा स्वाद अथवा चव आपण घेऊ शकत नाही, किंवा निदान घेतलेली नसते, किंवा घेतली तरी काही निराळीच लागण्याचा संभव असतो, त्या पदार्थांचा स्वाद, अनुभूती वर्णन करण्याच्या मिषाने कल्पिल्याने स्वादात्मक प्रतिमा तयार होतात.
5. मानसिक प्रतिमा – मन हे माणसाचे सहावे इंद्रिय आहे. जशी डोळ्याला दृश्ये दिसतात, कानाला ध्वनी ऐकू येतात, नाकाला वास येतो, त्वचेला स्पर्श होतो, जिव्हा आस्वाद घेते, तशाच मनाला भावना जाणवतात. मनाला काहीतरी वाटते, भासते, भावते. किंबहुना मनाकडून घडणारी क्रिया अथवा प्रतिक्रिया हा कुठल्याही अनुभूतीचा महत्त्वाचा भाग असतो. या संवेदनेचा अनुभव ज्या प्रतिमांच्याद्वारा कवी वाचकाला घडवितो. त्या प्रतिमांनाच आपण मानसिक प्रतिमा म्हणू शकतो.
6. बौद्धिक प्रतिमा – जिथे प्रामुख्याने बुद्धिला आवाहन आहे, तेथे प्रतिमांना 'बौद्धिक प्रतिमा' असे नाव द्यावयास हवे. भावनेपेक्षा बुद्धिला चालना देणारे, प्राधान्य देणारे असे सर्वच बौद्धिक प्रतिमेत मोडते.

कोणताही अनुभव काव्यातून अनुभवणे म्हणजे त्या अनुभवाचा भास शब्दांच्याद्वारा मिळणाऱ्या इंद्रिय संवेदनांनी मन, बुद्धि व भावना यांच्या साहाय्याने अनुभवणे होय. 'प्रतिमा म्हणजे कवितेच्या आरशात पडलेले कवीच्या अनूभूतीचे प्रतिबिंब होय. हे प्रतिबिंब संवेदनागर्भ व रूपकप्रक्रियेवर आधारित असे असते. ह संवेदनागर्भतेचे व रूपकप्रक्रियेचे प्रमाण कवीच्या अनुभवाप्रमाणे कमीअधिक असू शकते. प्रतिमा ही संकल्पना संवेदनागर्भता आणि साधर्म्यवैधर्म्याधिष्ठित रूपकप्रक्रिया या दोहोंच्या सहकार्यातून पूर्ण होते.'[3]

## प्रतिमा आणि अलंकार यांतील साम्यभेद–

मराठी साहित्य समीक्षेत प्रतिमा आणि अलंकार याविषयी सखोल चर्चा झाली आहे. यांमध्ये जसा परस्पर संबंध आहे, तसेच काही साम्यभेद पण आहेत. आतापर्यंत झालेल्या प्रतिमा–विचाराचे स्वरूप लक्षात घेता कवितेच्या जन्माबरोबर प्रतिमेचा जन्म होतो. असे निःसदिग्धपणे म्हणता येईल. परंतु प्रतिमा ही संकल्पना आणि या संकल्पनेच्या अस्तित्त्वाची जाणीव समीक्षकांना आधुनिक काळात झालेली आहे. यामुळेच ज्ञानेश्वरांच्यासारख्या कवींच्या अनुभवामृतासारख्या प्राचीन काव्यातही प्रतिमांचा आढळ होऊ शकतो. याउलट अलंकार ही संकल्पना घडवलेली आहे. अलंकाराचे तंत्रविशेष कवी आपल्या प्रतिभेच्या सामर्थ्यानुसार संपादित करू शकतो. ज्या कवीला प्रतिमा ही संकल्पना ठाऊक असण्याची दुरान्वयानेही शक्यता नाही अशाही प्राचीन कवींच्या काव्यात कवितेबरोबर प्रतिमांचा आढळ सहजपणे होतो. काव्यसौंदर्याचा शोध घेणे आणि त्यासाठी साधर्म्य वैधर्म्यादी संबंधाचा मागोवा घेणे, हे आणि एवढेच साम्य प्रतिमा व अलंकार यामध्ये आहे. यामुळे अलंकारांचा समावेश त्यातील तंत्रविशेष वगळता प्रतिमेमध्ये होत असला तरी सर्व प्रतिमा या अलंकार होऊ शकत नाही. आलंकारिक प्रतिमा ही आशयाला सजवण्याचे काम करते. त्यात निर्मितीपेक्षा क्रीडेला महत्त्व असते. आशय अलंकृत करणे हे सोपे असल्यामूळे पुष्कळसे काव्य या प्रकारात निर्माण होते. प्रतिमा या अलंकार म्हणून जशा वापरल्या जातात तशा त्या विचार स्पष्ट करण्यासाठी किंवा तो समजावून देण्यासाठी वापरल्या जातात. या प्रतिमांचे प्रयोजन वाचकांना काहीतरी पटविणे, असे असते. प्रतिमा आणि अलंकरांची रचना वरवर समान दिसत असली किंवा त्यांच्या निर्मिती मागील प्रेरणा समान असल्या तरी सखोल विचार केल्यास प्रतिमा अलंकारांमध्ये साम्य कमी आणि भेदच जास्त आहेत.

प्रतिमा व अलंकार या दोन संकल्पनांमधील ठळक भेद पुढीलप्रमाणे आहेत.

1. अलंकार हे संपादित घडवलेले व कृत्रिम असतात तर प्रतिमा या नैसर्गिक, सहज अकृत्रिम व स्वाभाविक असतात.
2. अलंकार हे स्थानिक असतात तर प्रतिमा या विकासक्षम, मूलभूत, व्यापक, परस्परपूरक, सूक्ष्म, सजीव व लवचिक असतात.
3. अलंकार हे स्थूल, निर्जीव व बंदिस्त असतात तर प्रतिमा या सूक्ष्म , सजीव व लवचिक असतात.
4. साधर्म्य–वैधर्म्यादी तत्त्वे व तंत्रविषयक मांडणीला महत्त्व असते तर प्रतिमांमध्ये संवेदना, भावना, व विचार आणि रूपकप्रक्रिया यामुळे साधणारी सेंद्रिय संघटना असते.
5. अलंकार हे आवश्यक व अपरिहार्य नाहीत पण प्रतिमा या आवश्यक आणि अपरिहार्य आहेत कारण हीच काव्याची भाषा आहे.

एका दृष्टीने पाहता 'प्रतिमान' ही अलंकारांची पूर्वावस्था आहे, तर दुसऱ्या दृष्टीने पाहता 'प्रतिमा' हे अलंकारांचे विकसित रूप आहे. हे डॉ. मिरजकर यांचे म्हणणे मान्य करता येत नाही. कारण प्रतिमा आणि अलंकार यांचा जन्म व विकास वेगवेगळया वेळी व वेगवेगळया रीतीने झाला आहे. अलंकार हे कोणत्याही अर्थाने प्रतिमेचे विकसित रूप होऊ शकत नाही. कवितेचे नैसर्गिक व स्वभावसिद्ध सौंदर्य म्हणजे प्रतिमा होय. तर कवितेचे संपादित सौदर्य म्हणजे अलंकार होय.

प्रतिमा आणि अलंकार यासंबंधी डॉ. रसाळ यांची विधाने पुढीलप्रमाणे आहेत. – 'काव्यातील अलंकारांना अनुलक्षून सर्वसाधारण 'प्रतिमा' ही संज्ञा आज मराठी समीक्षेत वापरली जाते. सर्वसामान्यपणे ज्यांना परंपरेने अर्थलंकार म्हटले जाते त्यांना आपण प्रतिमा म्हणतो. काव्याचा हा घटक केवळ शोभाकर धर्म आहे. तो अनित्य व गौण असून त्याच्याशिवायही काव्य असू शकते असे

परंपरेने मानले जाते. आज आपण या घटकाला आवश्यक घटक मानतो आणि त्याला प्रतिमा असे नाव देतो.'[4]

वरील विधानांमधून डॉ. रसाळ यांनी अर्धसत्य मांडले आहे. पूर्णसत्य काहीसे वेगळे आहे. अलंकार म्हणजे प्रतिमा होतात पण प्रतिमा म्हणजे अलंकार होऊ शकत नाहीत. हे पण ठासून सांगणे आवश्यक आहे. तसेच अलंकार हे उपरे आणि बाहय आहेत हे परंपरेने जे मान्य केले आहे ते बरोबरच आहे. मम्मटाचार्य हे अलंकाराशिवाय काव्य असू शकते, असे म्हणतात. '*क्वापि इत्येनैतदाह यत् सर्वत्र सालंकारी, क्वचित् तु स्फुटालंकाराविरहेऽपि न काव्यत्व हानिः।*' असे काव्यप्रकाशात मम्मटाचार्य स्पष्टपणे सांगतात. अलंकारांचे विविध प्रकारांतून वर्णन करणाऱ्या या संस्कृत आलंकारिकांनाही अलंकारांच्या मर्यादांची जाणीव असलेली दिसून येते. अलंकारांना प्रतिमा असे संबोधले तरी प्रतिमांना अलंकार असे संबोधता येत नाही. कारण प्रतिमेची संकल्पना अधिक व्यापक व अधिक मूलभूत आहे.

## निष्कर्ष :

1. इ.स. 1992 पासून मराठी साहित्यात प्रतिमा विचार प्राधान्याने करण्यात येवू लागला.
2. कवितेला समजून घेताना त्यातील प्रतिमासृष्टी उलगडल्या गेली तर कवितेचा आस्वाद घेणे सहज शक्य होते.
3. प्रतिमा आणि प्रतिमासृष्टी या संकल्पना मूळच्या पाश्चिमात्य आहेत.
4. एखादी पृथक प्रतिमा, संदर्भापासून बाजूला काढलेली प्रतिमा ही अर्धवट प्रतिमा असते. प्रत्येक प्रतिमा, प्रत्येक रूपक आपल्या संदर्भापासूनच प्राण आणि महत्त्व मिळवते.
5. प्रतिमा ही संकल्पना संवेदनागर्भता आणि साधर्म्यवैधर्म्याधिष्ठित रूपकप्रक्रिया या दोहोंच्या सहकार्यातून पूर्ण होते.
6. अलंकार हे आवश्यक व अपरिहार्य नाहीत पण प्रतिमा या आवश्यक आणि अपरिहार्य आहेत कारण हीच काव्याची भाषा आहे.

## संदर्भ :

1- 'Chembers 20th Century Dictionary' Ed. A.M. Macdonald, Alled Publication pvt. Ltd., New Delhi, 1972, page 651
2. ' 'The Oxford Mini Dictionary, Complied by J.M. Hawkins, Oxford University Press, New Delhi, 1991, page 249.
3. देशपांडे सई, प्रतिमाविचाराची रूपरेषा, 'अनुभवामृतातील प्रतिमासृष्टी', दैविका प्रकाशन, ठाणे, 1994, प्रथमावृत्ती, पृ. 28
4. रसाळ डॉ. सुधीर, 'कविता आणि प्रतिमा' मौज प्रकाशन, मुंबई, 1982 पृ. 3

## संदर्भ ग्रंथ :

1. जोग, वि.न., 'सार्थ अमृतानुभव', पाचवी आवृत्ती, यशवंत प्रकाशन, पुणे, 1986
2. मिरजकर, निशिकांत, 'आधुनिक मराठी काव्यातील प्रतिमांचे बदलते स्वरूप, पुणे विद्यापीठास सादर केलेला प्रबंध, 1972
3. महाराष्ट्र शब्दकोश, विभाग पहिला, अ.ए. दाते अणि य.रा. कर्वे संपादित, प्रथमावृत्ती, य.गो. जोशी प्रकाशन, पुणे, 1933

❖❖❖

# उ.रा. गिरी यांच्या कवितेतील सामाजिक जाणिवा

डॉ. पवन मांडवकर
प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५४०१
भ्रमणध्वनी ९४२२८६७६५८ E mail: pavanmandavkar@yahoo.com

## गोषवारा

विदर्भातील अकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूरचे कवी उ.रा. गिरी यांनी निसर्गवर्णनपर व प्रेमविषयक कविता अधिक प्रमाणात लिहिल्या असल्या तरी त्यांच्या सामाजिक कवितांचे विषयही उल्लेखनीय व समाजसन्मुख राहिले आहेत. समाजातील बदलत्या मूल्यव्यवस्थेचे भान या कवीने आपल्या कवितेतून अचूक टिपले आहे. मानवतेची उसवत चाललेली वीण त्यांच्या हळव्या मनाला जखमी करून जाते. मुखवट्यामागची स्वार्थी, ढोंगी, संधीसाधू माणसे हा जसा त्यांच्या कवितेचा चिंतनाचा विषय आहे, त्याचबरोबर खोटी प्रतिष्ठा बाळगणारी, दुतोंडी सत्ताधारी, कर्तव्यशून्य माणसे हेही त्यांच्या कवितांचे विषय आहेत. रंगभेदाविषयी प्रखर मत व्यक्त करतानाच पीडित—शोषितांविषयी त्यांची वाणी परिवर्तनाची शक्यता वर्तविते. उपहासगर्भ, विडंबनपर कविता लिहितानाच माणसातील माणुसकीवर असलेली त्यांची श्रद्धा आशावादी असल्याचे जाणवते.त्यांची कविता सामाजिक जाणिवांविषयी सजग असल्याचे दिसते.

बीजशब्द — सामाजिक जाणिवां, निसर्गवर्णनपर कविता, प्रेमविषयक कविता, सत्तेचे गुलाम, प्रतिष्ठित श्रीमंत, शोषण

## प्रस्तावना

आधुनिक मराठी कवितेच्या प्रांतात जी काही मोजकी नावे अत्यंत प्रभावशाली म्हणून गणल्या गेली, त्यात उद्धवगीरी रामगीरबुवा गिरी हे एक नाव आहे. अकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूर तालुक्याच्या लाखपुरी नावाच्या लहानशा गावात १० ऑक्टो. १९२९ साली त्यांचा जन्म झाला. कलासक्त व प्रतिभासंपन्न साहित्यिक म्हणून ते ओळखले जातात. 'इ.स. १९४९ साली ७ व्या वर्गाची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर या कवीने अखेरपर्यंत प्राथमिक शिक्षकाची नोकरी केली. पुढे मित्रांच्या आग्रहाखातर त्यांनी १९६८ ला मॅट्रीकची परीक्षा दिली व त्यात ते उत्तीर्णही झाले. मात्र,कमालीच्या गरिबीमुळे आयुष्याच्या परीक्षेत ते अयशस्वी ठरले आणि शिक्षक दिनाच्या दिवशी या संवेदनशील मनाच्या कर्तव्यदक्ष शिक्षकाच्या जीवनाची अखेर दि. ५ सप्टेंबर १९८६ रोजी झाली.'[१]

अल्प आयुष्य वाट्याला येऊनही उ.रा. गिरी यांनी काव्यप्रांतात स्वतःचा एक ठसा उमटविला. हाताच्या बोटावर मोजता येईल एवढे अत्यल्प लेखन करूनही त्यांच्या कवितेची नोंद सातत्याने मराठी सारस्वतात घेतली गेली. त्यांच्या रचनांवर नेहमीच समीक्षणे प्रकाशित होत गेली आणि आजही होतात.

## विषयविवेचन

प्रारंभी निसर्ग वर्णनात रमलेल्या या कवीला प्रेमविषयाचेही वावडे नव्हते. कवी पुंडलिक हे त्यांचे गुरू. गुरूंचे लाभलेले मार्गदर्शन, घरच्या गरिबीमुळे अनुभवातून आलेले शहाणपण व सभोवतीच्या निसर्गामध्ये रमणारे मन यातूनच त्यांच्या काव्यप्रतिभेला धुमारे फुटले. वृत्तपत्रे, मासिके, नियतकालिके यांमधून त्यांच्या रचनांना प्रसिद्धी मिळाल्यामुळे रसिकांची दाद व जाणकारांकडून कौतुकाची थाप मिळत गेली. पुढे त्यांच्या कवितेतील नवखेपणा जाऊन ती परिपक्व, चिंतनशील व सामाजिक आशयाला जवळची होत गेली. कोणताही हाडाचा कलावंत इतरांपुढे स्वतःचे दुःख कुरवाळत न बसता इतरांचे दुःख वा समस्या समजून घेण्यात व त्या शब्दांकित करण्यासाठी झटतो किंवा तत्पर राहतो, त्याचप्रमाणे उ.रा.गिरी यांच्यातील कलावंतानेही सामाजिक जाणिवांना जवळ केले आहे.

आधुनिक मराठी कविता आणि आधुनिक मराठी नवकवितेचा प्रवास बघताना कितीतरी प्रयोग कविताप्रांतात कितीतरी कवींनी केले. स्वातंत्र्योत्तर काळात सामाजिक जाणिवांनी काव्यलेखन करणारे कवी म्हणून केशवसुत, अनिल, कुसुमाग्रज, मुक्तिबोध, मर्ढेकर यांची नावे पुढे येतात. या कवींनी समाजातील अनेक प्रश्नांना हात घातला. त्याच वाटेने प्रवास करत वैदर्भीय कवी उ.रा.गिरी यांनी समाजाला भेडसावणाऱ्या अनेक समस्यांना आपल्या

रचनांमधून मांडले. साहजिकच त्यांच्या कवितेचा अभ्यासही अनेकांनी केला. त्यांच्या कवितेविषयी समीक्षक डॉ. रू. पां. पाजणकर म्हणतात, '१९५० पासून त्या काळी अग्रेसर असलेल्या 'अभिरूची'मधून वा 'सत्यकथे'मधून कवी अनिल यांसारखी मोठी आणि वेगळी पिढी सोडली तर वैदर्भीय कवितेने या प्रतिष्ठित मासिकांत स्थान पटकावले, याचे श्रेय उ.रा. गिरींच्या कवितेकडे जाते.'[२] ही त्यांची प्रतिक्रिया गिरींच्या कवितेचे स्थान स्पष्ट करते. प्रेमविषय व निसर्गवर्णनाच्या रचना तर त्यांच्या होत्याच; पण अनुभवाच्या संपन्नतेबरोबर गिरी समाजमनाचा ठाव घेण्याइतपत सामाजिक जाणिवांना काव्यरचनांमधून व्यक्त करू लागले. समाजवास्तवाचे बदलते संदर्भ त्यांनी आपल्या कवितेतून नोंदविले.

समाजाला कवितेच्या माध्यमातून रंगरूप देताना किंवा सामाजिक चित्र रेखाटताना हा कवी चिंतनशील, भावनिक व हळवा होतो. अतिशय डोळसपणे समाजाकडे पाहण्याची दृष्टी त्यांना लाभली असल्यामुळे छोट्या छोट्या गोष्टीही त्यांच्या निरीक्षणातून सुटत नाहीत. त्यामुळेच त्यांची कविता एका उच्च पातळीवर जाते.

कोणत्याही साहित्यात सामाजिक जाणिवेची रचना ही मानवी मनातील आद्य प्रेरणेशी किंवा सहजप्रवृत्तीशी संबंधित असते. सामाजिक पर्यावरणाचा माणसाच्या घडणीवर प्रभाव पडत असतो. आयुष्यात आलेले भलेबुरे अनुभव, प्रसंग, घटना, परिस्थिती यांतून सामाजिक जाण प्रगल्भ होत जाते. यातूनच कलावंत आपले अनुभवकोष विणत जातो. कलावंताला सामाजिक जीवनाचे, त्यातील जाणिवांचे भान ठेवणे क्रमप्राप्त असते. गिरींची सामाजिक जाणीव तीव्र असल्याने ग्रीष्मातील ऐन दुपारी 'वाढा बाई भाकर' म्हणणारी अनवाणी पायाची म्हातारी त्यांच्या दृष्टीतून सुटत नाही. तिच्या घशाला पडलेली कोरड, त्राण गेलेले शरीर निःशब्द झालेली वाणी आणि लेकरांची भूक भागविता यावी, यासाठी तिने केलेला केविलवाणा प्रयत्न हे सर्व प्रसंग दु:खाची तीव्रता व्यक्त करतात. त्यांना त्या बाईच्या ठिकाणी स्वत:ची आई दिसायला लागते, आणि त्याहीपुढे त्यांचे दु:खाचे कढ अधिक तीव्र होताना आक्रंदन करीत म्हणतात, —

'ही का नुसती माझीच आई?
ही तर माझी, तुमची अवघ्या विश्वाची आई।।'[३] ('मी एकटा निघालो' — वाढा भाकर बाई, पृ. २६)

एका सामान्य स्त्रीकडे पाहत असताना विश्वाचे आर्त प्रकट करणाऱ्या माऊलीचे प्रतिबिंब त्यात उमटते. कवीच्या प्रतिभासंपन्न व्यक्तित्वाची ओळख देणारी ही बाब आहे.

गिरींची कविता ही अल्पाक्षरबव्हार्थक स्वरूपाची आहे. मूर्तिमंत प्रसंग उभे करण्याचे कौशल्य त्यांच्या कवितेमध्ये आहे. समाजात ढोंग पांघरून स्वत:चे स्वार्थ साध्य करणारी माणसे दिसली, की त्यांच्यातील कवी जागा होतो. आणि ती चीड व्यक्त करताना उद्‌गारतो,

'हे देवाघरूनच घेऊन येतात,
पोटात एक, ओठावर दुसरे,
चेहऱ्यावर तिसरेच'[४] ('मी एकटा निघालो' — मुत्सद्‌दी, पृ. ४४)

समाजातील मुखवटे घालून जगणारी माणसेही त्यांच्या चिंतेचा विषय होतो, त्याविषयी काहीशी तिरकस प्रतिक्रिया देताना ते यापुढच्या ओळींत म्हणतात , —

'मुत्सद्‌दीपणाचे मंदील जरतारी
शहाजोगपणाचे संगीन शिरपेच.'[५] ('मी एकटा निघालो' — मुत्सद्‌दी, पृ.४४)

खरा चेहरा लोकांपुढे येऊ न देता दिशाभूल करणाऱ्यांविषयी कवीला अत्यंत संताप येतो, खोटया माणसांपुढे खऱ्याची दुनिया दुबळी होऊन जाते आणि मुखवट्यामागील सत्य उशीरा कळते.

'दुखवट्यासही येथे मुखवटे, मरण हे फक्त 'सभेचा विषय'
मरणामागे घरी तशी दारी अशी हलकट हेलकावे लय'[६]
('मी एकटा निघालो' — किती, पृ. ४५)

अशा दुतोंडी माणसाविषयीचा संताप स्वाभाविकच ठरतो. स्वत:च्या स्वार्थापलीकडे न पाहणारी माणसे समाजात राहूनही समाजापासून विन्मुख राहतात, त्यांच्याविषयीही कवीची प्रतिक्रिया बोलकी आहे.

'नच वाचवे तयांना
गाथा कफल्लकाची
माझ्याही अक्षरांना
मरता कधी न आले'[७] ('मी एकटा निघालो' — कधी न आले, पृ. ४५)

दु:खाकडे, जखमेकडे पाहण्यासाठी वेद नाही सोसली पाहिजे तरच खपली उघडल्यानंतर रक्तस्त्राव होताना जखमेला किती वेदना होतात, हे लक्षात येते. त्यासाठी संवेदनशीलता अधिक महत्त्वाची ठरते. अर्थात ढोंगीपणाचे आयुष्य अल्प पण शब्दाचे सामर्थ्य अफाट असल्याची जाणीव कवीला आहे. आजच्या समाज वास्तवाचे यथार्थ चित्रण कवीने केले आहे. सत्तेचे गुलाम, प्रतिष्ठित श्रीमंत, गरिबांचे शोषण करूनच मोठे होतात. त्याविषयीची कडवट प्रतिक्रिया देताना कवी म्हणतात,

'तोऱ्यात चाललेला, तांडा प्रतिष्ठितांचा ...
गोळा करावयाला, तपशील फाटक्यांचा ...
तांडा तसा तपस्वी, उस्ताद उत्तरांचा
पुसताच प्रश्न करतो, वर्षाव आकड्यांचा '[८]

('मी एकटा निघालो' – तांडा, पृ. ८५)

सत्तापिपासू माणसांची सामान्यांविषयीची संवेदनाशून्य जाणीव येथे प्रखरतेने प्रकट होते.

उ.रा. गिरी यांनी राजकीय आणि सामाजिक व्यंगावरदेखील सडेतोड लेखन केले आहे. उपहास, उपरोध, विडंबन या आयुधांचा वापर करत कवीनी अनेक सामाजिक समस्येवर अचूक बोट ठेवले आहे.

समाजातील बेबंदशाही, स्वार्थी, हेकेखोर प्रवृत्ती आणि हेवेदाव्यांनी बरबटलेली समाजव्यवस्था पाहून कवी व्यथित होतात; पण तरीही माणसातील माणुसकीवर, मानवतेवर ते विश्वास बाळगून आहेत. अजूनही सारे काही सुरळीत होईल हा कवीचा आशावाद आहे.

'जरी सत्याचे गगन ग्रासिले,
अजस्त्र काळ्या क्रूर ढगांनी
वसुंधरेला स्वार तमाचे अन्
चिरडित चालले इमानी
अधुन मधुन तरी उजेड उधळित
वीजही वत्सल उजळत आहे ।
अजून माणूस 'माणूस' आहे'[९]

('मी एकटा निघालो' – अजून माणूस 'माणूस' आहे, पृ. ५५)

माणुसकीविषयी असलेली श्रद्धाच कवीला जगण्याचे बळ देते. ती त्याला पराभूत होऊ देत नाही. माणुसकी जगली तरच माणूसही जगेल, नाहीतर नि:ष्प्राण झालेल्या कलेवरासारखी अवस्था होईल. मानवता, माणुसकी हेच जीवनातील अंतिम सत्य आहे. कितीही विवंचना आल्या, विविध संकटे आली, तरी कवी आशावादी आहे. सृष्टीच्या नियमाप्रमाणे परिवर्तन घडेल, उद्याचा दिवस आजच्याहून उत्साहवर्धक व गतिमान असेल हा त्यांचा आशावाद बोलका आहे. प्रस्थापितांची निरंकुश सत्ता उलथून पडेल व शोषित–पीडितांच्या जीवनाला नवीन आकार मिळेल. जीर्ण झालेले मोडून पडते तिथेच नवनिर्माणाला प्रारंभ होतो, असे त्यांचे म्हणणे आहे.

'साऱ्याच चौकटी ह्या
आल्या तुटावयाला
सारेच फोड आता
आले फुटावयाला'[१०]

('मी एकटा निघालो' – चौकटी आहे, पृ. ८७)

मानवाच्या आयुष्यातील अंधार संपेल व नव्या युगाला प्रारंभ होईल, हा आशावादच त्यांच्या कवितेचा स्थायीभाव आहे.

'वस्तीत सज्जनांच्या
मी एकटा मवाली
पुसतात चंद्र–तारे
माझीच पण खुशाली''[११]

('मी एकटा निघालो' – माझ्या युगात येत्या, पृ.७३)

समाजपरिवर्तनाचा ध्यास घेणाऱ्याला लोक वेड्यात काढतात. हे वेडही पुढीलांसाठी मार्गदर्शक ठरते. उपहासात्मक, झपाटून टाकणारी अभिव्यक्ती, काव्यात्म शैली हा उ. रा. गिरींच्या कवितेचा वृत्तिविशेष आहे.

उ.रा. गिरी यांना उद्याच्या समाजाचे स्वप्नचित्र सुंदरतेने रेखाटता येत असले तरी गिरींची कविता केवळ सामाजिक वास्तवाचे भान ठेवणारी आहे, हे टीकाकारांचे मत गिरींच्या सामाजिक आशयाच्या कविता पाहिल्यानंतर किती विपर्यास करणारे आहे, हे लक्षात येते. गिरींची कविता जरी नावाजलेल्या कवींच्या रचनांइतकी प्रभावी आणि परिणामकारक नसली तरी समाजातील दु:ख, दारिद्रय आणि अनेक पडझडींनी अस्वस्थ होणारी आणि करणारी आहे.

## समारोप

गिरींच्या कवितेला समाज वास्तवाचे भान नाही, असा आरोप त्यांच्या कवितेवर केला जातो, तो अयोग्य आहे. त्यांची कविता अत्यंत प्रखरेतेने समाजस्थितीवर भाष्य करीत नसली, विद्रोहाची भाषा बोलत नसली तरी उद्याचा आशावाद व्यक्त करणारी आहे. किंबहुना, गिरींची कविता सामाजिक निरभ्रतेचे भान जपणारी आहे. गिरींच्या कवितेने समाजमनाचे विलोभनीय दर्शन घडविले आहे.यातून क्रांतीचा झेंडा किंवा निशाण फडकविण्याचा कवीचा इरादा नाही. गिरींनी कवितेचे माध्यम या व्यापारासाठी कधीही वापरले नाही. तांबे, बोरकर, पाडगावकर यांच्यांप्रमाणेच गिरीची कविता वेगळी आहे. यशस्वीता हे गिरींच्या कवितेचे ध्येय नसून, आर्त हृदय स्पंदनाची ती कविता आहे. म्हणूनच 'मी एकटा निघालो' या गिरींच्या पहिल्या कवितासंग्रहाला पुरस्कार लिहिताना शिरीष पै म्हणतात, '... प्रतिकूल परिस्थितीच्या 'पियानोवर' त्यांनी छेडलेली ही 'जीवनाची जयजयवंती' रसिकांच्या जिव्हारी जाऊन बसलेली ... निखळ भावकवितेबरोबरच सामाजिक जाणिवांचेही निरभ्र भान त्यांच्या कवितेला आहेच.'[१२] ही त्यांची प्रतिक्रिया बरेच काही सांगून जाते.

कवी उ.रा. गिरी यांच्या कवितेतील सामाजिक आशय त्यांच्या तांडा, यादी, चंद्रगीत, दुरावे, यादी, दोन कविता, आयुष्य, चौकटी, कधी न आले, माझी फुले विचारी अशा अनेक कवितांमधून अतिशय प्रभावीपणे अभिव्यक्त झाला आहे. त्यांच्या काव्यात सामाजिक जाणिवा ओढून ताणून आणाव्या लागत नाहीत, तर अंत:करणाच्या उमाळ्यातून त्या सहज उतरतात. म्हणूनच उ.रा. गिरी यांची सामाजिक कविता वास्तविकता आणि यथार्थता यांचे चित्रण करणारी आहे, यात शंका नाही.

## निष्कर्ष

१. उ.रा. गिरी यांची कविता वास्तवतेशी नाते जोडणारी असून ती समाजमन अभिव्यक्त करते.
२. त्यांची सामाजिक कविता संख्यात्मकदृष्टया अल्प असली तरी प्रभावी शैलीमुळे रसिकमान्य ठरली आहे.
३. गिरींच्या कवितेने विद्रोहाची, बंडखोरीची भाषा केली नसली तरी सात्त्विक संतापाने विरोधी सूर आळविला आहे.
४. प्रथितयश कवींच्या कवितेचे अनुकरण न करता स्वतंत्र बाण्याची कविता हे तिचे वैशिष्टय आहे.

## संदर्भ


१. तिडके, श्रीकांत, 'मराठी कवितेतील चंद्रकंस : उ.रा.गिरी', साहित्यजत्रा, रविवारची पुरवणी, दै. लोकमत, नागपूर, दि. ५/९/१९९७
२. मी एकटा निघालो, सर्वांगीण विवेचन व अभ्यास, वैभव प्रकाशन, महाल, नागपूर, १९९१, पृ. ४
३. गिरी, उ.रा., 'मी एकटा निघालो', अंशुल पब्लिकेशन्स्, नागपूर, द्वितीयावृत्ती, १९९०, पृ. २६
४. गिरी, उ.रा., 'मुत्सद्दी', मी एकटा निघालो, अंशुल पब्लिकेशन्स्, नागपूर, द्वितीयावृत्ती, १९९०, पृ. ४४
५. तत्रैव
६. गिरी, उ.रा., 'किती', मी एकटा निघालो, उनि.पृ. ४५
७. गिरी, उ.रा., 'कधी न आले', मी एकटा निघालो, उनि.पृ. ४५
८. गिरी, उ.रा., 'तांडा', मी एकटा निघालो, उनि.पृ. ८५
९. गिरी, उ.रा., 'अजून माणूस माणूस आहे', मी एकटा निघालो, उनि.पृ. ५५
१०. गिरी, उ.रा., 'चौकटी', मी एकटा निघालो, उनि.पृ. ८७
११. गिरी, उ.रा., 'माझ्या युगात येत्या', मी एकटा निघालो, उनि.पृ. ७३
१२. पै, शिरीष, मलपृष्ठावरील पुरस्कार, 'मी एकटा निघालो', उ.रा.गिरी, अंशुल पब्लिकेशन्स्, नागपूर, द्वितीयावृत्ती, १९९०.


❖❖❖

# भारतातील पर्यावरण बदलाचा परिणाम व उपाययोजना

प्रा. डॉ. माधुरी पं. राखुंडे
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ

## सारांश—

एखाद्या ठराविक ठिकाणी अनेक वर्षापासून असलेली ऊन, वारा, पाऊस, थंडी यांची स्थिती म्हणजे हवामान. आणि या सरासरी हवामानातला बदल म्हणजे हवामान बदल होय.माणसाच्या वेगवेगळया कृत्यांमुळे पृथ्वीचं तापमान वाढत आहे आणि या हवामान बदलामुळे मानवी आयुष्याला धोके निर्माण होत आहेत. अर्थातच या विषयी पाऊले उचलली गेली नाही तर निसर्गाला पर्यायाने मानवाला धोका निर्माण होईल यात शंका नाही. पक्षी आणि प्राण्यांच्या प्रजाती नष्ट होतील, समुद्राची पातळी वाढेल आणि भयानक दुष्काळ निर्माण होईल. हवामानात होणाऱ्या टोकाच्या बदलांचे परिणाम एवढे भयावह आहेत की अनेकांचे आयुष्य आणि रोजीरोटी धोक्यात आली आहे. अशा या महत्वाच्या प्रश्नांवर वैयक्तिक व शासन स्तरावर विचार करणे आज आवश्यक झाले आहे.

अलीकडील काळात वाढती लोकसंख्या, वाढते औद्योगिकरण, प्रचंड जंगलतोड या सारख्याा मानवी कारणांमुळे वाताराणातील धुलीकणांचे प्रमाण अतिजास्त वाढले आहे. त्यांत उद्योगधंद्यातील विषारी कणांचे प्रमाण देखील लक्षणीय वाढले आहे. वातावरणातील ओझोन वायुचा थर पातळ होत आहे. जागतिक तापमान आता सर्वोच्च म्हणजे १.५ डिग्री सेल्सिअस पर्यंत पोहचत असून आताच नैसर्गिक आपत्तींना सुरूवात झाली आहे. पृथ्वीचे उष्णतामान झपाट्याने वाढत आहे. असेच तापमान वाढत राहिले तर जगाला विशेषत: भारताला ह्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील असा इशारा हवामान बदलाचा अभ्यास करणाऱ्या आयपीपीसी (International panel on climate change) या संस्थेने दिला आहे.

बीजशब्द — हवामान बदल, पर्यावरण, तापमान, प्रदूषण, उत्पादन

## प्रस्तावना—

हवामान हा पर्यावरणाचा फार मोठा भौतिक घटक आहे व त्याचा परिणाम मनुष्यावर झाल्यावाचून राहात नाही. उलट असे म्हणता येईल की, मानवी जीवनावर अतिशय मोठया प्रमाणावर परिणाम करणारा पर्यावरणाचा घटक हवामानच आहे. मानवाला हवामानाशी सर्व ठिकाणी सतत समायोजन करावे लागते. कारण हवामानाच्या घटकांचे भूपृष्ठावरील वितरण अत्यंत असमान आहे व काळानुरूप हवामानात सतत बदल होत असतो. हवामान मनुष्यावर व त्याच्या जीवनावर परिणाम करते याबद्दल दुमत नाही परंतु अलिकडे मनुष्य देखील हवामानावर परिणाम करू लागला आहे. अर्थात, त्याचे दुष्परिणाम मनुष्याला स्वत:लाच भोगावे लागतील हे निर्विवाद आहे.

भारत हा कृषिप्रधान देश आहे. आणि कृषिवर आधारित उद्योगांवर जास्तीत जास्त लोकसंख्या अवलंबून असल्याने हवामानाचा परिणाम कृषि क्षेत्रावर होतो काय?, पर्यायाने लोकांच्या आरोग्यावर काय परिणाम होतो? हे समजून घेणे आवश्यक आहे. कारण हवामान आणि आर्थिक विकास हया नाण्याच्या दोन बाजू आहेत असे म्हटल्यास वावगे होणार नाही. अर्थात भारताच्या हवामानाचा आर्थिक विकासावर काय परिणाम होतो याचा अभ्यास करने आवश्यक  झाले आहे.

## गृहितकृत्ये—

१. बदलत्या हवामानामुळे तापमानात वाढ होत आहे
२. बदलत्या हवामानामुळे कृषि क्षेत्रावर विपरीत परिणाम पडत आहेत.
३. बदलत्या हवामानामुळे लोकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे.
४. बदलत्या हवामानामुळे शेती तसेच औद्योगिक उत्पादनात घट झाली आहे.

## संशोधन पध्दती —

प्रस्तुत शोध प्रबंध कार्यासाठी प्रामुख्याने द्वितियक सामुग्रीसंग्रहन पध्दतीचा वापर केला आहे. यामध्ये विषयावर लिहलेले ग्रंथ, दैनंदिनी तसेच वेब पेज चा वापर केला आहे.

## विषय विवेचन—

### भारतातील हवामानातील बदल —

पृथ्वीवर लाखो वर्षापासून वातावरण, हवामान आणि पर्यावरण ह्यांचा निसर्ग नियमाप्रमाणे समतोल राखला जात होता. कारण सर्व प्रदूषके शोषून घेण्याची क्षमता जंगलात होती. मानव आणि सजीवांचे पोषण करण्याची क्षमता वनांत होती. मानव सजीवांचे संरक्षण करण्याची ताकत पर्यावरणात होती. परंतु मानवाच्या वैज्ञानिक व यांत्रिक प्रगतीमुळे जीवनाचा आधार असलेली वने तोडायला सुरूवात झाली. औद्योगिक क्रांतीच्या नावाखाली प्रदूषणात वाढ, लोकसंख्येत वाढ, शहरीकरणात वाढ झाली. अर्थात ज्या आधारावर सृष्टीची रचना झाली तो आधारच हळूहळू काढून टाकायला सुरूवात झाली. थर्मल पॉवरस्टेशन, कागद उद्योग, सिमेंट उद्योग अशा विविध कारखान्यांमुळे प्रदूषण वाढत गेले. त्यामुळे ओझोनचा थर विरळ होणे, समुद्राची पातळी वाढणे, तापमानात वाढ आणि नैसर्गिक आपत्ती अशी मालिकाच तयार झाली. २००१ पासून भारतात अत्याधिक हवामान बदलाच्या घटना घडू लागल्या आहेत.

### तापमानात वाढ —

हवामान बदलाचे परिणामांचा विचार केल्यास केवळ वस्तूंच्या किंमती वाढतील एवढंच नाही तर पूर आणि वादळ येण्याची शक्यता ज्या भागात जास्त आहे अशा भागात राहणाऱ्या लोकांच्या घराला धोका जास्त असून त्यांच्या व्यवसाय व नोकऱ्या पण जावू शकतात. बीबीसीच्या एका अभ्यासानुसार, १९८० पासून पारा ५० अंश सेल्सिअसच्या पुढे अशा दिवसांची संख्या जवळजवळ दुप्पट झाली आहे. तर युनायटेड नेशन्स इंटर—गव्हर्नमेंटल पॅनल ऑन क्लायमेट चेंजच्या (आयपीपीसी) नुकत्याच आलेल्या अहवालानुसार हरितगृह वायुंचे उत्सर्जन कमी केल्या नंतरही २०४० पर्यंत पृथ्वीचे तापमान १.५ अंश सेल्सिअसपर्यंत वाढण्याची शक्यता आहे.

### कृषि क्षेत्रावर परिणाम —

हवामान बदलाचा सर्वात मोठा परिणाम कृषि क्षेत्रावर होत आहे. देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नामध्ये सेवा क्षेत्राचा वाटा अंदाजे ५७.८०टक्के औद्योगिक क्षेत्राचा वाटा २८.३० टक्के आहे. कृषि क्षेत्राचा वाटा १६ टक्के असला, तरी जवळपास ५८ टक्के लोकांना या क्षेत्रातून रोजगार मिळतो. हे अन्न सुरक्षिततेच्या दृष्टिने महत्वाचे आहे. पावसाळयात अतिवृष्टी आणि महापूर, किंवा दुष्काळ, हिवाळयात ढगाळ हवामान आणि अवकाळी पाऊस, गारपिटीमुळे त्या हंगामातील पिके आणि पिक पध्दतीला धोका निर्माण झाला आहे. हवामान बदलाचा भारतीय कृषी क्षेत्रावर होणारा प्रतिकुल परिणाम हा श्शेतकरी, शेतीची आर्थिक स्थिती, श्शेतीतील रोजगार, शेतमालाच्या किंमती आणि जागतिक कृषी व्यापाराचे स्वरूप यावर दिसून येते.

- कमी दिवसात पावसाचे वाढणारे तीव्रतेचे परिणाम कोरडवाहू क्षेत्रामध्ये जास्त जाणवत आहे.. पिकांना आवश्यक असणारा कार्बनडायऑक्साइड हवेत वाढल्यामुळे काही ठिकाणी काही प्रमाणात कमी किंवा पिकांचे उत्पादन वाढले, परंतु तापमान वाढणे, किडी रोगांचा प्रादुर्भाव वाढ होणे, पावसाचे प्रमाण कमी किंवा अनियमित होणे, जमीनीची धूप झाल्यामुळे शेतीची उत्पादकता कमी होणे असे परिणाम पाहायला मिळत आहेत. तापमान वाढीमुळे संभाव्य महापूर आणि दुष्काळामुळे भारतामधील तृणधान्य उत्पादन १५ टक्कयांनी कमी झाले आहे.
- विषुववृत्तीय पिके विशेषत: गहू, सोयाबिन, बीट, टोमॅटो, तंबाखू, लिंबूवर्गीय आणि इतर फळपिकांच्या वाढीवर प्रतिकुल परिणाम होत आहे.
- थंड प्रदेशातील पिकांना फळधारणेसाठी ठराविक कालावधीचे थंड हवामान लागते. तो कालावधी कमी झाल्यामुळे एकूण उत्पादनावर परिणाम होऊन सफरचंदे, चेरी इ. फळे तडकण्याचा संभव निर्माण झाला आहे.

### आरोग्यावर होणारा परिणाम—

मनुष्याच्या आरोग्याचाही विचार फार महत्वाचा आहे. मनुष्याचे आरोग्य काही प्रमाणात हवामानावरही अवलंबून असते. उष्ण व दमट हवामानात अनेक रोगांचा प्रादुर्भाव होतो. खूप पावसाच्या प्रदेशात अनेक पानथळी निर्माण होतात. व तेथे डास, माशा व रोगजंतू पैदा होतात. त्यामुळे मलेरिया, कॉलरा, हत्तीपाय असे अनेक रोग होतात. थंड हवामानही प्रकृतीला घातक असते. संधीवात, आर्थरायटिस, अस्थमा यासारखे रोग थंड व दमट हवामानात आढळतात. साधारण कोरडे हवामान व भरपूर सुर्यप्रकाश रोग बरे करण्यास मदत करतो. पण भाजणारा

सूर्यप्रकाशही वाईट असतो. त्यात अतिनील किरणे असण्याचा संभव असतो. व त्यामुळे अनेक व्याधी निर्माण होतात.

अशा प्रकारे हवामान मनुष्याच्या आरोग्यावर परिणाम करते. तसेच वायू प्रदूषणाचा मानवी आरोग्यावर वाईट परिणाम होत आहे. जागतिक आरोग्य संघटनेनुसार, वायु प्रदूषणामुळे दरवर्षी सत्तर लाख लोकांचा मृत्यू होतो. हवामान बदलामुळे संसर्गजन्य रोग पसरण्याचा धोका वाढू शकतो. नुकतेच आपण कोविड–१९ चा जरी विचार केला तर आपल्याला असे लक्षात येईल की आरोग्याच्या बाबतीत आपण किती सफर झालो आणि होत आहोत. संपूर्ण अर्थव्यवस्थेला हलवून टाकणारी घटना आज जगाने अनुभवली आहे. अर्थात हवामान बदल हा जागतिक अर्थव्यवस्थेसाठी सर्वात मोठा दीर्घकालीन धोका आहे. या मानवनिर्मित आपत्तीमध्ये हवामानाच्या परिणामामुळे कृषी उत्पन्नात घट, कामगारांची उत्पादन क्षमता कमी होणे, अन्नधान्याच्या किंमतीत वाढ, वाढत्या आजारामुळे आर्थिक नुकसान दिसून येत आहे.

## उपाययोजना —

हवामान बदला संबंधित समस्यांवर ठोस उपाय शोधण्याची गरज निर्माण झाली आहे. यासाठी सर्व देशांचा सहभाग असणे आवश्यक आहे. याच अनुशंगाने विविध देशांच्या सरकारांनी, खाजगी कंपन्यांनी आणि स्थानिक प्रशासनाने हवामान बदलांवर त्वरीत पाऊले उचलावीत असे आवाहन, संयुक्त राष्ट्राचे सेक्रटरी ॲन्टोनिओ गुटेरेस यांनी ३ मार्च रोजी ट्विटर वरून केले आहे. त्या अनुशंगाने असे आवाहन करयात आले की त्या त्या प्रदेशातील कोळसा उत्पादन प्रकल्प रद्द करावेत एवढेच नाही तर अशा प्रकल्पांसाठी देण्यात येणारे अर्थसहाय्य बंद करावेत व हा पैसा अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतांच्या विकासासाठी वापरण्यात यावा. आणि अपारंपारिक ऊर्जास्त्रोतांवर अवलंबित्व वाढावे यासाठी प्रयत्न करावेत. संयुक्त राष्ट्राच्या उच्च अधिकाऱ्याकडून अशा प्रकारचे आवाहन होणे ही बाब असामान्य आहे. परंतु खोलवर विचार केल्यास हे आवाहन केवळ पोकळ आहे असे दिसून येते कारण याची अंमलबजावणी होत आहे की नाही हे पाहण्यासाठी कोणतीही कार्यशिल यंत्रणा दिसून येत नाही. भारत हा विकसनशिल देश आहे. याची तुलना विकसित देशाशी होऊ शकत नाही. यासाठी गरीब जनतेला वेठीस धरणे योग्य नाही. पण एका दृष्टिने ही बाब अतिशय सोयीस्कर आहे त्यामुळे त्याचे उमटणारे पडसाद मोठे आहे.

मागील दशक हे सर्वाधिक उष्ण दशक ठरले आहे. आणि त्याचे परिणाम आपण पाहत आहोतच. मानवाने निसर्गावर कुरघोडी केली आहे ही काही .आजची बाब नाही. अनेक वर्षांपासून जंगलतोड होत आहे. हिमनदया वितळून हिमनगाचा भाग वेगळा होत आहे. यावरून भविष्यात पुढे काय घडणार याची कल्पना करता येते. याठिकाणी प्रत्येक व्यक्तिची जबाबदारी आहे की पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही याची काळजी घेणे, जंगलतोड होणार नाही याची काळजी घेणे व जास्त कार्बनडाय आक्साईड सोडणारी झाडे न लावता आक्सिजन सोडणाऱ्या झाडांचे वृक्षारोपण करणे, त्यांचे संवर्धन करणे आवश्यक आहे. विकासाच्या नावाखाली आज वृक्षतोड फार मोठया प्रमाणात झाली आहे. ही हानी भरून न निघणारी आहे.

भारतात पुढील दशकांमध्ये या बदललेल्या हवामानाचा फार मोठा फटका बसणार आहे. सध्या त्याचे सर्वत्र परिणाम दिसत आहेतच. मोठमोठे चक्रिवादळ, महापूर, याची साक्ष देत आहे. अशा या कठिण काळात भारतासमोर तीन महत्वाच्या संधी उपलब्ध आहेत. उपाययोना २. राजकारण ३. व्यवस्थेची पुनर्रचना याद्वारे वरील प्रश्नावर जगाातील सर्वात प्रभावी आवाज होण्याची संधी आहे. आयईएच्या (इंडिया एनर्जी आउटलूक) २०२१ अहवालात असे म्हटले गेले आहे की २०४० पर्यंत भारताच्या कार्बन उत्सर्जनात ५० टक्कयांनी वाढ होणार आहे. तसेच येत्या काही वर्षात जगात कार्बन उत्सर्जनात चीननंतर भारताचा दूसरा क्रमांक लागेल. जर असे घडले नाही तर भारतासाठी आणि पर्यायाने जगासाठी महत्वाची संधी उपलब्ध होऊ शकेल. योग्य प्रकारची गुंतवणूक, तंत्रज्ञान आणि जगातील भागीदारी याद्वारे भविष्यातील कार्बन उत्सर्जन कमी करण्यामध्ये भारताला मदत होईल. ज्याप्रमाणे मार्शल प्लाननुसार दुसऱ्या महायुध्दानंतर युरोपात विशेष करून जर्मनीमध्ये पुनर्निमाणसाठी कोटयावधी रू. गुंतवले गेले. त्याप्रमाणे नव्या युगाच्या हवामानविषयक मार्शल प्लाननुसार भारतावर भर दिला जाऊ शकतो. यासाठी भारताने प्रयत्न केले पाहिजे. जगातील हवामान बदल रोखण्याची सर्वात मोठी संधी आणि हरित गुंतवणूकीसाठी महत्वाचे ठिकाण म्हणून भारताचा उदय व्हायला पाहिजे. नैसर्गिक नियमाचा अभ्यास करून भारताने आणि पर्यायाने जगाने हवामान बदलाचा उपाय करायला पाहिजे. भविष्यात हवामान बदलावरील कृतींसाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे. यातून निर्माण होणाऱ्या सेवा, तंत्रज्ञान आणि पायाभूत सोयीसुविधा यांचा लाभ इतर विकसनशिल राष्ट्रांनाही होणार आहे.

२०२२ मध्ये भारत ७५ वा स्वातंत्र्यदिन साजरा करणार आहे आणि २०२३ मध्ये जी २० चे आयोजन करणार आहे. जागतिक स्तरावर भारताची आता जी ओळख आहे त्यात सकारात्मक बदल करण्याची ही एक सुवर्णसंधी आहे. ब्रिटीशांच्या अधिपत्याखाली भारत १९४७ मध्ये एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून उदयाला आला. धर्माचे गारूड असलेला देश ते आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त टेक्नालॉजी हब हा भारताचा प्रवास अनन्यसाधारण आहे. ह्या दशकामध्ये सर्वप्रथम जगातील पहिली ५ ट्रिलीयन अमेरिकन डॉलर अर्थव्यवस्था आणि नंतर हरित किमान उत्सर्जन असलेली अर्थव्यवस्था होण्याची संधी भारतापूढे आहे.

## निष्कर्ष

१. बदलत्या हवामानामुळे दिवसेंदिवस तापमानात वाढ होत आहे.

२. बदलत्या हवामानामुळे कृषि क्षेत्रावर विपरीत परिणाम पडत आहेत. कारण या बदलत्या हवामानामुळे पावसाचे प्रमाण, थंडीचे आणि उन्हाचे प्रमाण प्रत्येक ऋतूत ज्याप्रमाणात असायला पाहिजे तो नसल्याने पिकांवर त्यांचा प्रतिकुल परिणाम होत आहे.

३. तसेच लोकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. तिनही ऋतूत निर्माण झालेला असमतोल त्याला कारण आहे. तसा हवामानाचा आणि आरोग्याचा फार जवळचा संबंध असल्याचे लोकांचे आयुर्मान कमी झाले आहे.

४. भारत हा देश कृषिप्रधान आहे. जास्तीत जास्त उद्योग कृषिवर आधारीत असल्याने उद्योगाला लागणारा कच्चा मालाची कमतरता असे प्रश्न निर्माण होत आहे. त्यामुळे बदलत्या हवामानामुळे  उद्योगावर विपरीत परिणाम होत आहे.

५. बदलत्या हवामानामुळे शेती तसेच औद्योगिक उत्पादनात घट झाली आहे.

## शिफारशी—

- नवा हरित करार जागतिक हवा — जागतिक कार्बोत्सर्जन रोखण्यासाठी  विकसित राष्ट्रांनी स्थानिक हरित करारांपलिकडे जाऊन, दक्षिण गोलार्धाला पर्यावरणपूरक होण्यासाठी मदत केली पाहिजे.
- भारतातील कोळसा मुक्त करण्याच्या दृष्टिने वाटचाल करण्यासाठी अधिक विदेशी भांडवलाचा प्रवाह हरित क्षेत्राकडे वळविण्याची आवश्यकता आहे.
- कोविड—१९ शी लढण्यासाठी जगभरात १७ ट्रिलियन डॉलर्स उभे राहतात तर हवामान बदलाशी लढण्यासाठी वित्तपुरवठा निर्माण करणे सहज शक्य आहे. त्या अनुशंगाने वित्ताचा पुरवठा होणे आवश्यक आहे.

## संदर्भ—

१) जोशी, डॉ.स्मिता शशांक, हवामानशास्त्र, श्री साईनाथ प्रकाशन, पहिली आवृत्ती—२०१८ पृ. १२

२) पंडित—बापट, डॉ. सुरेखा, प्राकृतिक भूगोल—हवामान शास्त्र आणि सागरविज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन, प्रथमावृत्ती ऑगष्ट २००५ पृ २२९,२३१

३) हवामान बदलाचे परिणाम—विकिपीडिया https//www.deshdoot.com

❖❖❖

# यवतमाळ जिल्ह्यातील ग्रामीण लोकसंख्येचे केंद्रीकरण – भौगोलिक अध्ययन

डॉ. राजेश पांडुरंग मेश्राम
सहयोगी प्राध्यापक व भूगोल विभाग प्रमुख
प्रा. राजाभाऊ देशमुख कला महाविद्यालय,
नांदगाव खंडेश्वर, जिल्हा – अमरावती
मोबाईल क्रमांक – **9922856730**, इमेल - rajeshmeshram2@gmail.com

## सारांश

शेती व्यवसाय हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे आणि हा व्यवसाय प्रामुख्याने ग्रामीण प्रदेशातच केला जातो. भारतातील बहुतांश लोकसंख्या ही ग्रामीण भागात राहते आणि शेती व त्याच्याशी निगडीत व्यवसायात ते गुंतलेले आढळतात. त्यामुळे ग्रामीण लोकसंख्येचे भारतीय अर्थव्यवस्थेत महत्वाचे योगदान आहे. ग्रामीण प्रदेशात लोकसंख्येचे केंद्रीकरण अधिक असेल तर अशा प्रदेशात ग्रामीण विकास हा अधिक आढळतो. तर केंद्रीकरण कमी असेल तर अशा प्रदेशात विकासाच्या संधी कमी उपलब्ध असतात.

प्रस्तुत शोध निबंधात महाराष्ट्र राज्यातील यवतमाळ जिल्ह्यातील ग्रामीण लोकसंख्येच्या केंद्रीकरणाचे अध्ययन करण्यात आलेले आहे.

**बीजसंज्ञा**

ग्रामीण लोकसंख्या, स्थान निर्देशांक, केंद्रीकरण, ग्रामीण-क्षेत्रफळ

## प्रस्तावना

ग्रामीण लोकसंख्येचे केंद्रीकरण दर्शविण्याकरीता स्थान निर्देशांक काढला जातो. याकरीता अभ्यास प्रदेशातील दोन दशकातील लोकसंख्या वाढ आणि ग्रामीण क्षेत्रफळाचा आधार घेण्यात येतो. हा निर्देशांक ज्या प्रदेशात अधिक असतो, त्या प्रदेशात ग्रामीण लोकसंख्येचे केंद्रीकरण अधिक असते. तर निर्देशांक कमी असेल तर हे केंद्रीकरण कमी झालेले असते. ज्या ग्रामीण प्रदेशात पायाभूत सोयी सुविधांचा विकास झालेला असतो अशा प्रदेशात हे केंद्रीकरण अधिक आढळून येते.

## संशोधनाची उद्दिष्ट्ये

प्रस्तुत अभ्यास हा पुढील उद्दिष्ट्ये समोर ठेऊन करण्यात आलेले आहे,

१) यवतमाळ जिल्ह्यातील ग्रामीण लोकसंख्येचे वितरण अभ्यासणे

२) यवतमाळ जिल्ह्यातील स्थान निर्देशांकाद्वारे ग्रामीण लोकसंख्येच्या केंद्रीकरणाचे तालुकानिहाय तुलनात्मक अध्ययन करणे

## माहिती स्त्रोत व अभ्यास पद्धती

प्रस्तुत कार्य हे पूर्णतः द्वितीय स्त्रोताद्वारे प्राप्त आकडेवारीवर आधारित आहे. ही माहिती यवतमाळ जिल्हा जनगणना अहवाल २००१ व २०११, तसेच जिल्हा सामाजिक-आर्थिक समालोचन २०२१ यातून संकलित केलेली आहे.

ग्रामीण प्रदेशातील स्थान निर्देशांक काढण्यासाठी सी.डी देशपांडे. आणि सपाटे (१९५२) यांनी सुचविलेल्या सूत्राचा उपयोग केलेला आहे.

$$LC = Pi \div Ai$$

LC - केंद्रीकरण निर्देशांक (स्थान निर्देशांक), Pi - दोन दशकांदरम्यान वाढलेली ग्रामीण लोकसंख्या, Ai - ग्रामीण क्षेत्रफळ

संकलित केलेली आणि सूत्राद्वारे प्राप्त झालेल्या आकडेवारीचे प्रदर्शन सारणी मध्ये करून ग्रामीण लोकसंख्येचे केंद्रीकरणाचे वितरण नकाशामध्ये दर्शविलेले आहे. तर जिल्ह्यातील दोन दशका दरम्यान वाढलेली लोकसंख्या आणि ग्रामीण क्षेत्रफळ आलेखाच्या सहाय्याने दर्शविलेले आहे.

## अभ्यास क्षेत्र

यवतमाळ जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार हा १९° २६' उत्तर ते २०° ४२' उत्तर अक्षांश तर रेखावृत्तीय विस्तार हा ७७° १८' पूर्व ते ७९° ९'पूर्व रेखांश आहे. जिल्ह्याचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ १३५८४ चौ.किमी. असून जिल्हा विदर्भ प्रदेशाच्या दक्षिणेकडे स्थित आहे. सध्यास्थितीत यवतमाळ जिल्ह्यामध्ये एकूण १६ तालुके असून २०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या २७७२३४८ आहे.

जिल्ह्याच्या उत्तरेस अमरावती व वर्धा जिल्हे असून, पश्चिमेकडे वाशीम व हिंगोली जिल्हे आहेत. तर नांदेड जिल्हा, चंद्रपूर जिल्हा आणि तेलंगाना राज्य पूर्वेकडे आहे.

## ग्रामीण लोकसंख्येचे वितरण (२००१ व २०११)

यवतमाळ जिल्ह्यात २००१ या वर्षी एकूण ग्रामीण लोकसंख्या ही २००१०६० एवढी होती तर २०११ मध्ये त्यात वाढ होऊन ती २१७४१९५ एवढी झालेली आढळते. तालुकानिहाय मात्र या वितरणात तफावत असून काही तालुक्यात २००१ ते २०११ याकाळात ग्रामीण लोकसंख्येचे वितरण कमी झालेले आहे.

वर्ष २००१ च्या जनगणनेनुसार ग्रामीण लोकसंख्येचे सर्वाधिक वितरण हे  पुसद (१०.९१%) असून या तालुक्यात २ लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या ही ग्रामीण प्रदेशातील आहे. इतर सर्व तालुक्यात ग्रामीण लोकसंख्येचे वितरण १०% पेक्षा कमी असून ग्रामीण प्रदेशातील लोकसंख्या २ लाखांपेक्षा कमी असल्याचे आढळते. मारेगाव (३.७४%) व झरीजामणी (३.६१%)  बाभूळगाव (४.४६%), कळंब (४.७९%०, दिग्रस (४.७८%) या तालुक्यात हे वितरण सर्वात कमी असून ग्रामीण लोकसंख्या ही एक लाखांपेक्षा कमी आहे. उर्वरित तालुक्यातील ग्रामीण लोकसंख्या १ ते २ लाखांदरम्यान आढळते.

वर्ष २०११ मध्ये एकूण ग्रामीण लोकसंख्येत वाढ झालेली आढळते, परंतु काही तालुक्यात मात्र ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण घटलेले आढळते. याकाळात देखील पुसद (११.८८%) तालुक्यात ग्रामीण लोकसंख्येचे वितरण सर्वाधिक असून अडीच लाखाहून अधिक लोकसंख्या ही ग्रामीण आहे. मारेगाव (३.६२%), झरीजामणी (३.६९%) या तालुक्यात हे वितरण सर्वात कमी असून एक लाखाहून कमी लोकसंख्या ही ग्रामीण आहे.

नेर (४.१८%), बाभूळगाव (४.०६%) आणि यवतमाळ (६.६९%) या तालुक्यात ग्रामीण लोकसंख्या २०११ मध्ये कमी झालेले आढळते. नेर शहर हे २००१ मध्ये ग्रामीण मध्ये होते तर २०११ मध्ये ते नागरी भागात आल्याने ग्रामीण लोकसंख्या घटलेली आहे. तर यवतमाळ मध्ये नागरी भागात होणाऱ्या स्थलांतरामुळे ग्रामीण लोकसंख्या कमी झालेली आहे. बाभूळगाव तालुक्यात जलप्रकल्पामुळे बरेच गावे स्थलांतरित करण्यात आलेली आहेत. नेर व बाभूळगाव मध्ये ग्रामीण लोकसंख्या ही एक लाखापेक्षा कमी

आहे तर यवतमाळ व उर्वरित तालुक्यातील ग्रामीण लोकसंख्या एक ते दोन लाखांदरम्यान असल्याचे आढळते.

## ग्रामीण लोकसंख्येचे केंद्रीकरण (स्थान निर्देशांक)

यवतमाळ जिल्ह्यातील २००१ व २०११ ची ग्रामीण लोकसंख्या, त्यातील वाढ, ग्रामीण क्षेत्रफळ व स्थान निर्देशांक तालुकानिहाय दर्शविण्यात आलेला आहे.

यवतमाळ जिल्ह्यात २००१ ते २०११ याकाळात सुमारे १७३१३५ एवढी एकूण ग्रामीण लोकसंख्या वाढलेली आहे. परंतु नेर मध्ये १९८३२, बाभूळगाव मध्ये ९८० आणि यवतमाळ मध्ये ११७२२ एवढी ग्रामीण लोकसंख्या कमी झालेली आढळते. नेर तालुक्यात कमी होण्याचे प्रमाण सर्वाधिक आहे.

वर्ष २००१ ते २०११ दरम्यान पुसद या तालुक्यात सर्वाधिक म्हणजेच ३९८९९ एवढी ग्रामीण लोकसंख्या वाढलेली आहे. तर मारेगाव तालुक्यात ही वाढ सर्वात कमी म्हणजे ३८३४ एवढी आढळते. दारव्हा (६८९५), राळेगाव (७३७१), मारेगाव (३८३४), व झरीजामणी (७९०८) या तालुक्यात ही वाढ दहा हजारापेक्षा कमी आहे तर इतर तालुक्यात ही वाढ दहा हजारापेक्षा अधिक असल्याचे आढळते.

स्थान निर्देशांकाला एकूण ५ गटात विभाजित केलेले आहे, ज्या तालुक्यांचा स्थान निर्देशांक हा ० पेक्षा कमी म्हणजेच ऋणात्मक आलेला आहे अशा तालुक्यात ग्रामीण लोकसंख्येचे अती निम्न केंद्रीकरण, ० ते १० निर्देशांक म्हणजे निम्न केंद्रीकरण, १० ते २० म्हणजे मध्यम, २०ते ३० म्हणजे उच्च आणि ३० पेक्षा अधिक निर्देशांक म्हणजे अती उच्च केंद्रीकरण, असे विश्लेषण करण्यात आलेले आहे.

संपूर्ण जिल्ह्याचा सरासरी निर्देशांक हा ११.४९ येतो. म्हणजेच यवतमाळ जिल्ह्यात ग्रामीण लोकसंख्येचे सरासरी केंद्रीकरण हे मध्यम स्वरुपात झालेले आहे.

**सारणी क्रमांक १**

**यवतमाळ जिल्हा - ग्रामीण लोकसंख्येचे केंद्रीकरण (स्थान निर्देशांक)**

| | | | Pi | Ai | LC |
|---|---|---|---|---|---|
| **तालुके** | **ग्रामीण लोकसंख्या २००१** | **ग्रामीण लोकसंख्या २०११** | **दोन दशकांदरम्यान वाढलेली ग्रामीण लोकसंख्या** | **ग्रामीण क्षेत्रफळ (चौकिमी)** | **स्थान निर्देशांक** |
| नेर | 110762 | 90930 | -19832 | 791 | -25.07 |
| बाभूळगाव | 89153 | 88173 | -980 | 552 | --1.78 |
| कळंब | 95830 | 103024 | 7194 | 772 | 9.32 |
| यवतमाळ | 157069 | 145347 | -11722 | 1016 | --11.54 |
| दारव्हा | 150114 | 157009 | 6895 | 935 | 7.37 |
| दिग्रस | 95750 | 109355 | 13605 | 1116 | 12.19 |
| पुसद | 218292 | 258191 | 39899 | 1178 | 33.87 |
| उमरखेड | 184643 | 211899 | 27256 | 1174 | 23.22 |
| महागाव | 158230 | 190252 | 32022 | 968 | 33.08 |
| आर्णी | 139861 | 161833 | 21972 | 844 | 26.03 |
| घाटंजी | 105867 | 117294 | 11427 | 1174 | 9.73 |
| केळापूर | 114335 | 125689 | 11354 | 857 | 13.25 |
| राळेगाव | 104832 | 112203 | 7371 | 764 | 9.65 |
| मारेगाव | 74879 | 78713 | 3834 | 1177 | 3.26 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| झरीजामणी | 72239 | 80147 | 7908 | 713 | 11.09 |
| वणी | 129204 | 144136 | 14932 | 1042 | 14.33 |
| **एकूण जिल्हा** | 2001060 | 2174195 | 173135 | 15073 | 11.49 |

स्त्रोत - संशोधक



(आलेख क्रमांक १)

**ग्रामीण लोकसंख्येचे अती निम्न केंद्रीकरण**

जिल्हातील नेर (-२५.०७), यवतमाळ (-११.५४) आणि बाभूळगाव (-१.७८) या तालुक्यात ग्रामीण लोकसंख्येचे केंद्रीकरण अतिशय कमी झालेले आहे. या तालुक्यात २००१ ते २०११ दरम्यान ग्रामीण लोकसंख्या कमी झाल्याने हा निर्देशांक ऋणात्मक आढळतो. ह्या तालुक्यातील ग्रामीण भागात असणाऱ्या पायाभूत सुविधाची कमतरता आणि रोजगाराचा अभाव हे यावरून स्पष्ट होते (नकाशा क्रमांक १).



नकाशा क्रमांक १

## ग्रामीण लोकसंख्येचे निम्न केंद्रीकरण

अभ्यास प्रदेशातील नेर (३.२६), दारव्हा (७.३७), कळंब (९.३२), राळेगाव ९९.६५) आणि घाटंजी (९.७३) या तालुक्यातील निर्देशांक हा ० ते १० दरम्यान आहे. या तालुक्यात इतर तालुक्याच्या तुलनेत ग्रामीण लोकसंख्येचे केंद्रीकरण हे कमी झालेले दिसते. कळंब, मारेगाव आणि राळेगाव हे पूर्णतः ग्रामीण लोकसंख्या असलेले तालुके आहेत. २००१ ते २०११ याकाळात ग्रामीण लोकसंख्या वाढलेली आहे. परंतु ग्रामीण प्रदेशात झालेल्या लोकसंख्येतील वाढ आणि ग्रामीण क्षेत्रफळ यांचे गुणोत्तर हे कमी आहे. तसेच ग्रामीण प्रदेशातील विकास होणे आवश्यक असल्याचे यावरून लक्षात येते.

## ग्रामीण लोकसंख्येचे मध्यम केंद्रीकरण

झरीजामणी (११.०९), दिग्रस (१२.१९), केळापूर (१३.२५) आणि वणी (१४.३३) या तालुक्यात ग्रामीण लोकसंख्येचे केद्रीकरण मध्यम स्वरूपातील आढळते. या तालुक्यातील ग्रामीण लोकसंख्येचे वितरण कमी आहे परंतु या तालुक्यांच्या ग्रामीण क्षेत्रफळाच्या तुलनेत ग्रामीण लोकसंख्येची वाढ मध्यम आहे. यातील केळापूर आणि वणी या तालुक्यातील ग्रामीण भागात थोडा विकास झालेला दिसतो. तर झरीजामणी तालुक्यात कृषी व्यवसायामुळे हे केंद्रीकरण मध्यम आढळते. झरीजामणी हा तालुका पूर्णपणे ग्रामीण लोकसंख्येचा आहे (नकाशा क्रमांक १).

## ग्रामीण लोकसंख्येचे उच्च केंद्रीकरण

उमरखेड (२३.२२) आणि आर्णी (२६.०३) या तालुक्यातील स्थान निर्देशांक हा २० ते ३० दरम्यान असून ग्रामीण लोकसंख्येचे केंद्रीकरण उच्च झालेले आहे. उमरखेड तालुक्यात कृषीचा विकास अधिक झालेला आहे. तसेच इतर तालुक्याच्या तुलनेत सिंचन विकास झालेला आहे. याचा प्रभाव हा एथील ग्रामीण लोकसंख्येच्या केंद्रीकरणावर झालेला आढळतो. उमरखेड मध्ये पुसद नंतर ग्रामीण लोकसंख्येचे सर्वाधिक वितरण व वाढ झालेली आहे. आर्णी हा तालुका पूर्णपणे ग्रामीण लोकसंख्येचा आहे. तसेच या तालुक्याचे क्षेत्रफळ आणि ग्रामीण लोकसंख्येची वाढ याचे गुणोत्तर अधिक आहे. तसेच ग्रामीण भागात इतर व्यवसायांना चलना आहे. त्यामुळे केंद्रीकरण उच्च असल्याचे आढळते.

## ग्रामीण लोकसंख्येचे अती उच्च केंद्रीकरण

महागाव (३३.०८) आणि पुसद (३३.८७) या तालुक्यात ग्रामीण लोकसंख्येचे केंद्रीकरण हे सर्वात उच्च झालेले आहे. हे दोन्ही तालुके प्रगत आहेत तसेच कृषीचा विकास झालेला आहे. पुसद तालुक्यात ग्रामीण लोकसंख्या वितरण आणि वाढ हे सर्वाधिक आहे. शेती व्यवसायासोबतच इतर पूरक व्यवसायांना या तालुक्यात प्रोत्साहन आहे. तसेच ग्रामीण क्षेत्रफळ आणि ग्रामीण लोकसंख्या वाढ याचे गुणोत्तर जिल्ह्यात सर्वाधिक आहे. त्यामुळेच या तालुक्यात ग्रामीण लोकसंख्येचे केंद्रीकरण अधिक झालेले आहे.

## निष्कर्ष व उपाययोजना

ग्रामीण लोकसंख्या ही ग्रामीण प्रदेशातील महत्वाचे संसाधन आहे. शेतीसारखा महत्वाचा व्यवसाय हा प्रामुख्याने ग्रामीण भागातच केला जातो. तसेच ग्रामीण भागातील लोकसंख्या प्रामुख्याने शेती व त्याच्याशी निगडीत व्यवसायात गुंतलेली असते. त्यामुळे ग्रामीण लोकसंख्या ही देशाच्या अर्थव्यवस्थेच्या

दृष्टीकोनातून महत्वाची आहे.  ग्रामीण लोकसंख्येचे ज्या प्रदेशात संतुलन असते अशा प्रदेशात विकासाच्या संधी अधिक प्रमाणात उपलब्ध असतात.

नेर बाभूळगाव आणि यवतमाळ तालुक्यात ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण कमी झालेले आहे आणि हे या प्रदेशातील ग्रामीण प्रदेशातील अस्थिरता दर्शविते. ग्तामीन विकासासाठी असणारे आवश्यक घटक याप्रदेशात पुरेसे उपलब्ध नाहीत. रोजगाराचा अभाव तसेच कृषीचे कमी उपन्न, उच्च शिक्षणाचा अभाव यामुळे या प्रदेशातील लोक शहरी भागाकडे स्थलांतर करत आहेत. त्यामुळे शहरी भागात अतिरिक्त लोकसंख्या वाढ होते व ग्रामीण भागात लोकसंख्या संसाधनाचा अभाव होतो.

पुसद आणि उमरखेड या दोन तालुक्यात ग्रामीण लोकसंख्या केंद्रीकरण अधिक आहे. या दोन्ही तालुक्यात शेतीपूरक व्यवसायांना चालना आहे तसेच कृषी उतपन्न इतर तालुक्यांच्या तुलनेत अधिक आहे. याचा प्रभाव हा ग्रामीण भागातील लोकसंख्येच्या केंद्रीकरणावर झालेला आढळून येतो.

ग्रामीण भागातून शहरी प्रदेशांकडे होणारे अतिरिक्त स्थलांतर नियंत्रित करणे आवश्यक आहे. त्यामुळे दोन्ही भागात लोकसंख्या संतुलित राहण्यास मदत मिळेल. शेतीच्या पद्धतीती आधुनिक तंत्रज्ञाचा वापर, सेंद्रिय शेतीला प्राधान्य, मातीची सुपीकता पाहून पिक पद्धतींचा अवलंब करणे तसेच ग्रामीण भागात पायाभूत सुविधांचा विकास करणे, आवश्यक आहे. यामुळे ग्रामीण विकासाला चालना मिळेल आणि ग्रामीण प्रदेशातून होणारे स्थलांतर थांबेल. यामुळे शहरी आणि ग्रामीण भागात लोकसंख्येचे संतुलन राहण्यास मदत होईल व लोकसंख्या विकासाला चालना मिळेल.

ग्रामीण विकास म्हणजेच देशाच्या विकासासाठी प्रयत्न करणे आहे. त्यामुळे ग्रामीण प्रदेशातील लोकसंख्येचे शहरी भागाकडे होणारे अतिरिक्त स्थलांतर थांबविणे आज काळाची गरज आहे. ग्रामीण प्रदेशात वर्षभर रोजगार उपलब्धता करून दिल्यास ग्रामीण लोकसंख्येचे केंद्रीकरण कमी होणार नाही.

## संदर्भ सूची


१) जनगणना अहवाल (यवतमाळ जिल्हा - २००१ व २०११), जनगणना विभाग. भारत सरकार

२) Khobragade A.C., Bhaise S.D., Maski D.A. (2019), “Concentration Index of Rural Population in Akola District of Maharashtra State”, Ajanta, An International Multidisciplinary Quarterly Research Journal, Vol-VIII, Issue-I, English Part – V, January-March-2019, Pp 109-112.

३) Maharashtra State Gazetteers, Yavatmal District (2006), Gazetteer Department, Government of Maharashtra, Mumbai (E-Copy).

४) Spate O H K and Deshpande C.D. 1952, “The Indian Village” Geography, Journal Article, Vol 37, No 3, pp 142-152


❖❖❖

# यवतमाळ जिल्ह्यातील लोकसंख्येचा भौगोलिक अभ्यास
# GEOGRAPHICAL STUDY OF POPULATION IN YAVATMAL DISTRICT

प्रा. एन. व्ही. नरुले
भूगोल विभाग प्रमुख
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ.
संपर्क क्र. ९९२३९०९२९६, Mail Id – narulenilkantha3@gmail.com

## सारांशः—

कोणत्याही भौगोलिक प्रदेशाच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय, आणि सांस्कृतिक विकासात लोकसंख्या हा घटक अतिशय महत्वाचा आहे. सोबतच प्रादेशिक लोकसंख्या ही नैसर्गिक उत्पादक घटक म्हणूनही इतर घटकाबरोबरच महत्वाची आहे. कृषीप्रधान देशामध्ये सर्वात जास्त लोकसंख्या ही ग्रामीण भागातून वास्तव्य करते, आणि म्हणून ती शेती व्यवसायावर आपला उदरनिर्वाह करते. हेच चित्र आपल्याला यवतमाळ जिल्हयातून दिसून येते. २००१ च्या सेन्सस् वरुन वर्गीकरण केले असता असे निदर्शनास येते की यवतमाळ जिल्हयाच्या सोळा तालुक्यापैकी आठ तालुके ही शहरी भागामध्ये मोडतात, त्यात यवतमाळ, वणी, केळापूर, घाटंजी, उमरखेड, पूसद, दिग्रस, आणि दारव्हा ही महत्वाची आहेत.

यवतमाळ जिल्हा कृषीप्रधान व आदिवासी जिल्हा म्हणून ओळखला जातो. हा जिल्हा कापूस शेतीसाठी महाराष्ट्रात प्रसिध्द आहे. संपूर्ण जिल्हयात पारंपारिक तसेच आधुनिक पध्दतीने शेती केली जाते. गहू, ज्वारी, कापूस, सोयाबीन, तुरी, शेंगदाने, कांदे, भाजीपाला, ई. प्रकारचे पिके घेतली जाते. शेती बरोबर शेतीवर आधारीत विविध प्रकारची कारखानदारी कमी प्रमाणात विकसित होत आहे. याच बरोबर पर्यटन क्षेत्रात चांगल्या व नविन स्थळांचा विकास होत आहे. म्हणूनच भौगोलिक अभ्यासाच्या दृष्टीने लोकसंख्या हा विषय घेतला आहे.

बीजसंज्ञाः— लोकसंख्या, लोसंख्येची घनता, स्त्री व पुरुष लोकसंख्या, ग्रामीण व नागरी लोकसंख्या.

## प्रस्तावनाः—

यवतमाळ जिल्हा हा एक आदिवासी जिल्हा म्हणून ओळखला जातो. त्यामुळे या जिल्हयाचा इतिहास फार प्राचिन असून येथील ग्रामीण व आदिवासी वस्त्यांमध्ये सुध्दा पांरपारीक संस्कृतीची अत्याधिक विविधता दिसून येते. त्याचप्रमाणे भौगोलिक स्वरुपातही येथील डोंगराळ व पठारी भूपृष्ठामुळे टोकाची विविधता आलेली आहे. यवतमाळ जिल्हा हा जरी थोडा मागासलेला, विकसनशील दिसत असला तरी जिल्हयाच्या या सर्वच जीवन प्रवासाचा आरंभ असणाऱ्या लोकसंख्या या घटकाचा अभ्यास करणे महत्वाचे ठरते.

## उद्दिष्टयेः—

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये यवतमाळ जिल्हयातील १९८१ ते २००१ या तीन दशकातील लोकसंख्येच्या वाढीचा अभ्यास करणे.

## अभ्यास क्षेत्रः—

यवतमाळ जिल्हयाचे क्षेत्र विस्तृत असून जिल्हयाच्या उत्तरेला व दक्षिणेला नैसर्गिक सिमा प्राप्त झालेल्या आहेत. या जिल्हयाच्या उत्तरेस वर्धा नदीमुळे वर्धा व चंद्रपूर जिल्हे तसच दक्षिणेला पैनगंगा नदीमुळे नांदेड जिल्हा व आंध्रप्रदेश राज्य वेगळे झाले आहेत.

यवतमाळ जिल्हयाचे क्षेत्रफळ १३,५८४ चौ.कि.मी. असून यवतमाळ जिल्हा १६ तालुक्यांमध्ये विभागला गेला आहे. महाराष्ट्र राज्याच्या एकूण क्षेत्रफळापैकी ४.४ टक्के इतका भूभाग या जिल्हयाने व्यापलेला आहे. हा

जिल्हा १९° २६’ उत्तर ते २०° ४२’ उत्तर अक्षांश आणि ७७° १८’ पूर्व ते ७९° ९’ पूर्व रेखांश या दरम्यान पसरलेला आहे. सन २००१ नुसार जिल्हयाची लोकसंख्या ही २४,५८,२७१ इतकी होती.

## विषय विवेचन:—

यवतमाळ जिल्हयातील १९८१ ते २००१ या वर्षीच्या लोकसंख्योची तुलना केली असता असे दिसून येते की १९८१ च्या जनगणनेनुसार यवतमाळ जिल्हयाची एकूण लोकसंख्या १७३७४२३ असून त्यात ५१.०७ टक्के पुरुषांची संख्या तर ४८.९३ टक्के स्त्रियांची संख्या आहे. १९९१ च्या आकडेवारीनुसार यवतमाळ जिल्हयाची एकूण लोकसंख्या २०७७१४४ इतकी आहे. त्यापैकी ५१.२३ टक्के पुरुषांची संख्या असून ४८.७७ टक्के संख्या स्त्रियांची आहे. एकूण लोकसंख्येपैकी ८२.८१ लोकसंख्या ही ग्रामीण भागात असून १७.१९ टक्के लोकसंख्या ही नागरी भागातून राहते. लोकसंख्येचे हे प्रमाण २००१ मध्ये वाढलेले असून २००१ च्या जनगणनेनुसार जिल्हयाची एकूण लोकसंख्या २४५८२७१ इतकी असून त्यापैकी ५१.२३ टक्के पुरुष व ४८.४९ टक्के स्त्रियांची लोकसंख्या आहे. एकूण लोकसंख्येपैकी ८१.४१ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात व १८.८५ टक्के लोकसंख्या ही नागरी भागात राहते. जिल्हयात यवतमाळ तालुक्यात सर्वाधिक लोकसंख्या असून त्यामध्ये सतत वाढ झालेली दिसून येते.

सारणी क्र. १

यवतमाळ जिल्हयातील लोकसंख्येची वैशिष्टये

| वर्ष | १९८१ | | | १९९१ | | | २००१ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| विशेष | एकूण | ग्रामीण | नागरी | एकूण | ग्रामीण | नागरी | एकूण | ग्रामीण | नागरी |
| एकूण लोकसंख्या | १७३७४२३ | १४७५२८८ | २६२१३५ | २०७७१४४ | १७२०२१३ | ३५६९३१ | २४५८२७१ | २००१०६० | ४५७२११ |
| पुरुष | ८८५०१२ | ७४८०७७ | १३६९३५ | १०६४४२२ | ८७९०१७ | १८५४०५ | १२६५६८१ | १०२९५४० | २३६१४१ |
| स्त्रीया | ८५२४११ | ७२७२११ | १२५२०० | १०१२७२२ | ८४११९६ | १७१५२६ | ११९२५९० | ९७१५२० | २२१०७० |

स्त्रोत — जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन यवतमाळ (२००७—०८)

जिल्हयात १९८१ च्या ग्रामीण लोसंख्येनुसार पुसद व दिग्रस तालुक्यात लोकसंख्या ही सर्वाधिक असून १९९१ ला उमरखेड, पुसद व दिग्रस या तीन तालुक्यात ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण जास्त आहे, तर २००१ मध्ये उमरखेड, पुसद या दोन तालुक्यात हे प्रमाण सर्वाधिक दिसून येते.

नागरी लोकसंख्येचा विचार करता, यवतमाळ जिल्हयात एकूण १६ तालुक्यापैकी २००१ नुसार ८ तालुके हे नागरी लोकसंख्येत मोडतात. १९८१ च्या एकूण नागरी लोकसंख्येच्या आकडेवारीनुसार ३३.९७ टक्के म्हणजेच सर्वाधिक नागरी लोकसंख्या यवतमाळ तालुक्यात होती. तर सर्वात कमी नागरी लोकसंख्या ही घाटंजी तालुक्यात होती. १९९१ च्या आकडेवारीनुसार यवतमाळ तालुक्यात ३९.१७ टक्के नागरी लोकसंख्या असून पुसद तालुक्यातही नागरी लोकसंख्येचे प्रमाण जास्त दिसून आलेत.

१९८१ च्या जनगणनेनुसार यवतमाळ जिल्हा जास्त घनतेचा असून सर्वात कमी घनतेचे विभाग कळंब, राळेगाव, मारेगाव, घाटंजी, महागाव, उमरखेड हे आहेत. येथील घनता दर चौ. कि. मी. ला १२५ पेक्षाही कमी आहे. पुसद, दिग्रस, केळापूर, वणी, बाभूळगाव, नेर, दारव्हा येथील लोकसंख्येची घनता दर चौ. कि. मी. ला १२५ ते १७५ दिसून येते.

१९९१ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येच्या घनतेचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, यवतमाळ तालुक्याची घनता जास्तीतजस्त आहे. पुसद व दिग्रस तालुक्यात लोकसंख्येचे घनतेचे प्रमाण दर चौ. कि. मी. ला १८० ते २०० दरम्यान आहे. तर कळंब, राळेगाव, मारेगाव, घाटंजी, नेर येथे न्यूनतम घनता असून दर चौ. कि. मी. ला येथील घनतेचे प्रमाण १२५ पेक्षाही कमी आहे. २००१ ची यवतमाळ जिल्हयाच्या लोकसंख्येची घनता दर चौ. कि. मी. ला १८१ इतकी आहे. यवतमाळ तालुक्याची लोकसंख्येची घनता जिल्हयात सर्वाधिक म्हणजे ३२७ इतकी आहे. तर मारेगाव तालुक्याची घनता जिल्हयात सर्वात कमी म्हणजे ६३ इतकी आहे. सर्वसाधारण घनतेचा विचार करता कळंब, मारेगाव, झरीजामणी, घाटंजी व दिग्रस या पाच तालुक्यामध्ये हे प्रमाण दर चौ. कि. मी. ला १२५ पेक्षाही कमी आहे. त्याचप्रमाणे बाभूळगाव, राळेगाव, केळापूर, महागाव, नेर या पाच तालुक्यामध्ये

लोकसंख्येची घनता दर चौ. कि. मी. १२५ ते १७५ इतकी आहे. १९८१, १९९१ व २००१ या वर्षाच्या जनगणनेनुसार एकमेव यवतमाळ तालुका असा येतो की जेथे घनता जिल्हयात सर्वाधीक आहे.

## निष्कर्ष:—

१) प्रस्तुत जिल्हयातील एकूण लोकसंख्येचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, येथे सर्वात जास्त लोकसंख्या (१९८१, १९९१, २००१) ला यवतमाळ तालुक्याचीच आहे. त्याचे कारण असे की, यवतमाळ हा तालुका जिल्हयाचे केंद्र असून येथे सर्व सोयी व सुविधांचा विकास झालेला असल्यामुळे येथे लोकसंख्येचे केंद्रीकरण अधिक आढळून येथे.
२) जिल्हयात ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण पुसद या तालुक्यात (१९८१, १९९१, २००१) सर्वात जास्त असून नागरी लोकसंख्येचे प्रमाण यवतमाळ तालुक्यात सर्वाधीक आहे.
३) १९८१, १९९१ व २००१ नुसार यवतमाळ जिल्हयातील एकूण लिंग गुणोत्तर प्रमाण पाहिले असता येथे सर्वच तालुक्यात पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचे प्रमाण कमी आहे. तसेच हे चित्र ग्रामीण व नागरी भागात सुध्दा आढळून येते.
४) जिल्हयातील लोकसंख्येच्या घनतेचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, १९९१ च्या तुलनेत लोकसंख्येची घनता १९८१ ला बरीच कमी आहे मात्र तालुका निहाय घनता वितरणात फारसा फरक आढळून येत नाही. २००१ ला या आकडेवारीत वाढ झालेली दिसत असून यवतमाळ तालुकयात लोकसंख्येची घनता ( १९८१, १९९१, २००१) सर्वाधीक आहे. जिल्हयाच्या पूर्वेकडील भागात लोकसंख्या घनतेचे प्रमाण कमी असलेले दिसते. हे विभाग थोडे ग्रामीण विभागात मोडत असून शेती व्यवसाय हा येथे प्रमुख आहे. रस्त्यांचा विकास मोठया प्रमाणात झालेला नसल्यामुळे तसेच शैक्षणिक सोयींची उपलब्धता कमी असल्यामुळे लोकसंख्येची घनता कमी असावी असे वाटते.

## संदर्भ:—


- Govt.of Maharashtra (1991) District Census Handbook, Yavatmal District for 1991.
- Govt.of Maharashtra (1989-90,1991-92,2007-08): Socio economic abstract-yavatmal District, Dept. of Finance and Statistics, Govt.of Maharashtra Mumbai.
- Kayashtha S.L. (1988) "Geography of Population," Rawat Publication, Jaipur Pp 27-85.


❖❖❖

## Form IV

(See Rule 8)

**Statement about ownership and other particular about the Journal**

## Research Journal of India


| | | |
|---|---|---|
| 1. Place of Publication | - | Dr. Bhau Mandavkar Research Centre (DBMRC), Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445401 |
| 2. Periodicity | - | Annual |
| 3. Printer's Name | - | Seva Prakashan, Vijay Colony, Amravati 444606 (M.S.) |
| 4. Publisher's Name | - | Dr. Mrs. Veera Mandavkar |
| Nationality | - | Indian |
| Address | - | Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445401 |
| 5. Editor's Name | - | Dr. Pavan Mandavkar |
| Nationality | - | Indian |
| Address | - | Principal, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal |

We, Dr. Pavan Mandavkar & Dr. Mrs. Veera Mandavkar hereby declare that the particulars given above are true to the best of our knowledge and belief.



Dr. Y.M. Donde Sarwajanik Shaikshanik Trust's (1974)

**INDIRA MAHAVIDYALAYA**

KALAMB, DIST. YAVATMAL, MAHARASHTRA 445401



☎ 07201-226147, 226129 (Fax)

Web.: www.indiramahavidylaya.com

www.researchjournal.net.in

Email: imvkalamb@yahoo.co.in

indiram414@sgbau.ac.in

For Research centre: researchjournalofindia@gmail.com

marathipradhyapak@gmail.com



Permanently Affiliated to SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI

RECOGNIZED BY UGC UNDER 2 F & 12 B

NAAC RE-ACCREDITED WITH 'B+' GRADE



| | | | |
|---|---|---|---|
| Annual Subscription | - | Individual / Institutional | ₹ 500/- |
| Account Details : Bank | - | Bank of Maharashtra | |
| Branch | - | Azad Maidan Road, Yavatmal | |
| IFSC code | - | MAHB0000047 | |
| MICR code | - | 445014001 | |
| A/c No. | - | 60175373000 | |
| A/C Name | - | Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre | |



(All rights are reserved with the Publisher & Editorial Board. The opinion expressed are of the authors & the association advisory board, editorial board as well as the peer committee does not hold any responsibility for any of the views expressed. Judiciary matter in Kalamb Court only.)



p -ISSN 2349-9370

9 772349 937002

e -ISSN 2582-4848

9 772582 484004